सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, १२ जानेवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३१३ । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



विजयाची आकांक्षा बाळगून काम करावे. हीच आमच्या पूर्वजांची विशेषता आहे. आपल्याला विजयशालिनी शक्ती निर्माण करायची आहे. इतरांना दुःखी करण्यासाठी नव्हे, तर धर्मरक्षणासाठी आणि मानव कल्याणासाठी. 'ज्ञानाय, दानाय च रक्षणाय' ही शक्ती आहे. संपूर्ण समाज आपल्यासोबत राहील, असे वातावरण आपल्याला निर्माण करायचे आहे.

**- हस्तीमल**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. संपर्क प्रमुख

## विनम्र अभिवादन



राजमाता जिजाऊ माँसाहेब भोसले यांची तारखेप्रमाणे आज जयंती.




स्वामी विवेकानंद यांची आज जयंती. हा दिवस राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

# पीएसएलव्ही-सी ६२ ची उलटगणना सुरू

**◆ श्रीहरिकोटा, ११ जानेवारी**
पीएसएलव्ही रॉकेटच्या प्रक्षेपणासाठी इस्रोने रविवारी २२.५ तासांची उलटगणना सुरू केली. पीएसएलव्ही-सी ६२ रॉकेट पृथ्वी निरीक्षण उपग्रहासह इतर १४ उपग्रहांना कक्षेत स्थापन करेल. या प्रक्षेपणाद्वारे अंतराळ संस्थेच्या या वर्षातील पहिल्या प्रक्षेपणाची सुरुवात झाली आहे.

इस्रोच्या व्यावसायिक शाखा असलेल्या न्यूस्पेस इंडिया लिमिटेडद्वारे (एनएसआयएल) हाती घेण्यात आलेल्या या मोहिमेतील इतर १४ उपग्रहे देशातील तसेच विदेशातील ग्राहकांचे आहेत. २६० टन वजनाच्या पीएसएलव्ही-सी ६२ रॉकेटच्या प्रक्षेपणाची वेळ सोमवारी सकाळी १०.१७ ऐवजी सकाळी १०.१८ वाजता पुनर्निर्धारित करण्यात आली आहे, असे इस्रोने सांगितले. उलटगणना दुपारी १२.४८ वाजता सुरू झाली. त्याचा कालावधी २२ तास ३० मिनिटांचा आहे. प्रक्षेपण उद्या सकाळी १०.१८ वाजता होईल, असे सूत्रांनी रविवारी वृत्तसंस्थेला सांगितले. पृथ्वी निरीक्षण उपग्रह तसेच इतर १४ उपग्रह पीएसएलव्ही-सी ६२ रॉकेटच्या माध्यमातून वेगवेगळ्या कक्षेत स्थापन केली जातील. *(वृत्तसंस्था)*



# सोमनाथ मंदिराचे विरोधक आजही सक्रिय

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घणाघात



सोमनाथ : उद्ध्वस्त भिंतींपासून डौलदार कळसापर्यंत पान ३

**◆ सोमनाथ, ११ जानेवारी**
स्वातंत्र्यानंतर सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीला ज्या शक्तींनी विरोध केला होता, त्या आजही आपल्यात सक्रिय आहेत आणि त्यांना पराभूत करण्यासाठी भारताने सतर्क, एकजूट आणि सामर्थ्यवान राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले.

तलवारीच्या बळावर लोकांची मने कधीच जिंकता येत नाहीत, असे नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या गीर सोमनाथ जिल्ह्यात असलेल्या या ऐतिहासिक मंदिरावर पूर्वी झालेल्या हल्ल्यांचा आणि प्रत्येक वेळी ते कसे बांधले गेले याचा संदर्भ देताना सांगितले. सोमनाथचा हजारो वर्षांचा इतिहास हा विनाश आणि पराभवाचा नाही, तर विजय आणि पुनर्निर्माणाचा आहे, असे पंतप्रधानांनी नमूद केले.

१०२६ मध्ये महमूद गझनवीच्या आक्रमणापासून सुरू होऊन विदेशी आक्रमकांनी वारंवार उद्ध्वस्त केलेल्या सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीद्वारे प्रतीक असलेल्या भारतीय संस्कृतीच्या लवचीकतेचे स्मरण करण्यासाठी येथे आयोजित 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' कार्यक्रमात ते मोठ्या संख्येने जमलेल्या जनसमुदायाला संबोधित करीत होते.

शतकानुशतके ते नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न होऊनही भगवान शिवाला समर्पित असलेले सोमनाथ मंदिर आज सामूहिक दृढनिश्चय आणि त्याला त्याच्या प्राचीन वैभवात पुन्हा स्थापन करण्याच्या प्रयत्नांमुळे लवचीकता, श्रद्धा आणि राष्ट्रीय अभिमानाचे एक शक्तिशाली प्रतीक म्हणून उभे आहे, असे मोदी म्हणाले. सोमनाथ मंदिरावरील हल्ले द्वेषामुळे प्रेरित असले तरी, त्यांना केवळ लूट म्हणून भासवण्याचा प्रयत्न करण्यात आला. *(वृत्तसंस्था)*

### धार्मिक हेतू लपविण्यासाठी लिहिली पुस्तके

धार्मिक हेतू लपविण्यासाठी पुस्तके लिहिली गेली, यात याला केवळ सामान्य लूट म्हणून चित्रित करण्यात आले. सोमनाथ मंदिर वारंवार नष्ट केले गेले. ही आक्रमणे केवळ लुटीसाठी असती, तर हजार वर्षांपूर्वीच्या पहिल्या मोठ्या लुटीनंतरच ती थांबली असती. पण, तसे झाले नाही. सोमनाथच्या पवित्र देवतेचा अपमान करण्यात आला, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

### मंदिराचे मूळ स्वरूप बदलण्याचा वारंवार प्रयत्न

मंदिराचे मूळ स्वरूप बदलण्याचा वारंवार प्रयत्न करण्यात आला आणि सोमनाथ मंदिर लुटीच्या उद्देशाने नष्ट केले गेले, असे आम्हाला शिकवले गेले. द्वेष, अत्याचार आणि दहशतीचा खरा इतिहास आमच्यापासून लपवला गेला, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

### शौर्य यात्रेत सहभागी

पंतप्रधान नरेंद्र मोदी येथील शौर्य यात्रेत सहभागी झाले. प्राचीन मंदिराकडे जाणाऱ्या मिरवणुकीचे नेतृत्व त्यांनी केले. यावेळी पुजाऱ्यांनी डमरू वाजवले आणि १०८ घोडे हळूहळू सोमनाथ मंदिर परिसरासमोर असलेल्या वीर हमरची गोहिल चौकाकडे निघाले. सोमनाथ मंदिराचे रक्षण करताना प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य योद्ध्यांचा सन्मान करण्यासाठी आयोजित 'शौर्य यात्रा' शंख सर्कल येथून सुरू झाली. नरेंद्र मोदी यांनी यात एक किलोमीटरच्या मार्गावर खुल्या वाहनातून प्रवास केला. मिरवणुकीच्या सुरुवातीला त्यांनी डमरूही वाजवला.

# जि. प., पं. स. निवडणुकीवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी

## निवडणूक आयोगाची १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढीची मागणी

**◆ नवी दिल्ली, ११ जानोवारी**
राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल करून १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. यावर सोमवारी सुनावणी घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश दिला होता. दरम्यान प्रशासकीय आणि तांत्रिक कारणास्तव ही मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून मिळावी, अशी विनंती आयोगाने केली आहे. या अर्जावर सोमवारी सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्यासमोर तातडीने सुनावणी होणार आहे.

दुसरीकडे, वसई-विरार महानगरपालिका निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली. त्यात निवडणुकीला तात्पुरती स्थगिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्रात काही गावांचा समावेश करण्याची मागणी याचिकेत करण्यात आल्याने कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. या प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली आहे, मात्र अद्याप अंतिम निकाल आलेला नाही. निकाल लागेपर्यंत निवडणूक प्रक्रियेला स्थगिती मिळावी, अशी मागणी करीत याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. *(वृत्तसंस्था)*

# मकरसंक्रांत साजरी केल्यास जीव गमवाल

## बांगलादेशातील जमात-ए-इस्लामीची हिंदूंना धमकी

**ढाका, ११ जानेवारी**
बांगलादेशात मकरसंक्रांतीचा उत्सव साजरा केल्यास हिंदूंना जीव गमवावा लागेल, अशी जाहीर धमकी जमात- ए- इस्लामीने दिली आहे. अल्पसंख्याकांवर वाढत्या हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर कट्टरवादी संघटना आता हिंदू सणांना लक्ष्य करीत आहे.

'जमात'ने त्यांच्या अधिकृत समाज माध्यम खात्यावरील पोस्टमध्ये म्हटले की, मकरसंक्रांतीला संगीत वाजवणे, पतंग उडवणे किंवा कोणत्याही प्रकारचा उत्सव साजरा करणे बांगलादेशात चालणार नाही. इस्लामी मूल्यांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील. 'जमात'च्या धमकीमुळे ढाका, चितगाव आणि सिल्हेट यासारख्या हिंदूबहुल भागात भीतीचे वातावरण निर्माण आहे. बांगलादेशमध्ये शतकानुशतके १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांत सण शकरैन नावाने मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हिंदू समुदायाकडून पतंग उडवणे, तीळ-गुळाचे पदार्थ आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तथापि, अलिकडच्या काळात, कट्टरपंथी गटांनी याला गैर इस्लामी म्हणत निषेध करण्यास सुरुवात केली आहे. *(वृत्तसंस्था)*





### दहा हिंदूंची हत्या, हल्ल्याच्या ५१ घटना

बांगलादेश हिंदू बौद्ध ख्रिश्चन युनिटी कौन्सिलने नुकत्याच जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, गेल्या काही महिन्यांत देशात अल्पसंख्याकांवर अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. महिनाभरात जातीय हिंसाचाराच्या ५१ घटना नोंदवल्या गेल्या. यात १० अल्पसंख्यक नागरिकांच्या हत्या झाल्या, तर जाळपोळीच्या २३, दरोडा आणि चोरीच्या १० घटना, खोट्या ईशनिंदेच्या आरोपाखाली अटक आणि छळाच्या चार प्रकरणांचा समावेश आहे. कट्टरवाद्यांकडून अल्पसंख्याकांची घरे, मंदिरे आणि व्यवसायांना लक्ष्य करण्यात येत आहे.

## महत्त्वाचे

### टेस्लाचे चौथे शोरूम बंगळुरूमध्ये


**बंगळुरू :** टेस्ला इंडियाने आता बंगळुरूमध्ये आपले चौथे शोरूम उघडण्याची घोषणा केली आहे. कंपनीने एक्सवर पोस्ट शेअर करत लिहिले, 'सी यू सून इन नम्मा बेंगलुरु.' हे पाऊल भारतात टेस्लाच्या जलद विस्ताराचे प्रतीक मानले जात आहे. कंपनीचे आधीपासूनच दिल्ली, मुंबई आणि गुरुग्राममध्ये शोरूम आहे. टेस्लाने अद्याप नेमकी उद्घाटनाची तारीख सांगितलेली नाही, परंतु कंपनीचे लक्ष वेगाने वाढणाऱ्या दक्षिण भारतीय बाजारावर आहे.

### इन्स्टाग्रामच्या १.७५ कोटी वापरकर्त्यांचा डेटा लीक

**नवी दिल्ली, ११ जानेवारी-**
सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामच्या १.७५ कोटींहून अधिक वापरकर्त्यांचा वैयक्तिक डेटा लीक झाला आहे. ही माहिती सायबर गुन्हेगारांच्या हाती लागली आहे. अँटीव्हायरस सॉफ्टवेअर फर्म मालवेअरबाईट्सच्या अहवालानुसार, लीक झालेल्या डेटामध्ये युझरनेम, घराचा पत्ता, फोन नंबर, ईमेल अ‍ॅड्रेस यांसारख्या गोष्टींचा समावेश आहे.

# दै. तरुण भारतचे दिल्ली येथील प्रतिनिधी मदन भाटीया यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**
दै. सोलापूर तरुण भारतचे दिल्ली येथील प्रतिनिधी तथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ज्येष्ठ कार्यकर्ते मदन भाटीया यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. सन १९५३ साली त्यांच्या जन्म झाला असून मृत्यूसमयी ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते ज्येष्ठ स्वयंसेवक होते.



माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी, विश्व हिंदू परिषदेचे स्व. अशोक सिंघल यांच्यासोबत रामजन्मभूमी आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, धर्मेंद्र प्रधान यांच्यासह भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांबरोबर त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. विद्यार्थी दशेमध्ये त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदचे काम केले होते. भाटिया हे दिल्ली विद्यापीठाचे विद्यार्थी प्रतिनिधी होते. त्यांनी डुसूचे चेअरमन म्हणूनही काम पाहिले आहे. परिषदेच्या विविध आंदोलनात त्यांनी हिरिहिरीने भाग घेतले होते. दिल्लीच्या पत्रकारिता वर्तुळामध्ये त्यांनी आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...



जि.प.उर्दू शाळा, सांगोला येथे फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना नगरसेवक जुबेर मुजावर यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, अयाज बागवान, खतीब, तौफिक मुजावर उपस्थित होते.



## मोहोळ येथील व्यापारी मोफत वाचनालयात वाचक संख्येत लक्षणीय वाढ

**मोहोळ, दि. ११ जानेवारी -**

शहरातील व्यापारी मोफत वाचनालय येथे वर्तमानपत्र वाचकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून कडाक्याच्या थंडीची तीव्र लाट असतानाही वाचनालयात येणाऱ्या वाचकांच्या संख्येत कोणतीही घट न होता उलट वाढच होत असल्याचे दिसून येत आहे. या वाचनालयात दररोज विविध मराठी, हिंदी तसेच इंग्रजी वर्तमानपत्रांची सोय करण्यात आली असून याचा लाभ मोठ्या प्रमाणावर नागरिक घेत आहेत. विशेष बाब म्हणजे तरुण वर्गाबरोबरच ज्येष्ठ नागरिकांचीही उपस्थिती लक्षणीयरीत्या वाढली आहे. सकाळच्या वेळेत ज्येष्ठ नागरिक वर्तमानपत्र वाचनासाठी आवर्जून हजेरी लावत असून दुपारनंतर व संध्याकाळी तरुण वर्ग अभ्यासासह चालू घडामोडी जाणून घेण्यासाठी वाचनालयात येत आहे. थंडीचा कडाका असूनही ज्ञानार्जनाची ओढ वाचनालयाकडे खेचत असल्याचे समाधानकारक चित्र असून व्यापारी मोफत वाचनालय हे सामाजिक आणि बौद्धिक केंद्र म्हणून आपली भूमिका प्रभावीपणे बजावत आहे. वाचन संस्कृती जपण्याच्या दृष्टीने हे वाचनालय मोहोळ शहरासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## पीपल्स पार्टीच्या मोहोळ तालुकाध्यक्षपदी सरवदे



**मोहोळ, दि.११ जानेवारी-**

पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या मोहोळ तालुकाध्यक्षपदी गोरख सरवदे यांची निवड करण्यात आली आहे. पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खा.प्रा. जोगेंद्र कवाडे, कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या आदेशान्वये जिल्हाध्यक्ष अमित कांबळे यांनी ही निवड केली. जिल्हाध्यक्ष कांबळे यांनी राष्ट्रीय कार्याध्यक्ष कवाडे यांच्या सोबत चर्चा करून सरवदे यांच्या आजपर्यंतच्या सामाजिक कार्याची दखल घेत तालुकाध्यक्ष पदी निवड केली. यावेळी जयदीप कवाडे यांनी त्यांच्या निवडीचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शहराध्यक्ष शरणू हजारे, जिल्हा युवक अध्यक्ष विश्वजित सरवदे, संपर्क प्रमुख महिबुब शेख, शहर संघटक सद्दाम भाई पठाण, सामाजिक कार्यकर्ते व मैत्री युथ फाऊंडेशनचे अण्णा भाऊ डोळसे, जिल्हा युवक नेते वाहिद मुस्तफा, दाऊद मुलानी, नबिसा शेख, ज्येष्ठ नेते दत्ता राऊत, शहर संपर्क प्रमुख विकी बनसोडे, मीडिया प्रमुख राज सोनवणे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



## राज्य कुस्ती स्पर्धेसाठी कासेगावातील पैलवानांची निवड

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील पैलवानांची विविध वजनी गटात निवड झाली आहे. नुकत्याच झालेल्या शहर तालीम संघाच्या निवड चाचणीतून ही निवड झाली. त्यांना पैलवान मेघराज सरसंबे यांचे मार्गदर्शन लाभले. **निवडलेले मल्ल** : १५ वर्षांखालील गट : ४८ किलो समर्थ विजय भोसले, ३८ किलो रोहन दत्तात्रय जाधव, ३८ किलो पृथ्वीराज विश्वजीत चौगुले, ४१ किलो कृष्णा शिवानंद वाडकर, ८५ किलो सोहम माळी. या सर्वांचे ग्रामस्थांतून अभिनंदन होत आहे.

# दुधनीच्या विकासासाठी तीनशे कोटीचा प्रस्ताव : शंकर म्हेत्रे

## नुतन नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रेंनी घेतली उपमुख्यमंत्री शिंदेंची भेट

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ११ जानेवारी -**

दुधनीच्या सर्वांगिण विकासाकरिता सोलापुर जिल्हयातील शिंदे सेनेचे जेष्ठ नेते माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली दुधनी नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबई येथे भेट घेऊन दुधनीच्या सर्वांगिण विकासाकरिता निवेदन सादर केले. दुधनीच्या विकासाकरिता ३०० कोटीचा प्रस्ताव असून प्रारंभी १०० कोटीच्या मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले आहे. अशी माहिती शिंदे सेनेचे जिल्ह्यातील जेष्ठ नेते तथा दुधनी नगरपालिकेत शिंदे सेनेच्या विजयाचे शिल्पकार ठरलेले शंकर म्हेत्रे यांनी दिली.



माजी गृह राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी शिंदे सेनेत जुनमध्ये प्रवेश केला. अवघ्या चारच महिन्यात शिंदे सेनेची भक्कम पक्ष बांधणी माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली झाली आहे. दुधनी नगरपालिकेत नगराध्यक्ष निवडून आणलाच. शिवाय सर्व नगरसेवक शिंदे सेनेचे निवडून आणले. दुधनीमध्ये भाजपाला एकही नगरसेवक निवडून आणता आला नाही. अक्कलकोटमध्ये शिंदेसेनेचा एक नगरसेवक विजयी झाला. अक्कलकोट नगरपालिकेत दोन नंबरची मते शिंदे सेनेला मिळाली आहेत. शिंदे सेनेत प्रवेश केल्यानंतर अवघ्या ४ महिन्यात माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे यांनी शिंदे सेनेची भक्कम बांधणी करून अक्कलकोट तालुक्यात मोठा जनाधार मिळवला आहे अशी माहिती शिंदे सेनेचे जेष्ठ नेते शंकर म्हेत्रे यांनी दिली.

# आजपासून हत्तूर येथे यात्रेला सुरूवात

### सोमेश्वर व बनसिध्देश्वर यात्रेनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ११ जानेवारी -**

हत्तूर येथील सोमेश्वर व बनसिध्देश्वर यात्रेनिमित्त १२ जानेवारी ते १५ जानेवारी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहीती यात्रा कमिटी सदस्य व शिवसेना जिल्हा उपप्रमुख सतुबर यांनी दिली.

सोमवार दि.१२ जानेवारी रोजी तैलाभिषेक व नंदीध्वज अभिषेक, मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी भोगी व अक्षता सोहळा कलगीतुऱ्याच्या गाण्याचा कार्यक्रम होणार आहे. बुधवार दि.१४ जानेवारी रोजी नंदीध्वज व पालखी मिरवणूक होऊन होम कार्यक्रम पार पडणार आहे. गुरुवार दि.१५ जानेवारी रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत जंगी मल्लांच्या कुस्त्या होणार असून यावेळी ५१ हजार रूपयांपर्यंत बक्षिस देण्यात येणार आहे. तर रात्री कन्नड सामाजिक नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज यात्रा कमिटीकडून भाविकांसाठी महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे. भक्तांनी कार्यक्रमांचे लाभ घेण्याचे आवाहन यात्रा कमिटीकडून




करण्यात आले आहे. यावेळी शिलीसिद्ध महाराज, सोमनिंग कनपवडीयार, राजशेखर भरले, बापूराव उपासे, बापू पाटील, गुरप्पा कुलकर्णी, गुरप्पा पटवडीयार, बंदप्पा पाटील ,ॲड. केदार डोळे, सोमनिंग नायकोडे, ईरप्पा म्हेत्रे, सूर्यकांत नायकोडे, शिवानंद पाटील, अप्पू पाटील, बनसिध्द भिंगे, नीलप्पा उपासे, संगप्पा निंबर्गी, सोमनिंग कोळी, ज्योतप्पा सिनेवडीयार, बंदेनवाज मुल्ला आदी उपस्थित होते.



## व्हॉईस ऑफ मीडिया शाखेच्यावतीने पत्रकार दिन साजरा

**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त (पत्रकार दिन) व्हॉईस ऑफ मीडिया, शाखा बार्शी यांच्यावतीने ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे सभापती विजय गरड हे होते. प्रमुख उपस्थितीत उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, व्हॉईस ऑफ मीडिया - इंटरनॅशनल फोरमचे प्रदेश उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ॲड. रणवीर राऊत, श्रीधर अंधारे उपस्थित होते.

यावेळी सचिन अपसिंगकर, उमेश पवार, विजय निलाखे, शहाजी फुरडे, धैर्यशील पाटील, सिकंदर आतार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्रविण पावले, ओंकार हिंगमिरे, निलेश झिंगाडे, मयूर थोरात, समाधान चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. अध्यक्षीय भाषण विजय गरड यांनी केले. कार्यक्रमास व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे सदस्य प्रदीप माळी, उमेश काळे, शाम थोरात, विजय शिंगाडे, जमीर कुरेशी, विक्रांत पवार, पवन श्री श्रीमाळ, अपर्णा दळवी, ऋषीकेश अंधारे, आतिश कसबे, मल्लिकार्जुन धारुरकर उपस्थित होते.

# अवैध मुरूम उपशाकडे मंद्रूपच्या तहसीलदारांचे दुर्लक्ष

### महसूल विभागाची बघ्याची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ११ जानेवारी -**

मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयाच्या परिसरात एक महिन्यापासून मोठ्या प्रमाणात अवैध मुरूम उपसा सुरू असल्याबाबत तहसील कार्यालयाकडे तक्रार केल्यानंतरही कारवाई होत नसल्यामुळे तक्रारदारांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. मंद्रूपच्या तहसीलदारांचे अवैध मुरुम उपशाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. अवैध मुरूम उपसा करणाऱ्या ठेकेदारांबरोबर महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचे लागेबांधे असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे

**तहसीलदारांचे दुर्लक्ष**

मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयात अवैध मुरूम व खडी क्रेशर सुरू असताना तहसीलदार विष्णु बुटे यांच्याकडून कारवाई होताना दिसून येत नाही. त्यामुळे ठेकेदार व वाहनचालकांकडून तक्रारदारांवर दबाव आणण्यात येत आहे. तहसीलदारांच्या बघ्याच्या भूमिकेमुळे तक्रारदार वैतागले आहेत. याबाबत तहसीलदार बुटे यांच्याशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

महसूल विभागाकडून जाणिवपूर्वक दुर्लक्ष करून ठेकेदारांना अभय देण्याचे काम सुरू असल्याची चर्चा सुरू आहे.

तत्कालीन तहसीलदार सुजित नरहरे यांच्या बदलीनंतर एक महिन्यापासून मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयाच्या परिसरातील प्रत्येक गावात ग्रामपंचायत व ठेकेदारांकडून अवैध मुरूम उपसा करण्यात येत आहे. ठेकेदारांकडून कमी रक्कमेची रॉयल्टी काढून मोठ्या प्रमाणात अधिक रक्कमेचे अवैध मुरूम उपसा करण्यात येत आहे. याबाबत मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयाकडे तक्रार केल्यानंतर त्या तक्रारीची दखल घेण्यात येत नसल्याचे दिसून येते. शिवाय याबाबत विचारणा करण्यासाठी तहसीलदारांशी संपर्क साधला असता तहसीलदारांकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे तक्रारदारातून नाराजी व्यक्त होत आहे.

# चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेस १० लाख ५७ हजार रुपयांच्या स्कॉलरशिपचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

चाटे शिक्षण समूहाच्यावतीने Beyond the Study या उपक्रम ाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृह येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात भास्कराचार्य टॅलेंट सर्च परीक्षा (BTS), चाटे टॅलेंट सर्च परीक्षा (CTS) व दहावीच्या विशेष गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचा कार्यक्रम पार पडला.




चाटे टॅलेंट सर्च परीक्षा (CTS) ही परीक्षा दरवर्षी चाटे शिक्षण समूह कोल्हापूर विभाग आयोजित करत असते. चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेसाठी १० लाख ५७ हजार रुपयांच्या स्कॉलरशिपचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास चौथी ते दहावीमधील विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शन प्रा. सर्जेराव राऊत (शैक्षणिक विभाग प्रमुख) यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांचे महत्त्व विशद करत दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी बोर्ड परीक्षेच्या अंतिम टप्प्यातील तयारी कशी करावी, याबाबत अत्यंत मोलाचे व मार्गदर्शक विचार मांडले. त्यांच्या म ार्गदर्शनामुळे विद्यार्थी व पालकांम ध्ये परीक्षांविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.

यावेळी प्रा. प्रदीप भोसले यांनी अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन, सातत्य आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या सोप्या आणि प्रभावी मांडणीला विद्यार्थ्यांकडून विशेष दाद मिळाली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सर्जेराव राऊत, प्रा. प्रदीप भोसले, प्रा. पाटील सर तसेच पालक प्रतिनिधी जयराज निकम उपस्थित होते. प्रस्ताविक चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेचे शाखा व्यवस्थापन पांडुरंग घाडगे यांनी तर आभार प्रदर्शन स्वाती लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन शैलजा लुंगारे व पूजा कोरफळकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी चाटे शिक्षण समूहाच्या टिचिंग नॉन-टिचिंग टीमने उत्कृष्ट नियोजन व परिश्रम घेतले.

Beyond the Study या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासापुरतेच नव्हे तर स्पर्धा परीक्षांच्या दिशेने योग्य मार्गदर्शन मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## विज्ञान प्रदर्शनात वखारिया विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

विज्ञान प्रदर्शनात उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयाच्या साहित्यास तृतीय स्थान मिळाले.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३व्या जयंतीनिमित्त शिवाजी महाविद्यालयाने आयोजिलेल्या या प्रदर्शन स्पर्धेत राधिका पवार व कार्तिकी बुरगुटे यांनी मांडलेल्या 'ब्लाइंड स्टीक फॉर ब्लाइंड पीपल या विज्ञान साहित्यास हे यश मिळाले. त्याचे बक्षीस वितरण बी.एड.कॉलेजचे प्राचार्य शिखरे, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य शेख यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक गटातून ७७ प्रयोग साहित्य मांडण्यात आले होते.

विद्यालयाने मिळिवलेल्या यशाबद्दल संस्था पदाधिकारी अध्यक्ष डॉ. बी.वाय.यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी.पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे यांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, मार्गदर्शक शिक्षक मकरंद जगदाळे, रेवणसिद्ध दुलंगे आणि सहभागी मुलींचे अभिनंदन केले.

# 'दक्षिण'मध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार व कॉँग्रेस आघाडी?

- राष्ट्रवादी पदाधिकारी कॉँग्रेस भवनमध्ये
- राष्ट्रवादीबरोबर आघाडीला कॉँग्रेस कार्यकर्त्यांचा विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ११ जानेवारी -**

गेल्या काही वर्षांपासून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका न झाल्याने पक्षाचे कार्यकर्ते निवडणूकीच्या प्रतिक्षेत आहेत. याच पार्श्वभूमीवर दक्षिणच्या राजकारणात दररोज नवनवीन राजकीय घडामोडी होताना दिसून येत आहेत. भाजपाविरोधात सर्व पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढविण्याच्या चर्चा सुरू असून त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष सुभाष पाटील यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी कॉँग्रेस भवनमध्ये जिल्हा अध्यक्ष सातलिंग शटगार यांची भेट घेऊन आघाडीबाबत चर्चा केली.

मंद्रूपसह जिल्हा परिषद गटात भाजपा



व कॉँग्रेस पदाधिकारी निवडणुकीसाठी सक्रीय होऊन व्यूहरचना आखत आहेत. म्हणून महायुतीमधील घटक पक्ष असणाऱ्या राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार महाविकास आघाडी पक्षातील कॉँग्रेस कमिटीकडे आघाडी करण्यासाठी गेल्याचे दिसून येत आहे.

दहा वर्षापासून आमदार सुभाष देशमुख यांनी कोट्यावधी रूपयांची विकासकामे करून भाजपाला सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहोचविले आहे. तर दुसरीकडे तालुक्यात कॉँग्रेसला मानणाऱ्या मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत राष्ट्रवादी उमेदवार निवडून आणण्यासाठी मंद्रूपचे राष्ट्रवादीचे नेते व तालुकाध्यक्ष कॉँग्रेस भवन येथे जाऊन जिल्हाध्यक्ष शटगार यांच्याशी आघाडीबाबत चर्चा केल्याचे सांगण्यात येत आहे.

मात्र कॉँग्रेसच्या स्थानिक कार्यकर्त्यांकडून आघाडी आम्ही होवू देणार नसल्याचे सांगत आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे राष्ट्रवादी व कॉँग्रेसची आघाडी होणार का ? याकडे तालुकावासियांचे लक्ष लागून राहीले आहे.

**भाजपाविरोधात आघाडी**



राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांच्या आदेशानुसार कॉँग्रेससोबत चर्चा सुरु आहे. तालुक्यात भाजपाला रोखण्यासाठी सर्वपक्षीय आघाडी सुरू असून त्याची तयारी सुरू आहे. आघाडीबाबत वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून निर्णय घेणार आहे.

**- सुभाष पाटील, तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार, दक्षिण सोलापूर**




मंद्रूप जिल्हा परिषद गटाची जागा कॉँग्रेसला मिळू नये, अशी रणनीती काही नेते करत असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात कॉँग्रेस मजबूत असल्याने राष्ट्रवादी अजित पवार गटाशी युती झाल्यास कॉँग्रेसला दक्षिण सोलापूरमध्ये फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते स्वतंत्र लढण्यावर ठाम आहेत.

**- महमद शेख, जिल्हा सचिव, कॉँग्रेस**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# सोमनाथ
## उद्ध्वस्त भिंतींपासून डौलदार कळसापर्यंत

२०२६ हे वर्ष सोमनाथ मंदिरासाठी दोन कारणांमुळे महत्त्वाचे आहे. सन १०२६ मध्ये महमूद गझनवीने मंदिरावर हल्ला करून ते उद्ध्वस्त केले होते, ज्याला १००० वर्षे पूर्ण होत आहेत. तर दुसरीकडे, ११ मे १९५१ रोजी स्वतंत्र भारतात पुनर्निर्मित सोमनाथ मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. पंतप्रधान मोदींनी याला 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' असे नाव दिले आहे. जगप्रसिद्ध सोमनाथ मंदिर आता पुन्हा एकदा चर्चेत आले आहे, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे. सोमनाथ मंदिराच्या ट्रस्टचे मुख्य चेअरमन म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नियुक्ती होणार आहे. हा ट्रस्ट गुजरातच्या गिर-सोमनाथ जिल्ह्यातील सोमनाथ मंदिराची देखरेख करते. या ट्रस्टच्या चेअरमनपदी नियुक्ती होणारे मोदी हे दुसरे पंतप्रधान आहेत. यापूर्वी मोरारजी देसाई असे पहिले पंतप्रधान होते ज्यांना सोमनाथ मंदिर ट्रस्टचे चेअरमन म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

इतिहासकारांच्या मते, सोमनाथ मंदिराला १७ वेळा नष्ट करण्यात आले आहे आणि प्रत्येकवेळी या मंदिराची पुनर्रचना करण्यात आली आहे. प्राचीन भारतीय इतिहास आणि आधुनिक भारताच्या इतिहासात सोमनाथ मंदिराला १०२४ मध्ये महमूद गजनवीने पूर्णपणे नष्ट केले होते. मूर्ती तोडण्यापासून ते मंदिरावर चढवण्यात आलेल्या सोने-चांदीच्या सर्व दागिन्यांना लूटून नेले होते.

### सोमनाथ शिव मंदिराचा इतिहास

सोमनाथमध्ये दुसरे शिव मंदिर वल्लभीचे यादव राजांनी इसवी सन ६४९ मध्ये बनवले होते. याला इसवी सन ७२५ मध्ये सिंधचे गव्हर्नर अल-जुनैदने नष्ट केले होते. त्यानंतर गुर्जर प्रतिहार वंशचे राजा नागभट्ट द्वितीयने इसवी सन ८१५ मध्ये तिसऱ्यांदा शिव मंदिराची रचना केली.

त्यानंतर चालुक्य राजा मुलराजने इसवी सन ९९७ मध्ये या मंदिराचे नूतनीकरण केले. ईसवीसन १०२४ मध्ये सोमनाथ मंदिराला तुर्क शासक महमूद गजनवीने तोडले. महमूदने मंदिरातून जवळपास २० लाख दिनार लूटून नेले. या क्रुरकर्म्याने मंदिराचे रक्षण करणाऱ्या जवळपास ५० हजार नागरिकांची कत्तल केली.

महमूदच्या हल्ल्यानंतर राजा कुमारपालने इसवी सन ११६९ मध्ये उत्कृष्ट दगडातून या मंदिराची पुनर्रचना केली. पण, अलाउद्दीन खिलजीने गुजरात विजयदरम्यान ईसवी १२९९ मध्ये नष्ट केले. या मंदिराची पुनर्रचना सौराष्ट्रचे राजा महिपाल यांनी इसवी सन १३०८ मध्ये केली. १३९५ मध्ये या मंदिराला पुन्हा एकदा गुजरातचे शासक जफर आणि महमूद बेगडा यांनी तोडून अपवित्रही केले होते.

सोमनाथ मंदिराला सन १६६५ मध्ये मुघल सम्राट औरंगजेबने अशा पद्धतीने नष्ट केले होते की याची पुनर्रचना केलीच जाऊ नये. नंतर सोमनाथ मंदिराच्या स्थानावर १७०६ मध्ये एक मशीद बनवण्यात आली. १९५० मध्ये मंदिराच्या पुनर्रचनेदरम्यान या मशिदीला येथून हटवण्यात आले.

### सोमनाथ मंदिराचे मराठी कनेक्शन

वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने सोमनाथ मंदिर ध्वस्त केले. इंदूरच्या महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी १७८३ मध्ये पुण्याच्या पेशव्यांसोबत मिळून विखुरलेल्या सोमनाथ मंदिराजवळ वेगळ्या मंदिराची निर्मिती केली. मंदिराचे गर्भगृह जमिनीखाली तयार केले जेणेकरून महादेवाला विध्वंसक शक्तींपासून दूर ठेवले जावे. सध्या या मंदिराला जुने सोमनाथ मंदिर किंवा अहिल्याबाई मंदिर म्हणून ओळखले जाते.

### काय आहेत सोमनाथची वैशिष्ट्ये...

#### चंद्रदेवाशी संबंधित एकमेव शिव तीर्थक्षेत्र

अशी मान्यता आहे की चंद्रदेव (सोम) यांनी भगवान ब्रह्माचे पुत्र राजा दक्ष प्रजापती यांच्या २७ कन्यांशी विवाह केला होता, पण ते फक्त रोहिणीवर प्रेम करत होते. यामुळे दक्ष संतप्त झाले आणि त्यांनी त्यांना क्षयरोगाचा शाप दिला. देवता चंद्रदेवांना सोमनाथला घेऊन आले. येथे त्यांनी शिवाची कठोर तपस्या केली. भगवान शिवाने त्यांना आंशिक मुक्ती दिली. शिव येथे सोमनाथ म्हणजे सोम (चंद्र)चे नाथ म्हणून ओळखले जाऊ लागले. याच कारणामुळे हे मंदिर चंद्राशी संबंधित एकमेव शिव तीर्थक्षेत्र मानले जाते.

#### दक्षिणेला ६००० किमीपर्यंत कोणतीही जमीन नाही

सोमनाथ मंदिर २०.८९ अंश अक्षांश आणि ७०.४० अंश रेखांशावर आहे. मंदिराचे शिखर ज्या दिशेला आहे, त्याला निष्कलंक अक्षांश म्हणतात. सोमनाथपासून दक्षिणेकडे सुमारे ६००० किमीपर्यंत कोणतीही भूमी येत नाही. तथापि, पूर्व-पश्चिमेला लहान लहान बेटे नक्कीच आहेत. मंदिर परिसरातील बाणस्तंभावर संस्कृतमध्ये (आसमुद्रांत दक्षिण ध्रुव पर्यंत अबाधित ज्योतिरमार्ग) आणि दुसऱ्या बाजूला इंग्रजीमध्ये एक शिलालेख आहे. त्यावर लिहिले आहे - या बिंदूपासून दक्षिण ध्रुवापर्यंत सरळ रेषेत कोणताही अडथळा नाही.

#### समुद्रकिनारी असूनही, गर्भगृहापर्यंत लाटा येत नाहीत

**सोमनाथ मंदिर अरबी समुद्राच्या काठी आहे, तरीही शतकानुशतके समुद्राच्या लाटा गर्भगृहाला कधीही स्पर्श करत नाहीत. ही शिवाची कृपा मानली जाते. स्थानिक पंडितांचे म्हणणे आहे की, समुद्र आजही महादेवाच्या मर्यादेचे उल्लंघन करत नाही.**

#### १७ वेळा आक्रमकांनी तोडले पण पुन्हा बांधले

**सोमनाथ मंदिरावर परकीय आणि भारतातील मुस्लिम आक्रमकांनी १७ वेळा हल्ले करून ते पाडले. पण, हिंदू शासकांनी पुन्हा पुन्हा मंदिराची निर्मिती केली. म्हणूनच असे म्हटले जाते की, हे एकमेव मंदिर आहे जे प्रत्येक वेळी राखेमधून पुन्हा उभे राहिले.**

### सोमनाथवर हल्ले करणारे आक्रमक


महमूद गझनी | अलाउद्दीन खिल्जी | महमूद बेगडा | औरंगजेब



### महादेवाच्या बारा ज्योतिर्लिंगांमध्ये पहिले

गुजरातच्या सौराष्ट्र क्षेत्रात वेरावल हार्बरमध्ये स्थित सोमनाथ मंदिराची गणना १२ ज्योतिर्लिंगांमध्ये सर्वप्रथम ज्योतिर्लिंगाच्या रूपात होते. या मंदिराची भव्यता इतकी मोठी आहे की येथे लाखोंच्या संख्येने देश-विदेशातील भाविक तसेच, वेगवेगळ्या धर्मांचे परदेशी पर्यटक भेट देत असतात.

### सोमनाथवरच हल्ले का झाले?

#### मंदिरात अफाट खजिना

**मंदिराला राजे, व्यापारी, परदेशी प्रवासी यांच्याकडून मोठे दान मिळत असे.**

#### समुद्राजवळ होते

**गुजरातच्या सौराष्ट्रामध्ये समुद्रकिनाऱ्यावर होते. पश्चिम भारताचे प्रवेशद्वार मानले जात होते.**

#### राजकीय प्रतीक

**प्रसिद्ध स्थळावरील हल्ला आक्रमणकर्त्यांच्या सत्तेचा आणि भीतीचा संदेश देत असे.**

#### कमकुवत स्थानिक सत्ता

**गुजरातमध्ये सत्ता कमकुवत झाल्याचा किंवा अंतर्गत संघर्षाचा फायदा बाहेरील लोक घेत असत.**

## जर्मन चान्सलर फ्रेडरिक आज भारत दौऱ्यावर

**नवी दिल्ली, ११ जानेवारी**

अमेरिकेचे शुल्क, युक्रेन युद्ध आणि वाढत्या जागतिक तणावाच्या पृष्ठभूमीवर जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ सोमवारी दोन दिवसीय भारत दौऱ्यावर येणार आहे. या भेटीदरम्यान, त्यांची अहमदाबादमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत व्यापार, गुंतवणूक, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रावर व्यापक चर्चा होणार आहे.



परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ सोमवारी अहमदाबादमध्ये व्यापक आणि महत्त्वपूर्ण चर्चा करतील. चर्चेचा केंद्रबिंदू व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान आणि जागतिक सुरक्षा आव्हाने राहणार आहे. मोदी आणि मर्झ युक्रेनमधील शांततेच्या शक्यतांवरही चर्चा करतील. ही बैठक व्यापार आणि गुंतवणुकीवर केंद्रित असेल. अमेरिकेने भारतीय वस्तूंवर ५० टक्के शुल्क लादल्यानंतर, भारत युरोपसोबतची आर्थिक भागीदारी अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करीत आहे. यासंदर्भात, जर्मनीसोबतचे आर्थिक सहकार्य धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे. युरोपियन युनियनमध्ये जर्मनी हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. भारत आणि जर्मनीमधील वस्तू आणि सेवांमधील द्विपक्षीय व्यापार २०२४-२५ मध्ये ५१.२३ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, जो भारताच्या एकूण युरोपियन युनियन व्यापाराच्या अंदाजे २५ टक्के आहे. एप्रिल २००० ते जून २०२५ पर्यंत, जर्मनीतून एकूण १५.४० अब्ज डॉलर्सची थेट परदेशी गुंतवणूक भारतात आली. (वृत्तसंस्था)

# इराणमध्ये हस्तक्षेप अमेरिकेला भोवणार

**● मसूद पेझेश्कियान यांची धमकी ● देशविरोधी कट रचणाऱ्यांना फासावर लटकवू**

**तेहरान, ११ जानेवारी**



देशात सुरू असलेली हिंसक निदर्शने आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारवाईच्या धमकीच्या पृष्ठभूमीवर इराणच्या संसदेचे रविवारी आपात्कालीन अधिवेशन बोलावण्यात आले. यावेळी राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांनी संसदेला संबोधित करताना इराणमध्ये हस्तक्षेप केल्यास अमेरिकेला मोठी किंमत चुकवावी लागेल आणि देशविरोधी कट रचणाऱ्यांना फासावर लटकवू ,असा इशारा दिला.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीनुसार इस्लामिक रिपब्लिकवर हल्ला झाल्यास इराणी फौजा अमेरिका आणि इस्रायलमध्ये विध्वंस घडविण्यासाठी सज्ज आहेत. इराणमध्ये हस्तक्षेप सहन करणार नाही. देशातील काही गट अमेरिकेसोबत मिळाले आहेत. कटात सहभागी असणाऱ्यांना फासावर लटकविले जाईल. आतापर्यंत अडीत हजार लोकांना अटक केली असून, त्यांना कठोर शिक्षा केली जाईल. देशाची सुरक्षा धोक्यात येणे आम्ही खपवून घेणार नाही.

देशात सुरू असलेल्या व्यापक आंदोलनामागे परकीय शक्तीचा हात आहे. त्यांनी हल्ला केल्यास सडेतोड प्रत्युत्तर दिले जाईल. कुणाच्याही दवाबापुढे आम्ही झुकणार नाही. इस्रायल आणि अमेरिका पुन्हा हल्ला करू शकते, असे झाल्यास दोन्ही देशांना मोठी किंमत चुकवावी लागेल. देशवासीयांनी सरकारला साथ द्यावी, असे आवाहन पेझेश्कियान यांनी केले. (वृत्तसंस्था)

### इराणला हुकूमशाहीतून मुक्त करणार : ट्रम्प



खामेनेई यांना प्रत्युत्तर देताना ट्रम्प यांनी समाज माध्यमावर केलेल पोस्टमध्ये म्हटले की, इराणला हुकूशाहीतून मुक्त करणे आमचे प्रमुख लक्ष्य आहे. खामेनेई यांच्या नेतृत्वाखालील सध्याच्या सरकारपासून स्वातंत्र्य मिळविण्यात तेथील नागरिकांना अमेरिका मदत करण्यास तयार आहे. आमचे सैन्य इराणविरुद्ध संभाव्य लष्करी कारवाईसाठी प्राथमिक योजनांवर काम करत आहे.

### लष्करी, नौदलाच्या तळांना लक्ष्य करू : गालिबाफ



इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकर गालिबाफ म्हणाले, अमेरिकेने इराणवर हल्ला केला तर इराण गप्प पसणार नाही. इस्रायल आणि मध्य पूर्वेकडे असलेले अमेरिकेचे लष्करी आणि नौदलाच्या तळांना लक्ष्य केले जाईल. देशाला अनेक आघाड्यांवर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. आता ही लढाई केवळ शस्त्रांपर्यंत मर्यादित राहिलेली नाही तर यामध्ये आर्थिक निर्बंध, अपप्रचार आणि सुरक्षेशी संबंधित आव्हानांचाही समावेश आहे.

## 'गुंगीचे औषध देऊन मौल्यवान वस्तू चोरल्या'

**पुणे, ११ जानेवारी**

मोलकरणीने गुंगीचे औषध देऊन माझ्यासह आई-वडिलांना बेशुद्ध करून घरात चोरी केली, असा आरोप माजी आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरने केला असून, पुणे पोलिसांनी या प्रकरणी चौकशी सुरू केली, असे एका अधिकाऱ्याने रविवारी सांगितले.

पूजा खेडकरने बाणेर रोडवरील कुटुंबाच्या बंगल्यात घडलेल्या कथित घटनेची माहिती शनिवारी रात्री उशिरा पोलिसांना दिली, असे अधिकाऱ्याने सांगितले. नुकत्याच कामावर ठेवलेल्या नेपाळी मोलकरणीने तिला आणि दिलीप व मनोरमा खेडकर यांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध केले. त्यांना बांधून ठेवले आणि त्यांचे मोबाईल फोन व काही मौल्यवान वस्तू घेऊन पळ काढला, असा दावा तिने केला आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### अजयच्या 'तानाजी'चा सिक्वल येणार?



**मुंबई** : अजय देवगणचा चित्रपट 'तानाजी' प्रचंड गाजला होता. २०२० मध्ये आलेला हा चित्रपट आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. यात शूरवीर तानाजी मालुसरे यांच्या शौर्याची गाथा मोठ्या पडद्यावर दाखवण्यात आली होती. स्वत: अजय देवगणने ही भूमिका साकारली होत. आता या चित्रपटाच्या सिक्वलची चर्चा सुरू आहे. १० जानेवारीला या चित्रपटाला सहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने अजयने एक पोस्ट शेअर केली. त्यात त्याने सिक्वलचा संकेत दिला आहे. त्याने चित्रपटाचे एक रेखाचित्र शेअर केले आणि लिहिले 'गड आला पण सिंह गेला.....पण कथा अजून संपलेली नाही'. अजयच्या या वाक्यामुळे 'तानाजी' चित्रपटाचा सिक्वल येणार, असा तर्क लावला जात आहे. हा चित्रपट ओम राऊतने दिग्दर्शित केला होता. त्यात काजोल, सैफ अली खान, शरद केळकर यांच्या मुख्य भूमिका होत्या. शरदने यात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली होती, ज्याचे सर्वत्र कौतुक झाले होते.

### राणीच्या 'मर्दानी ३'चे पदार्पण ठरले



**मुंबई** : यश राज फिल्म्स (वायआरएफ) ने 'मर्दानी ३' चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. राणी मुखर्जी अभिनीत हा चित्रपट ३० जानेवारी रोजी प्रदर्शित होईल. वायआरएफचा 'मर्दानी' हा हिंदी चित्रपटसृष्टीतील एकमेव महिला-केंद्रित फ्रँचायझी आहे. 'मर्दानी ३' मध्ये राणी मुखर्जी पुन्हा एकदा पोलिस अधिकारी शिवानी शिवाजी रॉयच्या भूमिकेत दिसणार आहे, जी न्यायासाठी निःस्वार्थपणे लढते. वायआरएफने इंस्टाग्रामवर चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करताना त्याचे पोस्टरही शेअर केले. सोबत लिहिले, जोपर्यंत ती त्या सर्वांना वाचवत नाही, तोपर्यंत ती थांबणार नाही. राणी मुखर्जी 'मर्दानी ३' मध्ये निर्भीड पोलिस अधिकारी शिवानी शिवाजी रॉयच्या भूमिकेत परतली आहे. मर्दानी ३० जानेवारी रोजी तुमच्या जवळच्या चित्रपटगृहांमध्ये सुरू होईल. 'मर्दानी ३'चे दिग्दर्शन अभिराज मिनावाला यांनी केले आहे आणि चित्रपटाची निर्मिती आदित्य चोप्रा यांनी केली आहे.

# हायपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्र अधिक शक्तिशाली

**स्क्रॅमजेट इंजिनची चाचणी यशस्वी**

**ध्वनीच्या वेगापेक्षा पाच पट वेग**



**नवी दिल्ली, ११ जानेवारी**

हायपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्राला अधिक शक्तिशाली करणाऱ्या स्क्रॅमजेट इंजिनची चाचणी यशस्वी झाली. संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात् डीआरडीओने इंजिनची निर्मिती केली. अत्याधुनिक इंजिनच्या यशस्वी चाचणीमुळे ध्वनीच्या वेगापेक्षा पाच पट वेगाने मारा करण्यात हायपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्रे सक्षम असेल.

संरक्षण विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, डीआरडीओ हायपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्राच्या स्क्रॅमजेट इंजिनची घेतलेली चाचणी यशस्वी झाली. यामुळे हायपरसोनिक क्षेपणास्त्रे ध्वनीच्या वेगापेक्षा पाच पट वेगाने मारा करण्यास सक्षम असतील. हायपरसोनिक क्षेपणास्त्रांच्या विकासात हा महत्त्वाचा आहे. ही चाचणी २५ एप्रिल २०२५ रोजी घेण्यात आलेल्या अल्प कालावधीच्या चाचणीवर आधारित असून, यावेळी इंजिनमध्ये काही बदल करून दीर्घ कालावधीची चाचणी घेण्यात आली. या यशस्वी चाचणीने भारताच्या संरक्षण क्षमतेला बळकटी मिळणार आहे. हायपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्र एका तासात ६,१०० किमी वेगाने उड्डाण करण्यास सक्षम आहे. हा वेग ध्वनीच्या वेगापेक्षा पाच पटीने जास्त आहे. उल्लेखनीय कामगिरी अत्याधुनिक एअर-ब्रेथिंग इंजिनद्वारे साध्य झाली. (वृत्तसंस्था)

### क्षेपणास्त्रांच्या विकासात अभूतपूर्व टप्पा : राजनाथ सिंह

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दीर्घ कालावधीच्या स्क्रॅमजेट इंजिनच्या यशस्वी चाचणीबद्दल डीआरडीओ, उद्योग भागीदार आणि शैक्षणिक संस्थांचे अभिनंदन केले. त्यांनी म्हटले, की ही कामगिरी देशाच्या हायपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमासाठी एक भक्कम पाया रचते. हैदराबादस्थित डीआरडीओ प्रयोगशाळेने हायपरसोनिक क्षेपणास्त्रांच्या विकासात एक अभूतपूर्व टप्पा गाठला आहे.

# सोलापूरला समृद्ध करण्यासाठी जनता भाजपासोबतच




**पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन**

**प्रभाग १२ व १३ मधील कॉर्नर सभेस उत्स्फूर्त प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

सोलापूर शहराला विकासाच्या दिशेने नेण्याचा संकल्प भाजपने केला आहे. त्यामुळे सोलापूरला समृद्ध करण्यासाठी सोलापूरची जनता भाजपासोबतच आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १२ आणि १३ मधील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ रविवारी साईबाबा चौक येथे नागरिकांच्या प्रचंड गर्दीत भाजपची भव्य कॉर्नर सभा झाली.

यावेळी व्यासपीठावर आमदार देवेंद्र कोठे, प्रभाग क्रमांक १२ चे उमेदवार विनायक कोंड्याल, सिद्धेश्वर कमटम, सारिका खजुरगी, अर्चना वडनाल, प्रभाग क्रमांक १३ चे उमेदवार सुनिता कामाठी, सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, सुनिता कामाठी, स्थायी समितीचे माजी सभापती राजमहिंद्र कमटम, माजी उपमहापौर प्रवीण डोंगरे, भाजपचे उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा, मंडल अध्यक्ष अक्षय अंजिखाने, सुनिल दाते, सुरेश तमशेट्टी, दत्ता पाटील, शंकर चौगुले, दिनेश घोडके, महादेव घोडके, जनार्दन येमुल, अरुण साळुंखे, शिवाजी साळुंखे उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सोलापूरचे भविष्य ठरणारी ही निवडणूक आहे. सोलापूर शहराचा विकास करण्याची क्षमता फक्त भारतीय जनता पक्षातच आहे. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून सोलापूर शहराचे वैभवात भर टाकण्याचे काम भाजपा सरकारने केले. परंतु विरोधकांनी स्मार्ट सिटीला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. केवळ टीका केल्याने शहराचा विकास होऊ शकत नाही. केंद्रात आणि राज्यात भाजपाचे सरकार आहे. तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रीपद देखील भाजपकडेच आहे. सोलापूर शहराला मिळणारा विकासनिधी भाजपाच्या माध्यमातूनच येणार आहे. त्यामुळे सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सोलापूरकरांनी भाजपच्या उमेदवारांच्या पाठीशी रहावे. विधानसभा निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजना बंद पडेल अशी टीका खासदार प्रणिती शिंदे करत होत्या. परंतु भाजपा सरकारने ही योजना सुरू ठेवली. शहर मध्य विधानसभेचे आमदार देवेंद्र कोठे यांनी आमदार झाल्यानंतर एक वर्षभराच्या आतच १४७ कोटी रुपयांचा निधी शहर मध्यसाठी आणला. परंतु यापूर्वीच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी इतका निधी त्यांच्या १५ वर्षात देखील आणलेला नाही. ज्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले त्यांना महापालिकेच्या निवडणुकीत १०२ उमेदवार देखील मिळत नाहीत हे दुर्दैव आहे. शहरातील लहान मुलांना देखील विचारले तरी ते भाजपाची सत्ता येणार असे सांगत आहेत. त्यामुळे सोलापूरकरांनी भूलथापांना बळी पडून आपले अमूल्य मत वाया जाऊ न देता सत्कारणी लावावे, असे आवाहनही पालकमंत्री गोरे यांनी याप्रसंगी केले.

### बरोबरीच्या पैलवानाला उत्तर द्यायचे असते

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी रविवारी आमदार देवेंद्र कोठे यांच्यावर टीका करताना ''इथून पुढे माझी लढाई आमदार देवेंद्र कोठे यांच्यासोबत असेल'' असे म्हटले होते. यावर पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, ''देवेंद्र दादा, तुम्ही त्यांना उत्तर देऊ नका. उत्तर आपल्या बरोबरीच्या पैलवानाला द्यायचे असते. त्यांच्याकडे कोणताही अजेंडा नसल्यामुळे ते अशी वक्तव्य करत आहेत. आमची लढाई कोण्या एका व्यक्तीसोबत अथवा पक्षाविरुद्ध नाही तर आमची लढाई दररोज पाणी, आयटी पार्क, रोजगार अशा विकासाच्या मुद्द्यांवर आहे, असेही पालकमंत्री गोरे यांनी स्पष्ट केले.

## सोने देण्याचे आमिषाने ५० लाखांची फसवणूक

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

सोने देण्याचे आमिष दाखवून विश्वास संपादन करत नकली नोटा व खोट्या सह्यांचे चेक देऊन तब्बल ५० लाख ९६ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

ही फसवणूक सप्टेंबर २०२३ ते जानेवारी २०२५ या कालावधीत सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात घडली आहे. याबाबत १० जानेवारी गुन्हा नोंद करण्यात आला. यातील फिर्यादी सचिन सुरेश अपराध (रा. टेळे नगर, शेटेवस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी फिर्यादी व त्यांचा मित्र किशोर घोंगडे यांना कमी दरात सोने मिळवून देण्याचे आमिष दाखवले. विश्वास संपादन करण्यासाठी सोन्याचे कॉईन व बिस्कीटे दाखवण्यात आली. त्यानंतर पैशांच्या बदल्यात नकली नोटा व खोट्या सह्यांचे चेक देण्यात आले. तसेच, पोलीसात तक्रार केल्यास पैसे पूर्णपणे बुडतील अशी भीती दाखवून फिर्यादी व त्यांच्या मित्राची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक करण्यात आली. यामध्ये राकेश अण्णा (रा. काकीनाडा, आंध्र प्रदेश), दिपक घुटे (रा. रुईढोकी, धाराशीव) आनंद निंबाळकर (रा. धाराशीव) यांच्या विरोधात याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डोंगरे हे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# इराणमधील असंतोषाचा अन्वयार्थ

इराणमध्ये नव्याने सुरू झालेल्या आंदोलनाने जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. तेथे निदर्शकांविरुद्धच्या सरकारच्या कारवाईत शेकडो लोकांचा बळी गेल्याचे वृत्त असून, त्यामुळे अस्थिरता व अशांततेचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध सामाजिक आणि आर्थिक पृष्ठभूमी असलेल्या नागरिकांच्या सहभागाने अनेक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू आहेत. इराणची सध्याची परिस्थिती तेथील देशांतर्गत समस्या, अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांशी दीर्घकाळापासून सुरू असलेले तणाव आणि इराणी शासक व पाश्चात्त्य शक्ती यांच्यातील अविश्वासाच्या इतिहासामुळे निर्माण झालेली आहे. इराणमधील निदर्शने एका शहरापुरती किंवा एका सामाजिक गटापुरती मर्यादित राहिलेली नाहीत. निदर्शनांत सहभागी असलेल्या नागरिकांमध्ये कामगार, दुकानदार, विद्यार्थी, व्यावसायिक आणि बेरोजगार असे सारेच आहेत. एका तरुणीने सिगारेट ओढताना तिथले सर्वेसर्वा अयातुल्लाह खामेनी यांची प्रतिमा जाळत असल्याचा व्हिडीओ जारी केला. तिचा तो व्हिडीओ जगभर व्हायरल झाला आहे. तेहरानचे युवक आणि युवती देखील, हिजाब परिधान न करता, पाश्चात्त्य संगीतावर नृत्य करीत असल्याचे दिसते आहे. आत्यंतिक धार्मिक बंधने आणि वाढती महागाई ही दोन प्रमुख कारणे या निदर्शनांच्या मागे आहेत. इराणमध्ये महागाई फार वाढली आहे. अन्न, इंधन, भाडे आणि औषधे महाग होत आहेत. इराणी चलनाचे मूल्य कमी झाले आहे. लोकांना नोकऱ्या शोधण्यासाठी किंवा त्यांच्या कुटुंबांच्या पालनपोषणासाठी जास्त संघर्ष करावा लागत आहे. या समस्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या असल्यामुळे व्यापक निराशेचे वातावरण आहे. अर्थव्यवस्थेच्या पलीकडे आणखीही काही विषय आहेत. इराणी शासन-प्रशासन व्यवस्थेत भ्रष्टाचार, पारदर्शकतेचा अभाव आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध हे ते विषय. इराणच्या सरकारने मोठ्या संख्येने सुरक्षा दले तैनात केली. अनेक निदर्शकांना अटक करण्यात आली आहे. संपर्क मर्यादित करण्यासाठी इंटरनेट आणि मोबाईल सेवा प्रतिबंधित किंवा बंद करण्यात आल्या आहेत. कायदा-सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा राखण्यासाठी ही पावले आवश्यक आहेत असा सरकारचा युक्तिवाद आहे. ही आंदोलने प्रतिकूल परकीय शक्तींनी घडवून आणल्याचे सरकार म्हणते. अमेरिका, इस्रायल आणि काही पाश्चात्त्य गुप्तचर संस्थांवर तिथले सरकार संशय व्यक्त करीत आहेत. अमेरिका आणि काही युरोपीय देशांनी इराणी नागरिकांच्या शांततापूर्ण निदर्शनांच्या अधिकाराला पाठिंबा दर्शविला आहे. इराणच्या सरकारकडून होत असलेला बळाचा वापर आणि इंटरनेट बंद करण्यावर टीकाही केली आहे. मात्र, विदेशी शक्ती निदर्शनांना प्रोत्साहन किंवा निधी देत आहेत, असा कुठलाही पुरावा अद्याप गवसलेला नाही. निदर्शकांच्या मागण्या प्रामुख्याने देशांतर्गत आर्थिक आणि राजकीय मुद्यांवर केंद्रित आहेत. तरीही यात परकीय हस्तक्षेप नसेलच, असे मानण्याचे कारण नाही. इराण आणि अमेरिकेत अनेक दशकांपासून शत्रुत्व आहे. इराणचे इस्रायलशी असलेले शत्रुत्व आणि प्रादेशिक संघर्षांमध्ये त्याचा सहभाग हा देखील मुद्दा आहेच. पण, त्या देशाच्या नागरिकांचा असंतोष हेच त्याचे मूळ कारण.

अनेक दशकांपूर्वी झालेल्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणने ज्या राजकीय-धार्मिक व्यवस्थेला स्वीकारले, ती व्यवस्था आजच्या तरुण पिढीला कालबाह्य, दडपशाही करणारी आणि स्वतःच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारी वाटू लागली आहे. इराणची लोकसंख्या तुलनेने तरुण आहे. या तरुणांनी जागतिकीकरण पाहिले आहे, इंटरनेटच्या माध्यमातून जगाशी संपर्क साधला आहे आणि त्यामुळे त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. राज्यकर्त्यांची मानसिकता मात्र अजूनही जुन्या काळातील क्रांतीच्या आठवणीत अडकून पडलेली दिसते. इराणमधील सत्ताधिकार सर्वोच्च धार्मिक नेत्याकडे आहे. अयातुल्लाह खामेनी यांच्याकडे असलेले अधिकार हे निवडणूक प्रक्रियेच्या पलीकडचे आहेत. त्यामुळे जनतेच्या अपेक्षा आणि सत्ताधाऱ्यांचे निर्णय यांच्यातील दरी वाढत चालली आहे. या पृष्ठभूमीवर सुरू झालेली आंदोलने ही केवळ महागाईविरोधी किंवा हिजाबविरोधी नाहीत, तर त्या व्यवस्थेविरोधातील बंडाचे स्वरूप धारण करीत आहेत. यापूर्वीही अनेकदा इराणमध्ये मोठ्या प्रमाणावर निदर्शने झाली होती. प्रत्येक वेळी सरकारने ती कठोरपणे चिरडली. मात्र, यावेळी परिस्थिती वेगळी आहे. या आंदोलनाला केवळ शहरांपुरते किंवा विशिष्ट वर्गापुरते मर्यादित स्वरूप राहिलेले नाही. ग्रामीण भाग, निमशहरी क्षेत्रे आणि पारंपरिकदृष्ट्या सरकारसमर्थक मानले जाणारे वर्गही असंतोष व्यक्त करीत आहेत. इराणचे सरकार परकीय हस्तक्षेपाचा मुद्दा सातत्याने पुढे करीत आहे. इतिहास लक्षात घेता, इराणचा हा संशय पूर्णपणे निराधारही म्हणता येत नाही. इराणचे अणुकार्यक्रम, इस्रायलविरोधी भूमिका, हिजबुल्ला आणि हमाससारख्या संघटनांना दिला जाणारा पाठिंबा आणि आखाती प्रदेशातील प्रभाव वाढवण्याचे प्रयत्न यामुळे अमेरिका आणि त्याचे मित्रदेश अस्वस्थ आहेतच. त्यामुळे इराणमध्ये अस्थिरता वाढल्यास त्याचा अप्रत्यक्ष फायदा अमेरिकेला होऊ शकतो.

यासंदर्भात विचार करताना इराणच्या भौगोलिक परिस्थितीचा प्रादेशिक परिणामही लक्षात घ्यावा लागेल. इराण हा मध्य पूर्व, मध्य आशिया आणि दक्षिण आशिया यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणावर तेलवाहतूक होते. इराणमध्ये दीर्घकालीन अस्थिरता निर्माण झाली, तर जागतिक ऊर्जा बाजारावर त्याचा परिणाम होईल. तेलाच्या किमती वाढतील, महागाई वाढेल आणि त्याचा फटका भारतासारख्या देशांना बसेल. त्यामुळे इराणमधील अंतर्गत प्रश्न हे केवळ त्या देशापुरते मर्यादित म्हणता येणार नाहीत आणि त्यामुळे कोणत्याही एका बाजूने मत व्यक्त करण्याची आवश्यकता नाही. भारताने नेहमीच आपले राष्ट्रीय हित केंद्रस्थानी ठेवून धोरण ठरवले आहे. इराणच्या बाबतीतही भारताला हेच करावे लागेल. मानवी हक्कांचा मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही, पण त्याचवेळी इराणशी असलेले ऐतिहासिक आणि धोरणात्मक संबंधही धोक्यात येऊ देणे भारताच्या हिताचे नाही. महागाई आणि सामाजिक निर्बंधांवरून तसाही तिथल्या निदर्शकांचा मुद्दा सत्तापालटापर्यंत पोहोचू लागलेला आहे. अशा स्थितीचा फायदा अमेरिका घेऊ शकेल. तसे झाले तर इराणमध्ये सध्या असलेली अस्थिरता आणखी वाढेल. त्याचा प्रभाव भारतावर देखील पडू शकतो. भारताने मध्य आशिया, रशिया आणि युरोप या प्रदेशात अस्तित्व निर्माण करण्यासाठी काही प्रकल्पांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. चाबहार बंदर हा त्यातील एक प्रकल्प. पाकिस्तानला बायपास करून अफगाणिस्तान आणि मध्य आशियात भारताला थेट प्रवेश मिळवून देईल असा हा प्रकल्प. भारताच्या प्रादेशिक व्यापार धोरणाचा भाग म्हणून नॉर्थ-साऊथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर हे जाळे उभारले जात आहे. इराणच्या माध्यमातून भारताला रशिया आणि युरोपशी जोडू शकेल असा प्रकल्प. भारत आणि इराण यांच्यात मोठा व्यापारही होतो. इराणमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली तर भारताच्या या सर्व प्रकल्पांवर आणि व्यापारावर परिणाम होईल. त्यामुळे भारताला इराणमधील वर्तमान संकटाच्या संदर्भात फार सावध पावले उचलावी लागतील. आधीच अमेरिकेने भारताचा छळ सुरू केलेला आहे. भारताने थेट इराणची बाजू घेतली तर त्यातून गुंतागुंत निर्माण होईल. भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या प्रयत्नांना खीळ बसेल ती वेगळी. मध्य आशियाच्या हृदयस्थळी इराण वसलेला आहे. तेथील अस्थिरता ही सागरी वाहतूक, आखाती भागातील स्थिरता आणि त्या भागातील भारतीयांच्या दृष्टीनेही संकट निर्माण करणारी ठरू शकेल. त्यामुळे भारताला मुत्सद्दीपणा दाखवावा लागेल. भारताचे इराणशी जुन्या काळापासून संबंध आहेत. अमेरिकेशी असलेले संबंध पूर्णपणे तुटलेले नाहीत आणि तुटण्याची शक्यता नाही. इस्रायलशीही भारताचे संबंध आहेत. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या भाषेत असे म्हणतात की, धोरणात्मक स्वायत्तता हे संकटातून तरून जाण्यासाठीचे माध्यम असते. तीच यावेळी पुन्हा भारताला दर्शवावी लागेल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# तेलाचा जागतिक वणवा!

८५ वर्षे कच्चे तेल उत्पादनाची क्षमता असणाऱ्या व्हेनेझुएलावर कब्जा करून अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला धक्का दिला. या देशाजवळ ३०४ बिलियन बॅरल एवढा प्रचंड भूमिगत तेलसाठा आहे तर तेल उत्पादनात दुसऱ्या क्रमाकांवर असणाऱ्या सौदी अरेबियाजवळ भरपूर तेलसाठा असला तरी तो फक्त ८१ वर्षे पुरेल एवढा आहे आणि ज्या रशियाकडून भारताने तेल आयात बंद करावी अशी मागणी ट्रम्प करीत आहेत, त्या रशियाजवळ तर फक्त २२ वर्षे पुरेल एवढाच तेलसाठा शिल्लक आहे.

**रिलायन्सचा इन्कार** : रशियाचे कच्चे तेल असणारी तीन मालवाहू जहाजे जामनगरच्या वाटेवर आहेत असे एक वृत्त प्रसिद्ध होताच, रिलायन्स समूहातर्फे याचा इन्कार करण्यात आला. मागील तीन आठवड्यांत आमच्याकडे रशियाचे कच्चे तेल आलेले नाही आणि जानेवारी महिन्यात तरी ते येण्याची शक्यता नाही असेही या समूहाने जाहीर केले. भारताने रशियाकडून कच्चे तेल आयात करण्यात मोठी कपात केली आहे याचा हा पुरावा मानला जातो.

**३८ टक्के कपात** : भारताने रशियाकडून तेल आयात बंद केली नसली तरी या आयातीत जवळपास ३८ टक्के कपात केली आहे. वास्तविक भारत ही कपात करण्यास राजी नव्हता. पण, नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेने रशियन जहाज कंपन्या व बँकांवर कडक- कठोर आर्थिक निर्बंध लावल्यानंतर भारतातील तेल कंपन्यांना रशियन तेलाची आयात घटविण्याशिवाय पर्याय उरला नव्हता असे समजते.

**सर्वाधिक आयात** : २०२४ मध्ये भारताने रशियाकडून सर्वाधिक कच्चे तेल आयात केले, जे भारताच्या एकूण आवश्यकतेच्या ३१ टक्के होते. नंतर राष्ट्रपती ट्रम्प यांनी भारताला ही आयात कमी करण्याचा सल्ला दिल्यानंतरही भारताने आपल्या धोरणात बदल न करता रशियातून कच्च्या तेलाची आयात सुरू ठेवली होती. भारताचा निर्णय योग्य असाच होता. कारण, एक सार्वभौम देश म्हणून कोणत्या देशातून काय आयात करावयाचे हा शेवटी भारत सरकारचा अधिकार आहे. मात्र, आता कच्चे तेल भारतात आणण्याऱ्या जहाज कंपन्या व याबाबतचे आर्थिक व्यवहार करणाऱ्या बँका यावरच अमेरिकेने कडक आर्थिक निर्बंध लावल्यानंतर भारतीय सार्वजनिक उपक्रमातील कंपन्या व रिलायन्स उद्योग यांना रशियन कच्च्या तेलाची आयात घटवावी लागली.

**केवळ तेलासाठी** : सौदी अरेबिया हा कच्च्या तेलाचा सर्वांत मोठा उत्पादक व निर्यातक मानला जात असला तरी भूमिगत कच्च्या तेलाचा सर्वाधिक साठा व्हेनेझुएला या देशात आहे. सौदी अरेबियाचा भूमिगत तेलसाठा ८१ वर्षे पुरेल एवढा आहे तर त्या तुलनेत व्हेनेझुएलाचा तेलसाठा ८८५ वर्षे पुरेल एवढा प्रचंड आहे. जगातील एक पंचमांश टक्के तेलसाठा केवळ या एका देशात आहे. सध्या व्हेनेझुएला दररोज एक मिलियन म्हणजे १० लाख बॅरल तेलाचे उत्पादन करतो. हे प्रमाण कायम ठेवल्यास व्हेनेझुएला ८८५ ते ९०० वर्षे तेल उत्पादन करू शकतो. सौदी अरेबियाने प्रगत तंत्रज्ञान वापरून आपल्या तेलसाठ्याचा योग्य तो वापर केला. याने सौदी अरेबियाची भरभराट झाली. त्या तुलनेत व्हेनेझुएलाने आपल्या तेलसाठ्याकडे दुर्लक्ष केले आणि हा देश अतिगरीब म्हणून ओळखला जाऊ लागला. व्हेनेझुएलावर काही प्रमाणात रशियाचे नियंत्रण होते. त्याला शह देण्यासाठी राष्ट्रपती ट्रम्प यांनी नववर्षाच्या प्रारंभी या देशाच्या राष्ट्रपतींचेच 'अपहरण' केले. आता व्हेनेझुएलाच्या राष्ट्रपतींवर न्यू यॉर्कच्या न्यायालयात मादक पदार्थांच्या व्यवहारात सामील असल्याबद्दल खटला चालविला जाणार आहे. अमेरिकेने तेथे सत्ताबदल केल्यानंतर या देशात काय काय घडामोडी घडतात हे दिसण्यासाठी काही काळ जावा लागणार आहे.

दरम्यान, व्हेनेझुएलातील कच्च्या तेलाचे उत्पादन करण्यासाठी मोठ्या अमेरिकन कंपन्यांना तेथे पाठविण्याची घोषणा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केली आहे. ट्रम्प यावरच थांबलेले नाहीत. त्यांनी पुन्हा एकदा भारत, रशियाकडून आयात करीत असलेल्या कच्च्या तेलाचा मुद्दा उपस्थित केला आहे. भारताने ही आयात बंद न केल्यास, आपल्याला पुन्हा भारताविरोधात काही निर्णय घ्यावे लागतील असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. भारताने रशियाकडून तेल आयातीत घट केल्याची बातमी काही प्रमाणात त्यांची नाराजी दूर करू शकते. भारताच्या या निर्णयावर आपण नाराज आहोत असे ते वारंवार सांगत आहेत. रशियाकडून भारतात आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या तेलाचा मुद्दा सोडण्यास ते तयार नाहीत.

**बांगलादेश** : भारत-अमेरिका संबंधात जेवढी कटुता आली आहे, त्यापेक्षा जास्त कटुता भारत-बांगलादेश संबंधात आली आहे. यात पडद्यामागे चीन व पाकिस्तान फार मोठी भूमिका बजावीत आहेत. बांगलादेशात हिंदूंना लक्ष्य केले जात असताना, या देशाने एका क्रिकेट स्पर्धेसाठी भारतात आपला चमू पाठविण्यास नकार दिला. ही एक मोठी घटना मानली जाते. बांगलादेशला भारतविरोधी निर्णय घेण्यास पाकिस्तान व चीन जणू या देशाला भाग पाडीत आहेत आणि तेथील अस्थायी सरकार या दोन्ही देशांचे कठपुतले बनले आहे. पाकिस्तानला १९७१ च्या आपल्या विभाजनाचा हिशेब चुकता करावयाचा आहे तर चीनला भारताचा एक मित्र कमी करावयाचा आहे. दोन्ही देश सध्या भारताच्या विरोधात संयुक्त उपक्रम राबवीत आहेत असे दिसते.

**ट्रम्प यांची नाराजी** : भारत-अमेरिका संबंधात जो तणाव आला आहे तो कमी होणे आवश्यक असल्याचे नवी दिल्लीत मानले जाते. दोन्ही देशांच्या संबंधात एवढी कटुता कधीही निर्माण झाली नव्हती, जी ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात निर्माण झाली आहे.

राष्ट्रपती ट्रम्प यांनी अचानक भारताच्या विरोधात भूमिका घेण्याचे खरे कारण, रशियाकडून भारत आयात करीत असलेले कच्चे तेल हे नाही तर ट्रम्प यांचा अहंकार हे आहे. त्यांच्या अहंकाराला धक्का बसला तो भारत-पाकिस्तान संघर्ष टाळण्यात त्यांची 'मध्यस्थी' भारताने नाकारल्यानंतर. भारत-पाकिस्तान युद्ध थांबविण्यात ट्रम्प यांनी खरोखरीच काही भूमिका बजावली होती काय याचे उत्तर भारत सरकारजवळच असू शकते. राष्ट्रहित विचारात घेता भारत सरकार ते उघड करू शकत नाही हेही एक सत्य आहे. याउलट पाकिस्तानने हा संघर्ष संपविण्याचे सारे श्रेय राष्ट्रपती ट्रम्प यांना दिले. याने ते निश्चितच सुखावले आणि भारताने ते नाकारल्याने ट्रम्प भारतावर रागावले.

**आता चीनचाही दावा** : मागील आठवड्यात चीननेही असाच दावा केला आहे. भारत-पाकिस्तान संघर्ष थांबविण्यात आम्हीही मध्यस्थी केली असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. या दाव्यात किती तथ्य आहे याची कल्पना नाही, पण या युद्धासाठी चीनने पाकिस्तानला गोळाबारुद पुरविला हे मात्र सत्य आहे. पाकिस्तानने भारताच्या विरोधात वापरलेली ८१ टक्के शस्त्रे-प्रक्षेपणास्त्रे चिनी होती हे सिद्ध झालेच आहे.

**सलोखा आवश्यक** : भारत-अमेरिका संबंधात म्हणजे ट्रम्प- मोदी संबंधात बिघाड आणणारे खरे मुद्दे कोणते आहेत याची भारत सरकारला पूर्ण जाणीव आहे. त्यातील काही मुद्यांवर आता काहीही करता येणार नाही हेही भारत सरकारला माहीत असावे. जगाचे सत्तासंतुलन फार बिघडू नये आणि याचा फायदा चीनने उठवू नये हे भारताच्या हिताचे आहे. बांगलादेशची भारताच्या विरोधातील मुजोरी आणि पाकिस्तानची मग्रुरी चीनच्या पाठिंब्याशिवाय सुरू नाही हे तर सर्वांच्याच लक्षात येत आहे. आता वेळ आली आहे, चीनला शह देण्यासाठी भारताने अमेरिकेशी सलोखा करण्याची.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# लोको पायलट तुपाशी, एसटी चालक उपाशी

'माणसाने माणसाशी माणसासम वागणे, हीच आमुची प्रार्थना, हेच अमुचे मागणे,' असे म्हणत आपणच सर्वांना समान लेखण्याचा विचार मांडतो. पण प्रत्यक्षात व्यवस्थाच समान काम करणाऱ्यांमध्ये तुलना करीत, त्यांना वेगवेगळे मापदंड लावत असते. याच कारणाने आज भारतीय रेल्वेत कार्यरत लोको पायलट तुपाशी, तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक उपाशी आहेत. हा प्रकार किती दिवस सहन केला जावा, यावर आता उपाययोजना करायची वेळ आलेली आहे. महाराष्ट्रात एसटी महामंडळात १ लाख २ हजारपेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत. यात १५ हजारांपेक्षा जास्त चालक कार्यरत आहेत. एसटी गाड्यांची संख्या १८ हजार ४४९ आहे. दररोज एसटीतून सरासरी ७० लाख प्रवासी प्रवास करून आपल्या घरी सुरक्षितपणे जातात. ही सेवा त्यांना राज्यातील २४७ आगार आणि ५७८ बसस्थानकांमार्फत मिळत आहे. सर्व एसटीचा डोलारा हा पूर्णतः चालकांच्या कौशल्यावरच चालतो. एसटी चालकाच्या पगाराची सुरुवात ही १७ ते २० हजार रुपयांनी होते. त्यांना राज्यात सर्वत्र बस न्यावी लागते. रात्रीला मुक्कामही करावा लागतो. पूर्वी रात्रीला चालक आणि वाहकाने मुक्काम केल्यास केवळ ७ रुपये मिळायचे. पण आता ती रक्कम ७० रुपये झाली आहे. चालक आणि वाहकांना गणवेश धुण्यासाठी महिन्याला १०० रुपये मिळतात. रात्री ग्रामीण भागात मुक्काम करायचा असेल तर दोघांनाही गाडीतच झोपावे लागते. तिथे डासांचे प्राबल्य शिवाय प्रसाधनगृह नसल्याने त्यांना अनंत यातना होतात. परिणामी त्यांची झोप अपुरी होते. त्याचाही परिणाम सेवेवर होतो. याचा विचारच केला जात नाही. त्याचवेळी रेल्वेतील लोको पायलटला मात्र क्लास वननुसार सोईसुविधा मिळतात. लोको पायलटवर हजारो प्रवाशांची जबाबदारी असते. अगदी अशीच जबाबदारी एसटीत कार्यरत चालकांवरही असते. केवळ प्रवाशांची संख्या कमी असते. पण रेल्वेतील प्रवासी आणि एसटीतून प्रवास करणाऱ्या नागरिकांचा जीव सारखाच आहे ना? मग दोघांची जबाबदारी सारखीच असल्याने सोईसुविधांमध्ये भेदभाव का करायला हवा, हाच आजचा मुद्दा महत्त्वाचा आहे.

लोको पायलटला सुविधा मिळते त्याला कुठल्याही सुज्ञ व्यक्तीचा विरोध नाही. कारण तेही फार मोठे कार्य करीत आहेत. पण त्यांचा जेव्हा तुम्ही चांगला विचार करता तेव्हा एसटी महामंडळातील चालकांचा आणि वाहकांचा विचारही माणसासम करायला हवा ना? ग्रामीण भागात बहुतांश गावात समाजभवनाची निर्मिती झालेली आहे. तिथे ग्रामपंचायतींनी चालक आणि वाहकांसाठी सोईसुविधा द्यायला हव्यात. नव्हे तसाच करार एसटी महामंडळाशी झालेला आहे. पण त्याचे कुणीही पालन करीत नाही. उलट एसटी चालक आणि वाहकाशी आपल्याला काय देणे-घेणे असे म्हणत ग्रामपंचायतसुद्धा त्यांच्याकडे दुर्लक्ष करते. म्हणजे तिकडे महामंडळ सोईसुविधा देत नाही, तर ज्यांनी करार केला तेही त्याचे पालन करीत नाही. या स्थितीत चालक आणि वाहकांचा विनाकारण बळी जातो. त्याचवेळी आपला लोको पायलट सुरक्षित आणि तणावमुक्त राहावा यावर भारतीय रेल्वे विशेष भर देते. त्यांच्या कुटुंबीयांना समुपदेशन करून तुमचा पती अर्थात लोको पायलट देशासाठी किती महत्त्वाचा हे पटवून देते. येथे उलटेच आहे. एसटी महामंडळात चालकाने अपघात केल्यावर त्याचे समुपदेशन केले जाते. त्याला चूक पुन्हा करू नको म्हणून प्रशिक्षण दिले जाते. मग तीच गोष्ट एसटी महामंडळात अपघातापूर्वी का नाही केली जात, यावरही संशोधन करावे लागेल. एसटी महामंडळानेही चालक आणि वाहकांच्या कुटुंबीयांना एकत्र आणून त्यांचे समुपदेशन करायला हवे. त्यांनाही 'तणाव ठेवा घरी, गाडी चालवा बरी' याचे सूत्र समजावून सांगायला हवे. एसटी चालकही दररोज ३०० किलोमीटर वाहन चालवितो. त्यालाही बसमधील सरासरी ७० प्रवाशांना सुरक्षितपणे त्यांच्या गावी सोडायचे असते. त्यांचेही कार्य सोपे नाही.

रेल्वेची स्वतःची यंत्रणा फूलप्रूफ आहे. रेल्वे रुळांवर चालते तर एसटी चालकाला रस्त्यावरील यमांच्या मधून सुरक्षितपणे मार्ग काढून प्रवास करावा लागतो. तसे पाहता एसटी चालकांचे कार्य महाकठीण आहे. असे महाकठीण कार्य दररोज न चुकता व्यवस्थित जे चालक करतात, त्यांचा व्यापक दृष्टिकोनातून विचार व्हायला हवा. त्यांनाही चांगला पगार, सोईसुविधा द्यायला हव्यात. चालकांनाही आपल्या कार्यावर अभिमान वाटावा अशी एसटीची नोकरी भविष्यात व्हावी. जेव्हा असे होईल त्या दिवशी खरोखरच आपल्या महाराष्ट्रातील लालपरीने प्रवास करणारेही सुखावतील अन् चालक मनोमन महामंडळाचे आभार मानतील.

९८८१७१७८५९


## कानोसा

**अमोल पुसदकर**

# स्वामी विवेकानंदांची भारतभक्ती

१६ जानेवारी १८९७ रोजी कोलंबो येथील फ्लोरल हॉल या ठिकाणी स्वामी विवेकानंदांनी आपले पहिले विदेशातील जाहीर व्याख्यान दिले होते. आपल्या या भाषणात ते म्हणतात की, पूर्वी कदाचित भावनेच्या भरामध्ये ज्यावर मी विश्वास ठेवीत असे, ते आता माझ्यासाठी ठाम प्रमाण सिद्ध सत्य होऊन बसले आहे. पूर्वी सगळ्या हिंदूंप्रमाणे मलाही वाटत असे की भारत पुण्यभूमी आहे, भारत ही कर्मभूमी आहे. परंतु आज आपल्या समोर उभा राहून मी अगदी ठासून सांगू शकतो की हे सत्य आहे, नितांत सत्य आहे, त्रिवार सत्य आहे. या पृथ्वीच्या पाठीवर जर असा कोणता देश असेल की ज्याला पुण्यभूमी हे गोड नाव यथार्थपणे देता येईल; जर असे कोणते एखादे स्थान असेल की जिथे जगामधील सर्व जीवांना आपल्या कर्मफलाचा उपयोग घेण्यासाठी यावे लागेल; जर असे एखादे ठिकाण असेल की भगवत लाभाची आकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येकाला अंती जिथे येऊन दाखल व्हावेच लागेल; जर असे एखाद्या स्थान असेल जिथे माणसात कोमलता, शुचिता, दया, दाक्षिण्य, क्षमा इत्यादी सद्गुणांचा इतर कुठल्याहीपेक्षा अधिक विकास झाला आहे; जर अशी कोणती एखादी भूमी असेल जिला अंतर्दृष्टीचे आणि आध्यात्मिकतेचे माहेरघर म्हणता येईल तर ती म्हणजे आपली ही मायभूमी भारतच होय.

भारत आणि भारतीयांबद्दल स्वामीजींच्या मनामध्ये अत्यंत प्रेम होते. परंतु इतर देश, त्यांची संस्कृती, त्यांची सभ्यता पाहिल्यानंतर त्यांना असे लक्षात आले की, चार-दोन यंत्र बनविणाऱ्या या लोकांचा आपण इतका उदो-उदो करत आहोत, परंतु त्यांचा माणूस म्हणून अद्याप फारसा विकास झालेला नाही. ते म्हणतात की, कोट्यवधी स्त्री-पुरुषांच्या जीवनाचा दाह करणारा, त्यांची हृदये करपून टाकणारा जडवादाचा अग्नी विझविण्याचे सामर्थ्य असलेला अमृतोपम शांतिजलाचा अक्षय ठेवा एक मात्र या आपल्या भारत भूमीतच विद्यमान आहे. जगामधील विविध धर्म, त्यांची कार्यपद्धती, त्यांचे अनुयायी पाहिल्यानंतर स्वामीजी म्हणतात की, परधर्म सहिष्णुता ही गोष्ट जगाने भारतापासूनच शिकायला हवी. ते म्हणतात की, हीच केवळ भूमी आहे ज्या भूमीमध्ये आम्ही मुसलमानांना मशीद बांधून दिलेली आहे, ख्रिश्चनांसाठी आम्ही चर्च बांधलेले आहे. त्यामुळे परधर्म सहिष्णुता जर कोणाला जगात कुठेही बघायची असेल तर ती केवळ या भारत भूमीतच बघता येईल. ते म्हणतात की, एखाद्या मुस्लिम राष्ट्रामध्ये एखाद्या ख्रिश्चनाला चर्च बांधून मिळणार नाही आणि ख्रिश्चन राष्ट्रांमध्ये सुद्धा तेथील लोक एखाद्या मुस्लिम धर्मीयाला मशीद बांधून देणार नाही. परंतु आमच्या देशातील सभ्यता अशा पद्धतीची आहे की तिने परमेश्वराला कुठल्याही नावाने हाक मारणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या



त्याच्या उपासना पद्धतीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. एवढेच नव्हे तर त्यांची प्रार्थनागृहे सुद्धा आम्ही बांधून दिलेली आहे. स्वामीजी म्हणतात की, संपूर्ण विश्वामध्ये धर्माच्या नावावर केवळ तिरस्कार आणि विद्वेष सुरू आहे. त्या सर्वच लोकांनी भारताच्या आश्रयाला आले पाहिजे आणि येथून शिक्षण ग्रहण केले पाहिजे. स्वामीजी म्हणतात, आपला भारतच जगाला अध्यात्माचे पसायदान देणार आहे.

स्वामीजी म्हणतात की, प्राचीन आणि वर्तमानकाळी काही जातींच्या जीवनाच्या लोंढ्याबरोबर महान शक्तिशाली सत्यांची बीजे इकडे-तिकडे विखुरली गेली आहेत. पण माझ्या मित्रांनो, लक्षात ठेवा त्या साऱ्यांचा प्रचार झाला आहे रणशिंगाच्या कर्कश निनादाने, रणसाज चढविलेल्या बेगुमान सैनिकांच्या धुमाळीमध्ये, मानवी रक्तात भिजविल्याशिवाय लाखो बांधवांचे रक्त सांडविल्याशिवाय यातील कोणतीही जात दुसऱ्या जातीला आपला विचार व सिद्धांत देऊ शकलेली नाही. यातील प्रत्येक ओजस्वी सिद्धांताच्या प्रचाराबरोबरच उठले आहेत लाखोगणती निरपराध लोकांचे हाहाकार, उसळले आहेत अनाथ बालकांचे चित्कार, वाहिले आहेत दीन विधवांचे अश्रू. परंतु भारत या उपायांची कास न धरताही हजारो वर्षे जिवंत आहे.

स्वामीजी म्हणतात, आमचे राष्ट्र अति प्राचीन राष्ट्र आहे. जेव्हा ग्रीस अस्तित्वात देखील नव्हता, रोम अजून जन्माला यायचा होता, ज्यावेळी आधुनिक युरोपियन यांचे पूर्वज जर्मनीच्या घनदाट जंगलात असभ्य दशेत खितपत, निळ्या रंगाने आपली अंगे रंगवीत असत, तेव्हाही त्याकाळीही भारत क्रियाशील होता. इतिहासाला ज्या काळाची माहिती नाही, दंतकथा ही ज्या काळाच्या घनांधकाराचा भेद करू शकत नाही त्या अति प्राचीन काळापासून वर्तमान काळापर्यंत कल्पनामागून कल्पना आणि सिद्धांतांमागून सिद्धांत, विचारांमधून विचार या भारतातून बाहेर गेले आहेत. परंतु त्या सर्वांच्या, त्यातील प्रत्येकाच्या पुढे शांती आणि मागे आशीर्वाद होता.

स्वामी विवेकानंद हे योद्धा संन्यासी होते. त्यांना जीवनाच्या सर्वच स्तरांमध्ये संघर्ष करावा लागला. ते जगविख्यात झाले, परंतु त्यांचा प्रवास हा सोपा नव्हता. घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे जेव्हा त्यांना नोकरीची आवश्यकता होती तर त्याही वेळेस कोणी त्यांना मदत केली नाही. स्वतःच्या भरवशावर ते ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून लागले होते. परंतु तेथील राजकारणाने त्यांना शाळा सोडण्यास बाध्य केले. जेव्हा ते अध्यात्माकडे आकर्षित झाले त्यावेळेस बुद्धीमधील नाना तर्क आणि कुतर्क, समाजबांधवांनी त्यांची केलेली उपेक्षा, कौटुंबिक अडचणी या सर्व पृष्ठभूमीवर संन्यासी होणे हे सुद्धा त्यांच्यासाठी सोपे नव्हते. सर्वधर्म परिषदेसाठी शिकागोला जाण्यासाठी सुद्धा जे मदत करतील असे वाटत होते त्यांनी सुद्धा मदत केली नाही. कसेबसे अमेरिकेला पोहोचल्यावर तेथे सुद्धा त्यांना राहणे, खाणे आणि इतर व्यवस्था करण्यासाठी संघर्ष करावा लागला. स्वामीजी म्हणतात, येणारी ५० वर्षे तरी भारत माता ही आपल्यासाठी सर्वोच्च आराध्य देवता असायला पाहिजे. आजही धर्मांध आणि कट्टरवादी शक्ती भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात थैमान घालीत आहेत. त्यांच्यामुळे शांत आणि सहिष्णू लोकांचे जीवन धोक्यामध्ये येत असते. बांगलादेशमध्ये घडणाऱ्या अत्याचाराच्या घटना या आपल्याला हेच सांगत आहेत. स्वामीजींनी या असहिष्णू लोकांना ओळखले होते. विश्वाच्या शांतीसाठी हे लोक धोका आहेत हे सुद्धा त्यांनी ओळखले होते. स्वामीजींनी आपल्या देशबांधवांना तुम्ही द्वेष आणि मत्सराचा त्याग करा हा संदेश दिलेला आहे. स्वामीजींच्या जयंतीनिमित्त देशामध्ये आणि विदेशामध्ये काम करणाऱ्या सर्व भारतप्रेमी शक्तींनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. स्वामी विवेकानंदांचे शक्तिशाली भारताचे स्वप्न, जगद्गुरू भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी भारत मातेच्या सुपुत्रांनी प्राथमिकतेने, परिश्रमपूर्वक तन-मन-धन समर्पित करून कार्य करणे हे स्वामी विवेकानंदांचे कृतज्ञ स्मरण ठरेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## महान तत्त्वज्ञ, समाजसुधारक स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारतातील महान तत्त्वज्ञ, समाजसुधारक आणि युवकांचे प्रेरणास्थान होते. त्यांनी भारतीय संस्कृती, वेदांत तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांचा संदेश केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात पोहोचवला. त्यांचे विचार आजही मानवजातीला दिशा देणारे आहेत. स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त होते. वडील विश्वनाथ दत्त हे वकील होते, तर आई भुवनेश्वरी देवी धार्मिक आणि संस्कारशील होत्या. लहानपणापासूनच नरेंद्रनाथ बुद्धिमान, धाडसी आणि प्रश्न विचारणारा स्वभावाचा होता. आध्यात्मिक सत्याचा शोध घेण्याची तीव्र जिज्ञासा त्यांच्यात होती. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे मानवाचा सर्वांगीण विकास. आत्मोन्नती, सामाजिक सेवा, राष्ट्रप्रेम आणि आध्यात्मिक जागृती या मूल्यांवर त्यांनी भर दिला. त्यांनी तरुणांना दुर्बलता सोडून सामर्थ्याची जाणीव करून दिली आणि भारताला आत्मगौरवाची भावना दिली. स्वामी विवेकानंद यांचे विचार हे केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नाहीत, तर आजच्या युगातही तितकेच मार्गदर्शक आहेत. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या प्रगतीसाठी आत्मविश्वास, ज्ञान, सेवा आणि मानवता या मूल्यांचा अंगीकार करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब केल्यास एक सशक्त, सुसंस्कृत आणि प्रगत समाज निर्माण होऊ शकतो. स्वामी विवेकानंद यांचे जीवन त्याग, सेवा आणि विचारांचे प्रतीक होते. त्यांनी युवकांना ''उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका'' असा संदेश दिला. त्यांनी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनद्वारे आजही समाजसेवेचे कार्य सुरू आहे. स्वामी विवेकानंद हे केवळ संन्यासी नव्हते, तर ते राष्ट्रनिर्माते होते. त्यांच्या विचारांतून आत्मबल, राष्ट्रीय एकात्मता आणि मानव कल्याणाची प्रेरणा मिळते. आजच्या काळात त्यांच्या विचारांची अधिक गरज आहे. स्वामी विवेकानंद यांचे जीवन आणि विचार हे प्रत्येक भारतीयासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहेत.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### प्रभाग पद्धतीचे फायदे व तोटे




फार आधी महानगरपालिकेची निवडणूक वॉर्ड स्तरावर व्हायची. तीन चार वस्त्या मिळून ५०००/५५०० हजार मतदार राहायचे. मग दोन वॉर्डांचा प्रभाग झाला तर प्रभागाचा विस्तार वाढला व मतदार २०००० पर्यंत झाले. मग आला चार वॉर्डांचा प्रभाग. विस्तार खूप मोठा (आमचा प्रभाग १३ हा १६ किलोमीटर पसरलेला आहे) मतदार ६००००च्या आसपास.

फायदे : आपापल्या गल्लीत स्वयंभू नेते असणारे व शे-दीडशे मतदान मिळवू शकणारे उभे राहात नाहीत. पक्षांतर्गत बंडाळी कमी झाली.

तोटे : या उक्तीनुसार चारही नगरसेवक आपापले काम व्यवस्थित करत नाहीत.

काम न झाल्यास मिळणारी उत्तरे ''हा माझा भाग नाही'', ''तो त्याचा भाग आहे'', ''मला वाटले तो करेल'' म्हणजे जबाबदार चारपैकी एकही नाही. प्रभागाचा पसारा मोठा असल्याने प्रत्यक्ष जनसंपर्क व महिन्यातून एकदा तरी एक भाग फिरून तिथल्या समस्या जाणून, सोडवण्याचा प्रयत्न होऊ शकत नाही. ही एक मिनी आमदाराची निवडणूक होते. पैसा, मनुष्यबळ याची आवश्यकता पाहता सामान्य समाजसेवक निवडणूक लढवू शकत नाही, लढला तर जिंकणे कठीण होते.

आज सर्वोदयी नेते मा. ज. कानेटकरांची आठवण होते. आम्ही लहान असताना एक धोतर, कोट घालून व पिशवी घेऊन एक आजोबा मैदानात आले. त्यांनी पाच रुपयांची पिशवी व पन्नास रुपये निवडणूक अनामत जमा केल्याची पावती दाखवली. त्यांचे चिन्ह शिडी असल्याने आमची वानरसेना शिडी खांद्यावर तिरडीप्रमाणे घेऊन ओरडत फिरायला लागलो. आमच्यातला जरा मोठा व समजदार कृष्णा बावणेने हे आमचे धंदे बंद केले व कानेटकर आजोबांना त्यांच्या निवडणुकीत उभे राहण्याचे कारण विचारले, त्यांचे उत्तर ऐकून आम्हा मुलांना फार लाज वाटली. ते म्हणाले, ''मी एक सामान्य माणूस आहे, मला या उभे असणाऱ्या कोणालाही मत द्यायचे नाही तर विरोध करायचा आहे. मी स्वतः उभा राहीन व माझे एक मत स्वतःला देऊन त्यांचा विरोध नोंदवीन.'' हे ऐकून आम्ही स्वखुशीने त्यांच्या शिडी चिन्हाच्या भिंती रंगवल्या (तेव्हा ते चालत होते) व जमेल तसा प्रचार केला. त्यांना पंधरा-वीस मते मिळाली असतील, पण व्यवस्थेला विरोध करण्याचे पूर्ण समाधान मिळाले असेल. निवडणुकीस्य कथा रम्या.

**रवी वाघमारे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### शासकीय रेखाकला परीक्षेत इंडियन मॉडेल स्कूलचे दोघे राज्य गुणवत्ता यादीत

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**



महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यावतीने सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला एलिमेंट्री व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झालेला असून या परीक्षेमध्ये राज्य गुणवत्ता यादीत शाळेने १००% निकालाची परंपरा कायम ठेवत उत्तुंग यश मिळवले आहे. प्रशालेतील इयत्ता ७ वीत शिकणारी आर्णा नागेश धायफुले एलिमेंटरी परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत ८३ वी आलेली आहे. तसेच इयत्ता ८ वी मधील विद्यार्थी.ईशान राजेश आहेरकर राज्य गुणवत्ता यादीत ९३ वा आलेला आहे.या शासकीय रेखाकला परीक्षांना महाराष्ट्र , उत्तराखंड , छत्तीसगड,मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यातून एकूण ४ लाख ४ हजार ७७५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा प्रामुख्याने पाच राज्यातून एकाच वेळी सप्टेंबर महिन्यात दरवर्षी घेतल्या जातात. प्रशालेच्या या उत्तुंग यशाबद्दल संस्थेचे सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कलाशिक्षक शैलेश कुलकर्णी, राधिका देवनपल्ली यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.



### थॅलेसेमिया पेशंट व पालकांचा स्नेहमेळावा साजरा

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

इंडियन रेड क्रॉस सोसायटी श्रीमती गोपाबई दमाणी रक्त केंद्र व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व रोटरी रेड क्रॉस थालेसेमिय सेंटर यांच्याद्वारे थालेसेमिया पेशंट व पालकांचा स्नेहमेळावा संपन्न झाला. इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान यांच्या मार्गदर्शनाने व मानद सचिव जयेश पटेल यांच्या परिश्रमाने २८ जून २०२४ रोजी रोटरी रेड क्रॉस थालेसेमिया सेंटरची सुरुवात झाली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बालरोग तज्ञ डॉ. अतुल झंवर होते. कार्यक्रमास इंडियन रेड क्रॉस सोसायटी चे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, मानद सहसचिव खुशाल ढेढिया, संचालक राज मिनियर, संदीप जंवेरी, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. शिरीष कुमठेकर व रोटरी रेड क्रॉस थालेसेमिया सेंटरच्या चेअरमन डॉ. ज्योती चिडगुपकर, रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या प्रेसिडेंट धनश्री केळकर व सेक्रेटरी नीलेश पोफळिया उपस्थित होते. रोटरी रेड क्रॉस थालेसेमिया सेंटरचे अवेयरनेस डोनर केतन वोरा, राजू वोरा व डाकलिया उपस्थित होते. इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या मेडिकल डायरेक्टर डॉ. सुरेखा काडादी, मेडिकल ऑफिसर डॉ. गौरी कहाते, डॉ. बेसकर तसेच माजी संचालक भरत शाहउपस्थित होते. या कार्यक्रमात थालेसेमिया पेशंटसाठी रांगोळी स्पर्धा, विविध खेळ घेण्यात आले. तसेच यावेळी विशेष प्रावीण्य मिळवलेल्या थॅलेसेमिया पेशंट मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात अंकित धरमसी सोलापूर फार्म हब यांनी दमाणी रक्त केंद्राकरिता ६ स्टेथेस्कोप देणगी स्वरुपात भेट दिले. सूत्रसंचालन डॉ. रिता सोमानी यांनी केले व आभार खुशाल ढेढिया यांनी मानले.



### इंडियन दलित सेनेचा वर्धापन दिन साजरा

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

रंगभवन येथील समाज कल्याण केंद्रात इंडियन दलित सेनेचा नववा वर्धापन दिन व विजय क्रांतीस्तंभ भिमा कोरेगांव २०९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांचा मेळावा साजरा करण्यात आला असून मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक अध्यक्षस्थानी देविदास दुपारगुडे होते. मेळाव्याचे उद्घाटक माजी आमदार बाबुराव माने यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलन करण्यात आले. मेळाव्यास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संघप्रकाश दुड्डे, जनविकास क्रांती सेनेचे राज्य उपाध्यक्ष अंगद जाधव, सोलापूर जिल्हा वंचित बहुजन आघाडीचे महासचिव अनिरुध्द वाघमारे आदींची उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वपदीप वाघमारे, राजेश सुरवसे, सुलोचना बनसोडे, विलास दुपारगुडे, अर्चना केंगार, करुणा कांबळे, लक्ष्मी लोंढे, नरेंद्र चव्हाण, परमेश्वर भडकुंबे, आशा शिंगे, सुमित्रा बिरुणगी, अनुसया दहिहंडे, लक्ष्मी जाधव, चंद्रकांत वाघमारे, मनोज जगधणे, गौतम शिंगे, राजकुमार क्षीरसागर, मनोज मसलीकर, वैशाली चव्हाण, प्रभाकर गायकवाड, छाया वाघमारे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सिद्धार्थ भडकुंबे यांनी केले तर आभार शहर अध्यक्ष सुहास बिराजदार यांनी मानले.

Classifieds

**भाड्याने देणे आहे**

मंद्रूपमधील समर्थ नगर येथील टू बीएचके घर भाड्याने देणे आहे. कुटुंब असणाऱ्यांना प्राधान्य. लाईट, पाणी, पार्किंग, या सर्व सोयी सहित घर भाड्याने देणे आहे.

**संपर्क - सावन चव्हाण**
**९७६७३६९७८९**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# आज ६८ लिंगाना तैलाभिषेक, मंगळवारी नंदीध्वजांचा अक्षता सोहळा

- श्री सिध्दरामेश्वर यात्रा सोहळा
- यंदा ३०० ड्रोन लाईट शोचे आकर्षण

**स्टॉल्स, दुकाने व करमणूक**

गृहोपयोगी वस्तू व विविध वस्तू, हस्तकला, चित्रकला, विणकाम आदी स्टॉल्स व खाद्यपेयांची दुकाने यात्रेमध्ये आहेत. ज्वेलर्स, खेळण्यांची दुकाने इत्यादी यात्रेत आहेत. या वेळेस यात्रेमध्ये करमणुकीसाठी रेंजर पाळणा, टॉवर पाळणा, आकाशपाळणे, ॲक्टोबस, ट्रीस्टर, मारूती मौत का कुआ (मोठा), ब्रेक डान्स, गाढवाची कसरत, क्रॉस व्हिल, सेलंबो, मिनी ड्रॅगन रेल, नावाडी, कोलंबस, टोराटोरा, तसेच प्रथमच मिनी काश्मीर जलपरीसह, मेरी गो राऊंड, फ्रीड व्हिल, स्टींगटॉवर, सिंचर, भुत बंगला व सुनामी पाळणा इत्यादी या वर्षी अबाल-वृध्दांचे आकर्षण ठरणार आहेत. घरगुती साहित्याचे विक्रीचे दालन घरसंसार आहेत तसेच लहान मुलांसाठी करमणुकीचे साधने आहेत. त्यामध्ये वरील सर्व आयटम्स बरोबरच सौंदर्य प्रसाधने, फोटो सेंटर, रेडिमेड गारमेंटस् याशिवाय दिल्ली येथील हॉटेल, रसपानगृह, वडापाव, बटाटावडा, चिवडा विक्री असे साधारणतः २२० ते २३० स्टॉल राहणार आहेत.

**विद्युत रोषणाई व रंगकाम**

यात्रेच्या निमित्ताने श्री सिध्देश्वर मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, गुरुभेट व सोन्नलगी सिध्देश्वर मंदिरांत विद्युत रोषणाई करण्यात आली असून ६८ लिंगांच्या ठिकाणीही रोषणाई करण्यात आली आहे. सिध्देश्वर मंदिर परिसरात शक्तिशाली प्रकाशझोत सोडण्यात आले असून इलेक्ट्रिक डोम्स लावण्यात आले आहेत. श्री सिध्देश्वर गर्भमंदिरात झुंबर लावून विशेष रोषणाई करण्यात आली आहे. वरील पाच मंदिरांना व ६८ लिंगांच्या मंदिरांना रंग देण्यात आला असून त्यामुळे देखणेपणात भर पडली आहे.

**संस्कारभारतीची रंगावली**

१३ जानेवारी रोजी अक्षता सोहळ्यासाठी निघणाऱ्या नंदीध्वजांच्या मिरवणूक मार्गावर संस्कारभारतीचे कार्यकर्ते रांगोळीच्या पायघडया अंथरणार आहेत. हिरेहब्बू मठापासून ते सिध्देश्वर मंदिरातील संमती कट्टा या तीन किलोमीटरच्या मार्गावर रंगावलीची सुरेख पायघडी अंथरण्यात येणार आहे. संस्कारभारतीचे कार्यकर्ते रघुराज देशपांडे, अनंत देशपांडे, ममता अवस्थी व संगिता भांबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते ही सेवा रूजू करणार आहेत.

**होमप्रदीपन**

१४ जानेवारी रोजी सायंकाळी होम प्रदीपन असून त्यासाठी सायंकाळी पाच वाजता हिरेहब्बूंच्या मठातून नंदीध्वज मिरवणुकीने होम मैदानाकडे निघणार आहेत. सोन्या मारूती जवळील पसारे यांच्या घराजवळ श्री सिध्देश्वर देवस्थानच्या पहिल्या नंदीध्वजास नागफणी व इतर नंदीध्वजांना विद्युत रोषणाई करण्यात येते. तेथून नंदीध्वज रात्री नऊच्या सुमारास होम मैदानावरील होमकुंडाजवळ आल्यानंतर होमहवनचा धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहे. रात्री साडे अकरा वाजता भगिनी समाजजवळ वासराची भाकणूक होईल. होम प्रदीपनसाठी निघणाऱ्या नंदीध्वजांच्या मिरवणूक मार्गात कला फौंडेशनच्यावतीने रंगावली रेखाटण्यात येणार आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले सोलापूरचे ग्रामदैवत योगीकुलचक्रवर्ती शिवयोगी श्री सिध्दरामेश्वरांच्या यात्रेला सोमवार बारा जानेवारी रोजी तैलाभिषेकाने (यण्णीमज्जन) सुरूवात होणार असून मंगळवारी मंदिर परिसरातील संमत्ती कट्ट्यावर नंदीध्वजांचा अक्षता सोहळा लाखो भाविकांच्या उपस्थित पार पडणार आहे.

हा सोहळा आनंदी, उत्साही वातावरणात पार पाडण्यासाठी देवस्थान पंच कमिटीने जय्यत तयारी केली. भाविकांनी या धार्मिक सोहळ्यात सहभागी होऊन व्हावे, अशी माहिती श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी त्यांनी पाच दिवस चालणाऱ्या यात्रेतील धार्मिक कार्याची माहिती देऊन यात्रेच्या तयारीची माहिती देऊन सर्व तयारी पूर्ण झाल्याचे सांगितले.

नंदीध्वज हे श्री सिध्दरामेश्वरांच्या योगदंडाचे प्रतीक असून परंपरेप्रमाणे मानाच्या सातही नंदीध्वज मिरवणूक १२ जानेवारी रोजी सकाळी ६८ लिंगाच्या तैलाभिषेकासाठी निघणार आहेत. पहिल्या नंदीध्वजाचे मानकरी म्हणून हिरेहब्बू यांचा मान असून दुसरा कसब्यातील देशमुखांचा, तिसरा लिंगायत-माळी समाजाचा, चौथा व पाचवा विश्वब्राम्हण समाजाचा, सहावा व सातवा मातंग समाजाचा अशा प्रकारे नंदीध्वजाचे मानकरी आहेत. या यात्रेतील सात नंदीध्वज म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे व सामाजिक समतेचे प्रतिक आहेत.



१२ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता बाळीवेस येथील हिरेहब्बूंच्या मठातून मानाच्या सातही नंदीध्वजांची पालखीसह सवाद्य मिरवणुकीला सुरूवात होणार आहे. शिवयोगी श्री सिध्दरामेश्वरांनी शहरातील पंचक्रोशीत स्थापन केलेल्या ६८ लिंगास नंदीध्वजांच्या मिरवणुकीने जाऊन तैलाभिषेक करण्यात येणार आहे. तैलाभिषक करून नंदीध्वज रात्री हिरेहब्बू मठात परततील.

१३ जानेवारी रोजी सकाळी सात वाजता हिरेहब्बूंच्या मठापासून नंदीध्वज अक्षता सोहळ्यासाठी मिरवणुकीने मंदिराकडे मार्गस्थ होणार आहेत. नंदीध्वज संमती कट्ट्यावर आल्यानंतर योगदंडाच्या साक्षीने सुगडी पूजा, संमती पूजा होऊन दुपारी १२.३० वाजता अक्षता सोहळा संपन्न होणार आहे. अक्षता सोहळ्यानंतर ६८ लिंगांना प्रदक्षिणा करून नंदीध्वज हिरेहब्बूंच्या मठात परततील.

**आतषबाजी व ड्रोन लाईट शो**

१५ जानेवारी रोजी होम मैदानाच्या उत्तरेस असलेल्या मोकळ्या जागेवर पूर्वापार परंपरेनुसार शोभेच्या दारू कामाचे आतषबाजी व भव्य ड्रोन लाईट शो याचे नियोजन केले आहे. सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यांची पावन यात्रा दरवर्षी मकरसंक्रांतीनिमित्त जानेवारी महिन्यात भक्तिभावाने साजरी केली जाते. या यात्रेतील शोभेच्या दारूकामाच्या दिवशी, सर्व भाविकांसाठी शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यांचा दिव्य महिमा उलगडणारे उपक्रम श्री सिध्देश्वर देवस्थानच्यावतीने सातत्याने राबविले जातात. अंदाजे ३०० ड्रोनच्या माध्यमातून भव्य-दिव्य ड्रोन लाईट शो आयोजित करण्याचे नियोजन आहे. हा ड्रोन लाईट शो दिनांक १५ जानेवारी रोजी सायंकाळी ८ ते १० यावेळेत सादर करण्यात येणार आहे.

त्यानंतर नंदीध्वज श्री सिध्दरामेश्वर मंदिरात येऊन रात्री ११च्या सुमारास परंपरेनुसार श्री सिध्देश्वर देवस्थान मंदिराच्या भोवती मानाचे सातही नंदीध्वज पाच प्रदक्षिणा घालतात. अशा प्रकारे चौथ्या दिवसाचा शोभेचा दारूकाम आतषबाजीने व भव्य ड्रोन लाईट शो या कार्यक्रमाने पूर्वापार परंपरेनुसार संपन्न होईल.

**नंदीध्वजाचे वस्त्रविसर्जन (कप्पड कळी)**

१६ जानेवारी रोजी उत्तर कसबा येथील मल्लिकार्जुन मंदिरामध्ये मानाचे नंदीध्वांचे मंदिराभोवती प्रदक्षिणा झाल्यानंतर मल्लिकार्जुनच्या पुजनाने नंदीध्वजांचे वस्त्र व आभुषणे विधिवत उतरविले जाते

**आजपासून पशु प्रदर्शन व विक्री**

यात्रा काळात जनावरांचा बाजार सोलापूर शहराच्या हद्दीतील श्री सिध्देश्वर देवस्थानच्या मालकीच्या विजापूर रोड, याठिकाणी भरविण्याचे नियोजन आहे. सोमवार. १२ जानेवारी पासून सुरू होत आहे.

**श्री सिध्दरामेश्वर दिनदर्शिका**

यंदाच्या वर्षी देवस्थानच्या वतीने सर्व भाविकांसाठी अत्यंत सुंदर व नयनरम्य छायाचित्रांनी सजलेली श्री सिध्दरामेश्वर दिनदर्शिका लवकरच भक्तांच्या हाती देण्यात येणार आहे. या दिनदर्शिकेत श्री सिध्दरामेश्वर यांचे विलोभनीय मुखपृष्ठ, सुवर्ण मंदिराचा गाभारा, गाभाऱ्यातील मूर्ती, शिवयोग समाधी, नयनरम्य तलाव व मंदिर परिसर, गड्डा यात्रेतील नंदीध्वज मिरवणूक, अक्षता सोहळा यांची आकर्षक व भावस्पर्शी छायाचित्रे समाविष्ट करण्यात आली आहेत. यासोबतच यात्रेविषयी विशेष माहिती, दिनविशेष, तिथी-मुहूर्त यांसारखा उपयुक्त तपशीलही देण्यात आलेला आहे.

**अपघात विमा योजना**

गेल्या ५ वर्षापासून श्री सिध्देश्वर देवस्थान यात्रा समिती यात्रेच्या काळात पब्लीक लायबिलीटी इंश्युरन्स उतरवीत असते यात्रेच्या काळात यात्रा व मंदिर परिसराभोवती यात्रेचा आनंद घेतेवेळी अनावधानाने कोणत्याही भाविक वा यात्रेकरूना जर काही अपघात, अपंगत्व वा मृत्यु, झाल्यास त्यांना वा त्यांच्या कुटुंबियांना अपघात विमा संरक्षक असेल. या वेळेस युनायटेड इंश्युरन्स कंपनीकडून १० ते ३१ जानेवारी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत यात्रा व मंदिर परिसरात म्हणजेच संमती कट्टा, होम मैदान, पंचकट्टा व श्री सिध्देश्वर मंदिर परिसर इत्यादी ठिकाणाचा भागाकरीता विमा संरक्षण दिला गेला आहे. १ कोटी रुपयाचा अपघाती विमा उतरविला गेला असून अपघाती व्यक्तीस एक लाख व त्याहुन जास्त विमा संरक्षण मिळणार आहे.

या पत्रकार परिषदेस सिध्देश्वर बमणी, नीलकंठप्पा कोनापुरे, बाळासाहेब भोगडे, ॲड. मिलिंद थोबडे, डॉ. राजेंद्र घुली, गिरीश गोरनळ्ळी, विश्वनाथ लब्बा, प्रा. डॉ. राजशेखर येळीकर, तम्मा मसरे, पशुपती माशाळ, प्रकाश बिराजदार, सुरेश कुंभार, सोमशंकर देशमुख, विलास कारभारी, सी. बी. नाडगौडा, भीमाशंकर पटणे, मल्लिकार्जून कळके, महादेव जम्मा, काशीनाथ ढोले, शरणराज काडादी आदी उपस्थित होते.

## नाटय दिग्दर्शक मंजूर शेख यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**



सोलापूरचे प्रसिद्ध नाटककार, दिग्दर्शक आणि लेखक मंजूर आलम शेख यांना दरयाफ्त मुंबईकडून जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांनी १९६० पासून नाट्यविश्वात प्रवेश केला. १९७६ मध्ये त्यांनी सोलापूरच्या पहिले नाटक बहार आने तक मध्ये मुख्य भूमिका साकारली. हे सोलापूरचे पहिले नाटक होते. नसीम मन्ना यांनी लिहिलेले, त्यांनी उर्दू अकादमीच्या उर्दू नाटकात सोलापूर सोशल स्कूलसाठी सातत्याने नाटके सादर केली. त्यापैकी त्यांनी रेत कि दिवार नही वो एक लहमा, कॅक्टस राही अकिला ही नाटके सादर केली आणि मुंबईतील अंतिम फेरीत सादर केली. आलम यांनी बालनाट्ये देखील सादर केली, ज्यात सोने कापिंजऱ्या बीवी आऔर टी वी वेटेग रुम यांचा समावेश होता आणि उर्दू साप्ताहिक वृत्तपत्र ऐनाअयाममध्ये व्यंग्य आणि विनोदी लेख लिहित राहिले. १९९२ मध्ये ते अकादमीच्या पहिल्या नाट्य अंतिम स्पर्धेचे निमंत्रक होते. आलम हे इतिहासाचे एक चांगले शिक्षक म्हणूनही ओळखले जातात. अध्यापन व्यवसायात ३८ वर्षांच्या सेवेनंतर ते सोशल स्कूलमधून निवृत्त झाले.

# गुन्हा मागे घेण्यासाठी खंडणी स्वीकारताना पोलिसांनी रंगेहात पकडले

## एसआरपी एफ कॅम्प परिसरात ठरली होती पंधरा लाखाची डील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

पोलिसावर दाखल केलेला गुन्हा मागे घेण्यासाठी पंधरा लाख रुपयांची खंडणी स्वीकारताना तिघांना जोडभावी पेठ पोलिसांनी रंगेहात पकडले. ही कारवाई शुक्रवारी दुपारी करण्यात आली.

पूजा ढवळे वय ३७, रा. शिवगंगा नगर, मिलिंद कांबळे वय ४७, रा. बुधवार पेठ, लक्ष्मी लोंढे वय ४५, रा. एसआरपीएफ कॅंप जवळ असे अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी जितेंद्र रामहारी भोसले वय ४२, रा. पंचरत्न निवास, नेताजी नगर, जोडभावी पेठ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तिघांवर जोडभावी ठाण्यात गुन्हा दाखल झाला.



फिर्यादी भोसलेवर गुन्हा दाखल केला होता. तो गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपींनी पंधरा लाखांची मागणी केली.

ही रक्कम देण्यासाठी शुक्रवारी सकाळी फोन करून भोसले यांना एम्प्लॉयमेंट चौकातील हॉटेलमध्ये बोलवले. याची तक्रार भोसले यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली. घटनेची खात्री करण्यासाठी सपोनि विष्णू गायकवाड यांनी दोन पंचासोबत पथकासह हॉटेल परिसरात सापळा लावला. भोसले यांनी आरोपींना ५०,००० रुपये रोख, दीड लाखांचा व एक तेरा लाखांचा असे दोन चेक दिले. त्यानंतर पोलिसांनी लागलीच तेथे येऊन भोसले यांनी दिलेली रक्कम व २ चेकसह तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी वरील तीन या आरोपींवर बी एन एस ३०८ (२), ३५१ ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

# मनाचे आरोग्य उत्तम राखणे काळाची गरज

## मानसोपचार तज्ज्ञ मिलिंद कारंजकर यांचे वालचंद महाविद्यालायात प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

शारीरिक आजारांप्रमाणे मानसिक आजारही असतात. आज ७५० हून अधिक मानसिक व्याधी ओळखल्या गेल्या असून त्या बालपणापासून वृद्धावस्थेपर्यंत कोणालाही होऊ शकतात. व्यक्तीचे बोलणे, वागणे व हालचाली यांतून मानसिक आजाराची लक्षणे दिसून येतात. मात्र समाजात शारीरिक आजारांबाबत चर्चा होते, परंतु मानसिक आजारांबाबत बोलण्याची मानसिकता अद्याप विकसित झालेली नाही, ''शरीराप्रमाणे मनाचे आरोग्य जपणे ही आजच्या काळाची गरज आहे'' असे प्रतिपादन मानसोपचार तज्ञ मिलिंद कारंजकर यांनी केले.



**तणावाचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक**


निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी परीक्षेचा ताण तसेच जीवनातील विविध कारणांमुळे निर्माण होणाऱ्या तणावाचे योग्य व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. तणावाला आपण प्रतिक्रिया देतो की सकारात्मक प्रतिसाद देतो, यावर तणाव वाढेल की कमी होईल हे ठरते. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी वालचंद महाविद्यालय सातत्याने समुपदेशन सत्रांचे आयोजन करते, ही कौतुकास्पद बाब आहे.

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने वालचंद कनिष्ठ महाविद्यालयात ''विद्यार्थी मानसिक ताणतणाव, व्यसनाधीनता व मोबाईलचा अतिवापर यामुळे होणारे दुष्परिणाम'' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संतोष कोटी होते. यावेळी दंतरोगतज्ञ डॉ. रोहन वायचळ, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, कार्यक्रम समन्वयक अतुल राऊत, समाजसेवक अक्षय गुंजाळ आदी उपस्थित होते.

मानसिक ताणतणावातून निर्माण होणाऱ्या व्याधी, व्यसनाधीनता तसेच मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम या ज्वलंत विषयांवर त्यांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मोबाईलच्या अतिवापरामुळे संयम, सहनशक्ती व स्वीकारशीलता कशी कमी होते, याचे दैनंदिन जीवनातील उदाहरणांद्वारे प्रभावी प्रबोधन केले. जागतिक आरोग्य संघटनेचा हवाला देत इंटरनेट ॲडिक्शन व डिजिटल गेमिंग ॲडिक्शन यांचे प्रमाण भारतासह जगभरातील तरुणाईमध्ये वाढत असल्याचे त्यांनी अभ्यासाअंती स्पष्ट केले.

शेवटी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य व मर्यादित वापर करण्याबाबत सामुदायिक प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक शैलेंद्र विठ्ठलदास यांनी केले. सूत्रसंचालन चेतन तुपकर यांनी केले.



### शेठ आगरचंद कुंकुलोळ हायस्कूलमध्ये आनंद बाजार

**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

नव महाराष्ट्र विद्या विकास मंडळाचे शेठ आगरचंद कुंकुलोळ हायस्कूल व प्राथमिक विद्यामंदिर, मनगिरे मळा येथे आनंद बाजाराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास डॉ. चंद्रकांत मोरे, प्रशासनाधिकारी भारत बावकर, नव महाराष्ट्र विद्या विकास मंडळाचे खजिनदार मोहन बुचडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी डॉ. चंद्रकांत मोरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये उद्योगशीलता, व्यवहार ज्ञान व आत्मविश्वास वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमप्रसंगी मुख्याध्यापक दीपक उंबरदंड व योगिता वेळे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी आयोजकांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. यावेळी रावसाहेब मनगिरे मालक यांनी आनंद बाजारास सदिच्छा भेट दिली. आनंद बाजारामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध खाद्यपदार्थ, ग्रामीण खेळणी, हस्तकला वस्तू, सजावटीच्या वस्तू यांचे आकर्षक स्टॉल लावण्यात आले होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारताचा न्यूझीलंडवर ४ गड्यांनी विजय

## गिलचे अर्धशतक; कोहलीचे शतक हुकले

**मुंबई, ११ जानेवारी**

विराट कोहली (९३), कर्णधार शुभमन गिल (५६) व श्रेयस अय्यरच्या (४९) दमदार फलंदाजीच्या बळावर भारताने येथे पहिल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडवर ६ चेंडू शिल्लक ठेवित ४ गड्यांनी विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यंच्या मालिकेत न्यूझीलंडविरुद्ध १-० अशी आघाडी मिळविली आहे. आता मालिकेतील दुसरा सामना बुधवार १४ जानेवारी रोजी राजकोट येथे खेळला जाणार आहे.

भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने ५० षटकांत ८ बाद ३०० धावा उभारल्या. प्रत्युत्तरात भारताने ४९ षटकांत ६ बाद




३०६ धावा काढून आपला विजय साकार केला. न्यूझीलंडच्या डावाची सुरुवात दमदार झाली. डेव्हॉन कॉनवे व हेनरी निकोल्सने ११७ धावांची सलामी भागीदारी केली. हर्षित राणाने राहुलकडून निकोल्सला झेलबाद करण्यापूर्वी निकोल्सने ६९ चेंडूंत ८ चौकारांसह ६२ धावांची खेळी केली. नंतर कॉनवेही हर्षित राणाच्या गोलंदाजीला बळी पडला, कॉनवेने ६७ चेंडूंत ६ चौकार व एका षट्कारसह ६६ धावांची खेळी केली. मोहम्मद सिराजने विल यंगला (१२) लवकरच बाद केले, परंतु त्यानंतर डॅरिल मिचेलने एक बाजू सांभाळीत ग्लेन फिलिप्स (१२), मिचेल हे (१८ ), मायकेल ब्रेसवेल (१६) व झॅक फोल्क्स (१) व क्रिस्टीयन क्लर्कच्या (नाबाद २४) साथीने संघाला तिनशे धावांच्या जवळपास आणले.

प्रसिध कृष्णाने डॅरील मिचेलची घोडदौड थांबविली. मिचेलने ७१ चेंडूंत ५ चौकार व ३ षट्कारांसह ८४ धावांचे योगदान दिले. क्रिस्टीयन क्लर्क (८) व काईल जेमिसनने (७) नाबाद खेळी करत न्यूझीलंडला ५० षटकांत ८ बाद ३०० धावांचा टप्पा गाठून दिला. भारताकडून मोहम्मद सिराज, हर्षित राणा व प्रसिध कृष्णाने प्रत्येकी २ बळी टिपले, तर कुलदीप यादव ने एक ब ळी मिळविला. विजयासाठी ३०१ धावांचा पाठलाग करताना रोहित शर्माने शुभमन गिलसोबत ३९ धावांची भागीदारी केली. जेमिसनच्या गोलंदाजीवर बाद होण्यापूर्वी रोहितने २९ चेंडूंत २६ धावा केल्या. पुढे गिल व विराट कोहलीने न्यूझीलंडविरुद्ध स्वैर फलंदाजी करत दुसऱ्या गड्यासाठी ११८ धावांची भागीदारी करून भारताच्या विजयाचा पाया रचला. गिलने ७१ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. नंतरही कोहलीची फटकेबाजी सुरूच होती. त्याला श्रेयस अय्यरची उत्तम साथ मिळाली, मात्र कोहली वैयक्तिक शतकाच्या उंबरठ्यावर असताना जेमिसनने त्याला ब्रेसवेलकडून झेलबाद केले. कोहलीने ९१ चेंडूंत ८ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ९३ धावांचे योगदान दिले.


## महत्त्वाचे

### कोहली २८ हजार धावा करणारा सर्वांत वेगवान फलंदाज

**वडोदरा :** विराट कोहलीने रविवारी आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत २८,००० धावा पूर्ण केल्या. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना येथील कोटंबी आंतरराष्ट्रीय स्टेडियम (बीसीए) येथे खेळला जात होता. त्याने केवळ ६२४ डावांमध्ये हा टप्पा गाठून सर्वात वेगवान क्रिकेटपटू होण्याचा मान मिळवला, आणि ६४४ डावांमध्ये हा विक्रम करणाऱ्या सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला. एकदिवसीय मालिकेच्या पहिल्या सामन्यापूर्वी, कोहली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८ हजार धावा पूर्ण करण्यापासून केवळ २५ धावा दूर होता. या उजव्या हाताच्या फलंदाजाने ५५६ सामने आणि ६२३ डावांमध्ये ५२.५८ च्या उल्लेखनीय सरासरीने २७,९७५ धावा केल्या होत्या, ज्यात ८४ शतके आणि १४५ अर्धशतकांचा समावेश होता. भारतासाठी आपला ३०९ वा एकदिवसीय सामना खेळताना, कोहलीने १३ व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर न्यूझीलंडच्या आदित्य अशोकला चौकार मारला आणि त्यासोबतच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८ हजार धावांचा टप्पा पार केला. त्याने श्रीलंकेचा महान खेळाडू कुमार संगकाराला मागे टाकून या खेळाच्या इतिहासातील दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होण्याचा मानही मिळवला.



### टाटा मुंबई मॅराथॉनसाठी कोस्टल रोडचा समावेश




**मुंबई :** आगामी रविवार, १८ जानेवारी रोजी होणाऱ्या २१ व्या टाटा मुंबई मॅराथॉनमध्ये धावण्याच्या मार्गात मुंबई कोस्टल रोडचा समावेश केला आहे. त्यामुळे धावपटूंना मुंबई कोस्टल रोडचा अनुभव घेता येणार आहे. हा मार्ग प्रतिष्ठित वांद्रे-वरळी सी लिंकच्या जोडीने असेल. धावपटूंना अरबी समुद्र व शहराच्या क्षितिजाचे विना अडथळा विहंगम दृश्य मिळेल आणि जगातील सर्वात प्रसिद्ध शहरी मॅराथॉनपैकी एकामध्ये एक नवीन आकर्षक अध्याय जोडला जाईल. टाटा मुंबई मॅराथॉन २०२६ च्या मार्गामध्ये कोस्टल रोडचा समावेश करून, आम्ही मुंबईला जागतिक स्तरावर सर्वोत्तम रूपात सादर करण्याचे ध्येय ठेवले आहे. हा नवीन मार्ग मॅराथॉन धावपटूंना एक अनोखा आणि नयनरम्य अनुभव देईल.

### सांगोल्यात आज कराटे चॅम्पियनशिपसाठी निवड चाचणी

**सांगोला,दि.११ जानेवारी -**

कॉमनवेल्थ व वर्ल्ड फेडरेशन कराटे इंडिया ऑर्गनायझेशनशी संलग्न असलेल्या १७ व १८ रोजी अहिल्यानगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धे साठी २१ वर्षावरील व खालील सीनियर कराटे निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन सांगोला येथे सोमवार १२ जानेवारी रोजी स.१० वा केले आहे. जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन स्पोर्ट्स कराटे असोसिएशन सोलापूर यांच्या वतीने व कराटे डू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने केले आहे. या स्पर्धा वजन गटाप्रमाणे होतील. जिल्ह्यातील ज्या स्पर्धकांना या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यायचा आहे त्यांनी ९९७०६०६९०९ या मोबाईलवर संपर्क साधावा, असे आवाहन स्पोर्ट्स कराटे डो. असोसिएशन सोलापूरचे अध्यक्ष जी.के.वाघमारे यांनी केले आहे.

### सॉफ्टबॉल ज्युनियर मुले व मुली निवड चाचणी स्पर्धा आज

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या वतीने सॉफ्टबॉल जुनियर मुले व मुली शहर व जिल्हा निवड चाचणी स्पर्धा सोमवार १२ जानेवारी रोजी श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर विमानतळ समोर येथे सकाळी ११ वाजता होणार आहे. या निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आधार कार्डची झेरॉक्स व आवश्यक साहित्यसह मैदानावर उपस्थित रहावे यामधून निवडलेला संघ हा १९ ते २१ जानेवारी अक्कलकोट येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेत सहभागी होईल. खेळाडूंनी मैदानावर संघटनेचे सचिव प्रा.संतोष खेंडे ९८५०६६६७९५ अथवा गंगाराम घोडके ९४२३७१७२७७ यांच्याशी संपर्क साधावा. या निवड चाचणी स्पर्धे साठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, उपाध्यक्ष प्रा. संतोष गवळी व सचिव प्रा. संतोष खेंडे यांनी केले आहे.

# भारतीय क्रिकेट संघाचा कर्नल दिलीप वेंगसरकर आज अकलूजमध्ये


## युवकांशी साधणार संवाद

**तभा वृत्तसेवा । चंद्रकांत कुंभार**
**अकलूज, दि. ११ जानेवारी-**

भारतीय क्रिकेट संघाचे कर्नल म्हणून ओळख असलेले ज्येष्ठ क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर हे सोमवार १२ जानेवारी रोजी अकलूजला येत आहेत.

आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली येथील महर्षी जिमखाना व स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या वतीने विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुलाच्या प्रांगणात सायंकाळी ४.३० वाजता ते युवकांशी संवाद साधणार आहेत.

वेंगसरकर यांनी १९८३ च्या विश्वचषकात भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले होते. यानंतर १९८७ साली झालेल्या विश्वचषकानंतर त्यांनी कपिल देवच्या जागी भारतीय संघाच्या नेतृत्वाची धुरा सांभाळली होती. कर्णधार म्हणून त्यांनी आपल्या पहिल्याच मालिकेत २ शतके ठोकली होती. त्यानंतर १९८९ मध्ये भारतीय संघाने वेस्ट इंडीजचा दौरा केला होता. या दौऱ्यात भारताचा पराभव झाला होता. यानंतर त्यांना कर्णधारपदावरून काढण्यात आले



होते. त्यांनी १० कसोटी सामन्यात भारताचे नेतृत्व केले. ११६ कसोटी सामन्यात १७ शतकांसह ६,८६८ धावा केल्या होत्या. शेवटचा सामना १९९२ला खेळला तेव्हा ते सुनिल गावसकर यांच्या पाठोपाठ कसोटीत सर्वाधिक धावा करणारे फलंदाज ठरले होते. त्यांना अर्जुन तसेच विस्डनचा क्रिकेट ऑफ द इयर पुरस्कारही मिळाला आहे. तसेच बीसीसीआयने त्यांना सीके नायडू जीवनगौरव पुरस्कारही दिला. निवृत्तीनंतर त्यांनी मुंबईत ईएलएफ वेंगसकर क्रिकेट अकॅडमी सुरु केली. त्यांनी काही काळ बीसीसीआयचे राष्ट्रीय निवडकर्ता म्हणूनही काम पहिले होते. तसेच ते २००६ मध्ये मॅच रेफरीही होते. सध्याचा भारतीय संघाचा कर्णधार विराट कोहलीला २००८ ला भारतीय संघात संधी द्यावी असा आग्रह त्यांचाच होता. वेंगसरकर यांनी १९९० ला मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवली होती.

### ११६ कसोटीत ६,८६८ धावा

कर्नल दिलीप वेंगसरकर यांनी ११६ कसोटीत ६,८६८ धावा केल्या होत्या. त्यामध्ये १७ शतके ३५ अर्धशतके त्यांच्या नावावर आहेत. सर्वाधिक १६६ धावा त्यांच्या नावावर आहेत तर त्यांनी ७८ झेल घेतले आहेत. १२९ एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत त्यांनी ३,५०८ धावा केल्या आहेत. त्यामध्ये एक शतक व २३ अर्धशतके असून १०५ सर्वाधिक धावा बरोबर ३७ झेल त्यांनी घेतले आहेत. २६० प्रथम श्रेणी क्रिकेट स्पर्धेत १७,८६८ धावा त्यांच्या नावावर असून त्यामध्ये ५५ शतके व ८७ अर्धशतके त्यांच्या नावावर आहेत. २८४ सर्वाधिक धावासह १७९ झेल त्यांनी घेतले आहेत. १७४ लीग मॅचेस मध्ये ४,८३५ धावा त्यांच्या नावावर असून एक शतक व ३५ अर्धशतके त्यांनी केली आहेत. यामध्ये सर्वाधिक १०५ धावांबरोबर ५७ झेल त्यांनी घेतले आहेत.

# खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राची पदक अष्टमी

## दुसरी खेलो इंडिया बीच स्पर्धा

## सागरी जलतरणात उपविजेतेपद

**दीव, दि. ११ जानेवारी-**

दुसाऱ्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राने ३ रौप्य, ५ कांस्यपदकांसह ८ पदकांची लयलटू केली आहे. साताऱ्याच्या दीक्षा यादव पदकाचा डबल धमाका केला. दीक्षाच्या १ रौप्य व १ कांस्य पदकामुळे सागरी जलतरणात महाराष्टाने उपविजेतेपद पटकावले.

दीवमधील अरबी समुद्रातील सागरी जलतरणाचा महाराष्ट्राच्या मुलींनी पदकाचा करिश्मा घडविला. साताऱ्याच्या दीक्षा यादवे ५ किमी शर्यतीत रौप्य तर १० किमी शर्यतीत कांस्य पदक पटकावले. सलग दुसऱ्या वर्षी दीक्षाने दोन्ही शर्यतीत पदकाचा पराक्रम केला आहे. या यशामुळे सागरी जलतरणातील महिलांचे उपविजेतपद महाराष्ट्राने संपादन केले. कर्नाटकला विजेतेपदाची तर महाराष्ट्राला उपविजेतेपदाचा करंडक पथकप्रमुख नवनाथ फरताडे यांच्या हस्ते देण्यात आला. सागरी जलतरणाच्या जोरावर कर्नाटकाने सर्वसाधारण विजेतेपदाचा मान पटकविला. तामिळनाडूने स्पर्धेत दुसरे तर मणिपूरने तिसरे स्थान संपादन केले. या तिन्ही संघानी प्रत्येकी ३ सुवर्ण, २ रौप्य पदके जिंकल्याने सर्वसाधारण विजेतेपदाचा फैसला कांस्य पदकावर घेण्यात आला. ३ सुवर्ण, २ रौप्य व ६ कांस्यपदकाची लयलूट करीत कर्नाटकाने स्पर्धेत बाजी मारली.




स्पर्धेत महाराष्ट्राचे ७७ जणांचे पथक सहभागी झाले होते. य्ामध्ये ३१ पुरूष व २८ महिला खेळाडूंचा समावेश होता. स्पर्धेत बीच सॉकर, बीच कबड्डी, बीच पेंचक सिलट, सागरी जलतरण महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले. महाराष्ट्राने ३ रौप्य, ५ कांस्यपदकांसह ८ पदकांची कमाई केली आहे. बीच पेंचक सिलट स्पर्धेत २ रौप्य व १ कांस्य पदके महाराष्ट्राच्या नावापुढे झळकली. बीच कबड्डी दोन्ही संघाना तर बीच सॉकरमध्ये पुरूष संघाला कांस्य पदकावर समाधान मानावे लागले.

सर्व पदकविजेत्यांचे क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले, सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी, उपसंचालक संजय सबनीस यांनी अभिनदंन केले आहे. सर्व पदकविजेत्यांचे कौतुक करीत सहसंचालक सुधीर मोरे यांनी सांगितले की खेलो इंडिया बीच स्पर्धा ही खेळाडूंसाठी मोठी पर्वणी ठरली. स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वातही महाराष्ट्राची चमकदार कामगिरी केली आहे.

# जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.११ जानेवारी-**

झरे (ता.करमाळा) तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने क्रीडा सप्ताहचे उत्साहात उदघाटन करण्यात आले. सरपंच सुनीता पाटील व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्राध्यापिका संध्या बिले उपस्थित होत्या. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष. जयप्रकाशजी बिले हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

या कार्यक्रमासाठी संस्थेच्या खजिनदार आशा बिले, संचालिका डॉ. स्वाती बिले, श्री परदेशीं , मुख्याध्यापिका अमृता परदेशी आदी उपस्थित होते. स्कूलच्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर करून मान्यवरांचे स्वागत केले. या क्रीडा




साप्ताहामध्ये कबड्डी, खो -खो, क्रिकेट, डॉस बॉल, स्टँडिंग जम्प, रिले, रनिंग या खेळांचा समावेश होतो. इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांनी आपल्या देशातील उत्कृष्ट खेळाडूंची वेशभूषा करून सर्वांचे लक्ष आकर्षित केले. यामध्ये इयत्ता पहिलीतील विद्यार्थी ध्रुव क्षीरसागर - सचिन तेंडुलकर, शिवनेरी घनवट- स्मृती मंदना, शिवांश पवार- सुनिल छेत्री, तसेच इयत्ता दुसरीतील विद्यार्थी सताक्षी जोशी- सानिया मिर्झा, श्रेया मारकड- पि. व्ही. सिंधू, आर्यन भोसले - मिल्खा सिंग आदी खेळाडूंचा समावेश होतो. प्रि. प्रायमरीच्या विद्यार्थ्यांनी ताली योगा करून प्रेक्षाकांची मने जिकली. मान्यवारांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्ना देशमुख व नम्रता साळुंके यांनी केले. सहशिक्षका नफिसा घोडके यांनी आभार मानले.

# मंद्रूप व वाडीकुरेलीस विजेतेपद





## महाराष्ट्र पोलिस वर्धापनदिनानिमित्त खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

महाराष्ट्र पोलिसच्या वर्धापनदिनानिमित्त झालेल्या खो-खो स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात न्यू गोल्डन मंद्रूपने व मुलींच्या गटात वसंतराव काळे प्रशाला वाडीकुरोली (ता. पंढरपूर) यांनी विजेतेपद पटकाविले.

ग्रामीण पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात मुलांच्या गटात मंद्रूप संघाने वीट (ता. करमाळा) येथील छत्रपती प्रशालेचा १९-१८ असा एका गुणाने पराभव केला. मध्यंतरासच त्यांनी १२-१० ही आघाडी घेतली होती. ही आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. मुलींच्या गटात वाडीकुरोलीने येथील समृद्धी स्पोर्टस् क्लबचा १२-७ असा एक डाव राखून ५ गुणांनी पराभव केला.

पारितोषिके ग्रामीण पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, तांत्रिक समिती सचिव शिवशंकर राठोड, पंच मंडळ सदस्य पुंडलिक कलखांबकर, प्रशिक्षक अतुल जाधव आदी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी पंच म्हणून विजय अडगळे, आनंद जगताप, सूरज शेवाळे, श्री चव्हाण, अनिकेत सावंत, अविनाश हरभारे व नौशाद मुजावर यांनी काम पाहिले.

# पुरुष गटात विदर्भची विजयी सलामी

## ५८ वी वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**काझीपेठ, तेलंगणा, दि. ११ जानेवारी-**

काझीपेठ, तेलंगणातील रेल्वे ग्राऊंडवर सुरू असलेल्या ५८ व्या वरिष्ठ राष्ट्रीय खो-खो चॅम्पियनशिपमध्ये आज खेळ, वेग, चपळाई आणि डावपेचांचा जबरदस्त संगम पाहायला मिळाला. भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने तेलंगणा खो-खो असोसिएशन आयोजित या स्पर्धेत महिला आणि पुरुष गटातील सामन्यांनी चांगलीच रंगत आणली. महिलांमध्ये तेलंगणा व आसाम, तर पुरुषांमध्ये विदर्भ व हरियाणा संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर मोठ्या फरकाने मात करत आपले वर्चस्व ठसठशीतपणे सिद्ध केले.

यजमान तेलंगणा संघाने महिला गटातील लढतीत ऑल इंडिया पोलिसचा २८८ असा एक डाव २० गुणांनी सहज पराभव करत गटात पहिला विजय नोंदवला. तेलंगणाकडून अखिला (३.१० मि. संरक्षण व २ गुण) आणि अनुषा के. (२.३० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी सलग दमदार कामगिरी नोंदवत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला आणि प्रेक्षकांची




### विदर्भाची गोव्यावर एकतर्फी विजय

पुरुष गटात विदर्भ संघाने आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळ करत गोव्याचा ३८-४ असा ३४ गुण व एक डाव राखून धुव्वा उडवला. विदर्भकडून दिलराज सिंग (२.५० मि. संरक्षण व ८ गुण) याने आक्रमणात आघाडी घेतली, तर फैजल खान (३.४० मि. संरक्षण व २ गुण) याने संयमी खेळ करत संघाच्या मोठ्या विजयात भर घातली. तर गोव्याकडून रौश (१ मि. संरक्षण, २ गुण) याने चांगले प्रदर्शन केले.

दाद मिळवली. तर पोलिस संघाकडून रमणदीप कौर (१.२० मि. संरक्षण, २ गुण) हिने चांगला प्रतिकार केला.

दुसऱ्या सामन्यात आसामने जम्मू-काश्मीरचा एक डाव २० गुणांनी (२८८) सहज पराभव केला. आसामकडून रांजणा (३.१० व १.३० मि. संरक्षण, २ गुण) आणि कल्याणी (५.१० मि. संरक्षण) यांनी भक्कम संरक्षण करत संघाच्या विजयाची पायाभरणी केली, तर जम्मू-काश्मीरकडून रूची माला (१.२० व १.४० मि. संरक्षण, ४ गुण) हिने झुंजार खेळ केला.

आणखी एका सामन्यात मध्यभारत संघाने बिहारचा एक डाव ३६ गुणांनी (४०४) धुव्वा उडवला. मध्यभारतकडून रोहिणी (२.२० व ३.५० मि. संरक्षण, ६ गुण) आणि ईरा भट्ट (४.४० मि. संरक्षण) यांनी अप्रतिम खेळ करत सामन्यावर संपूर्ण वर्चस्व गाजवले.

पुरुष सामन्यात हरयाणाने हिमाचल प्रदेशचा ३४२४ असा १० गुणांनी पराभव केला. मध्यंतराला २ गुणांनी पिछाडीवर (१२१४) असतानाही हरयाणाने दुसऱ्या डावात आक्रमक खेळ करत २२ गुणांची कमाई केली. हरयाणाकडून ध्रुव (१.४२ मि. संरक्षण, १० गुण) आणि गौरव (२.१० मि. संरक्षण, ४ गुण) यांनी निर्णायक कामगिरी केली, तर हिमाचलकडून शिवम (२ मि. संरक्षण, ६ गुण) आणि ललित (१.२० मि. संरक्षण, ८ गुण) यांनी चांगला खेळ केला.

दुसऱ्या सामन्यात राजस्थानने चंदिगडचा एक डाव ९ गुणांनी (२५१६) पराभव केला. राजस्थानकडून मनिष (३.१० मि. संरक्षण, २ गुण) आणि हरिष (२.१० मि. संरक्षण, ४ गुण) यांनी संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली, तर चंदिगडसाठी दीपक सिंग (४ गुण) आणि संदीप कुमार (२.२० मि. संरक्षण) यांनी झुंज दिली.




# व्हि-एक्सल एज्युकेशन ट्रस्टचा क्रीडा महोत्सव उत्साहात

**सोलापूर दि. ११ जानेवारी-**

व्हि-एक्सल एज्युकेशन ट्रस्ट सोलापूर सेंटरच्या स्वमग्न विद्यार्थ्यांच्या क्रीडा महोत्सवाचे उदघाटन येथे अस्थिरोग तज्ञ डॉ. सत्यजीत वाघचवरे आणि दंतरोग तज्ञ डॉ. अभिजीत वाघचवरे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून उद्घाटन झाले.

यावेळी सेंटरच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले आणि क्रीडा महोत्सवाची ज्योत प्रज्वलित करण्यात आली. कै. वि. मो. मेहता प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, संगमेश्वर कॉलेज मॅनेजमेंट कमिटी सदस्य तेजश्री काडादी, सोलापूर विकास मंचचे सदस्य कुंदन जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे श्री. बिराजदार सर यांच्या हस्ते समारोप आणि पारितोषिक वितरण करण्यात आले. डॉ. वाघचवरे यांनी स्वमग्न विद्यार्थ्यांसाठी उपक्रम राबविण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. श्रुती बागेवाडी यांनी सेंटरच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि कै. वि. मो. मेहता प्रशालेच्या विद्यार्थ्यांसोबत स्वमग्न विद्यार्थ्यांची शाळेत भेटीसाठी येणार आहे असे म्हणाले. स्वमग्न विद्यार्थ्यांनी धावणे, लिंबू चमचा, थ्रो बॉल, सायकलिंग, अडथळ्यांची शर्यत, सॅक रेस अश्या विविध स्पर्धांमधून यश संपादन केले. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना मेडल आणि प्रमाणपत्र तसेच युनिटला स्मृतिचिन्ह देण्यात आले. सेंटरच्या प्रमुख सुनीता वैद्य यांनी प्रास्ताविक केले.

## महत्वाचे...



### उपळाई गावात जलसा कार्यक्रम

**बार्शी, दि. ११ जानेवारी-**

श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने उपळाई (ठोंगे) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिरात सांस्कृतिक संध्या सत्रात प्रबोधनात्मक जलसा कार्यक्रमाने ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले. जलसा कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी जलसा सादरकर्ते डॉ. जयभीम शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष पप्पू रगडे, रणजित ठोंगे, कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, डॉ. मनोज चिकराम, प्रा. समाधान लोंढे, डॉ. श्रीराम वैद्य उपस्थित होते. यावेळी फेसबुकवर येड्यांचा बाजार, दोनच राजे इथे जन्मले, सांगा धनाचा साठा कुठं हाय हो, माझी मैना गावाकडं राहिली, आम्ही तुफानातले दिवे, मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव आदी गीतांचे सादरीकरण करण्यात आले. जलसा सादरीकरणात कृष्णा काळे, प्रेम सरवदे, तेजस कोळेकर, कृष्णा काळे, सुमित घाटगे आदी कलाकारांनी कला सादर केली. कार्यक्रमाचे निवेदन रोहन भंडारे यांनी केले.

### १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम गुणांकन जिल्हा परिषद वेबसाईटवर जाहीर

**दक्षिण सोलापूर, दि. ११ जानेवारी -**

सामान्य प्रशासन विभागाच्या १ ऑक्टोबर रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमास १०० दिवसांची मुदतवाढ दिली आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या १६ सप्टेंबर रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाबाबत सूचना देण्यात आले आहेत. सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा परिषदेचे गुणांकन करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या विवरणपत्रात माहिती प्राप्त झाली. जिल्हा परिषदेकडून प्राप्त माहितीच्या आधारे ग्राम विकास विभागाकडून जिल्हा परिषदेचे गुणांकन व वर्गवारी करण्यात आली असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. सेवा विषयक बार्बीच्या अनुषंगाने १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमाबाबत गुणांकनाची व वर्गवारीची माहिती जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्याचे प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविण्यात आला आहे.

### ग्लोबल व्हिलेज महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. वाय. डी. पुजारी

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**



दयानंद महाविद्यालय, सोलापूर येथे तब्बल ३२ वर्षे अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून यशस्वीपणे सेवा केलेले ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. वाय. डी. पुजारी यांची कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, बोरामणी या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी निवड झाली आहे. ही निवड संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मा. कुलगुरू नियुक्त प्रतिनिधी प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांच्या सह अन्य महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षण तज्ज्ञाच्या निवड समितीमार्फत करण्यात आली आहे. डॉ. पुजारी हे एम. ए., एम. फिल., एम. एस. डब्ल्यू. या उच्च शैक्षणिक पात्रतेसह अर्थशास्त्र, समाजशास्त्र व सामाजिक कार्य क्षेत्रातील अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात अध्यापन, संशोधन व शैक्षणिक प्रशासन या तिन्ही क्षेत्रांत योगदान दिले आहे. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सचिवा संगीता शहा-चनशेट्टी यांच्या सह विविध शैक्षणिक संस्था, सहकारी प्राध्यापक, माजी विद्यार्थी व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### पिसेवाडी शाळा समिती अध्यक्षपदी शेंडे तर उपाध्यक्षपदी राऊत

**वेळापूर,दि.११ जानेवारी-**

पिसेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अण्णासाहेब शेंडे तर उपाध्यक्षपदी अमोल राऊत यांची पुनश्च फेर निवड करण्यात आली. प्रत्येक वर्गातून प्रतिनिधींची निवड करण्यात आली. यामध्ये नवनाथ पिसे, प्रियंका साठे, तुकाराम पिसे, महादेव पिसे, ज्योती पिसे, हरिदास वाघ, उमा पिसे, अण्णासाहेब शेंडे, अमोल राऊत, रुचिरा पिसे, सुनिता पिसे, रामचंद्र पिसे, शितल गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य पुष्पा पिसे, दादासाहेब पिसे, सारिका शिंदे, यांची निवड झाली. उपसरपंच भाऊसाहेब पिसे तसेच इतर पालक वर्ग उपस्थित होते. मुख्याध्यापक जालिंदर बनकर सयाजी माने, कृष्णदेव तुपे, प्रशांत चिंचकर, प्रशांत पाटील, सारिका शिंदे, अवंती शिंदफळकर आदि शिक्षकांनी निवड प्रक्रिया पार पाडली. निवडीनंतर सर्वांचा सन्मान उपसरपंच पिसे यांच्या हस्ते करण्यात आला. सयाजी माने यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### अर्जुनराव हेमाडे

**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**



शनिवार पेठेतील जुन्या काळातील टेलर अर्जुनराव एकनाथराव हेमाडे (वय ९०) यांचे रविवारी वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. ते मुद्रण व्यावसायिक नेमिनाथ हेमाडे यांचे थोरले बंधू तसेच विद्यानिकेतन प्रशालेच्या निवृत्त शिक्षिका सुधा हेमाडे यांचे दीर होत.

# गर्भलिंग निदान प्रकरणी आणखी दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जानेवारी -**

तालुक्यातील जामगाव (आ)-वाणेवाडी शिवारात अवैध गर्भलिंग निदान करुन फिरते गर्भपात केंद्र चालविल्या प्रकरणात पोलिसांनी कारवाईचा वेग वाढवत आणखी दोघांना अटक केली आहे. न्यायालयाने या दोन्ही संशयित आरोपींना १३ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणात यापूर्वी माढा तालुक्यातील रोपळे येथील बोगस डॉक्टर अजित सुरेश मस्तुद (वय ३६) यास अटक करुन सर्व साहित्य जप्त करण्यात आले होते. त्यानंतर तपासादरम्यान गर्भपाताच्या गोळ्या पुरवठा करणारा नरेंद्र जगन्नाथ भगत (वय ४०, रा. आनंदनगर, अकलूज) यालाही ८ जानेवारी रोजी अटक करण्यात आली होती.

दोन्ही संशयित आरोपींना अन्वेषण अधिकारी तथा पोलीस उपविभागीय अधिकारी अशोक सायकर यांनी बार्शी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने १३ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही घटना ८ जानेवारी रोजी रात्री वाणेवाडीकडे जाणाऱ्या

रस्त्यालगत समाधान बाबर यांच्या शेतात घडली होती. संशयित आरोपी अजित मस्तुद याने यापूर्वीही विनापरवाना व बेकायदेशीरपणे अनेक महिलांचे गर्भलिंग निदान करुन गर्भपात केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी ग्रामीण रुग्णालय बार्शीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत शिंदे यांनी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तपासादरम्यान संशयित आरोपी मस्तुद याला विश्वासात घेऊन चौकशी केली असता, त्याने गर्भपाताच्या गोळ्या नरेंद्र भगत याच्याकडून घेत असल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी अकलूज येथे छापा टाकून नरेंद्र भगत यास अटक केली. दरम्यान, मुख्य आरोपी अजित मस्तुद याच्याकडे करण्यात आलेल्या सखोल चौकशीत त्याने संपूर्ण रॅकेट चालवत असल्याची कबुली दिली आहे. त्याच्या माहितीनुसार या रॅकेटमध्ये सहभागी असलेला आणखी एक संशयित आरोपी अकबर मुलाणी याला पोलिसांनी बीड जिल्ह्यातील केज येथून ताब्यात घेऊन अटक केली आहे. या रॅकेटची पाळेमुळे इतर जिल्ह्यांतही पसरली असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

या दोघांविरुद्ध गर्भपात अधिनियम १९७१ चे कलम ३ व ४ तसेच गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र अधिनियम १९९४ मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपविभागीय अधिकारी अशोक सायकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# दुधनी नगराध्यक्षाचा पदभार प्रथमेश म्हेत्रे १३ जानेवारीला घेणार

**स्विकृत सदस्य व उपनगरध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार हे सस्पेन्स**







**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि ११ जानेवारी**

दुधनी नगर पालिका नगराध्यक्षपदाचा पदभार सोहळा, उपनगराध्यक्ष व स्विकृत सदस्य निवड १३ जानेवारीला दुपारी ३ वा होणार आहे. उपनगराध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याकडे संपुर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. स्विकृत सदस्यपदी कोणाची वर्णी लागणार या फैसल्याचा निर्णय शिंदे सेनेचे सोलापुर जिल्ह्यातील जेष्ठ नेते म ाजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे हेच घेणार असुन त्या बंद लखोट्यातील निर्णयाची लॉटरी कुणाची निघणार याबाबत मोठा सस्पेन्स असल्याचे शिंदे सेनेचे नेते दुंधनी येथील विजयाचे किंगमेकर शंकर म्हेत्रे यांनी सांगितले.

अक्कलकोट तालुक्यात दुधनी नगर पालिकेत गेली अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता अबाधित होती. माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी जुनमध्ये शिंदे सेनेत प्रवेश केल्यानंतर अवघ्या काही महिन्यात नपा निवडणुक झाली. अत्यंत अल्पकाळात शिदे सेनेला अक्कलकोट तालुक्यात मोठे यश मिळाले. दुधनी न.पा. नगराध्यक्षपदी शिंदे सेनेचे प्रथमेश म्हेत्रे मोठया फरकाने विजयी झाले. शिंदे सेनेचे सर्व नगरसेवक विजयी झाले. नगराध्यक्षपदाचा पदभार, उपनगराध्यक्ष निवड, स्विकृत सदस्य निवड १३ जानेवारी रोजी होणार आहे. उपनगराध्यक्षपदी कुणाची निवड होणार, स्विकृत सदस्यपदी कुणाची निवड होणार याबाबत १३ रोजीच बंद लखोटा उघड होणार आहे. याबाबत मोठे गुढ आहे. याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे शिंदे सेनेचे जिल्हयातील जेष्ठ नेते माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे याना सर्वाधिकार आहेत. ते कोणची निवड बंद लखोट्यातुन जाहीर करणार आहेत हे मोठे सस्पेन्स आहे अशी माहिती शिंदे सेनेचे जेष्ठ नेते शंकर म्हेत्रे यांनी दिली.





# ‘देश का बल बजरंग दल’ च्या जयघोषात बार्शीत शौर्य संचलन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.११ जानेवारी-**

‘देश का बल. बजरंग दल’’ ‘जय श्रीराम’ च्या घोषणांनी बार्शी शहर दुमदुमून सोडत मोठ्या शिस्तीत निघालेल्या संचलनात बजरंग दलाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. शिस्तबद्ध शौर्य संचलन पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांची गर्दी झाली होती, चौकाचौकात नागरिकांकडून पुष्पवृष्टी करण्यात आली.

बार्शीत प्रथमच विश्व हिंदू परिषद बजरंग दल बार्शी प्रखंड (जि. सोलापूर) द्वारा आयोजित शौर्य संचलन शनिवार दि. १० जानेवारी रोजी झाले. सदर शौर्य संचलन कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणुन बजरंग दलाचे राष्ट्रीय सह संयोजक विवेक कुलकर्णी, विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष गजानन धरणे, विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण, बजरंग दल पश्चिम महाराष्ट्र प्रांत सह संयोजक संदेश भेगडे, भगवंत मंदिर ट्रस्ट सदस्य मुकुंद कुलकर्णी यांच्यासह सोलापूर विभाग, सोलापूर जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

संचलन भगवंत मैदान येथून निघून पुढे महाद्वार चौक, वीर सावरकर चौक, पटेल चौक, ऐनापूरे मारुती चौक, आर. एस.एम. हाइट, मल्लाप्पा धनशेट्टी रोड मार्गे, शाहीर अमर शेख चौक, पांडे चौक, नगरपरिषद, नरवीर तानाजी चौक, संकेश्वर उद्यान, एकवीराई चौक मार्गे भगवंत मंदिर येथे समारोपाचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमास विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री बापूसाहेब कदम, प्रखंड मंत्री अमर शुक्ला, सहकार मंत्री गोविंद शिंदे, बजरंग दल प्रखंड संयोजक शिरीष जाधव, प्रखंड प्रचार प्रसार प्रमुख ऋषीकेश भुजबळ यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# शेंद्री येथे पोटदुखीच्या त्रासाला कंटाळून एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.११ जानेवारी-**

पोटाच्या आणि इतर शारीरिक व्याधींना कंटाळून तालुक्यातील शेंद्री येथील एका ५१ वर्षीय व्यक्तीने आपल्या शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. राजेंद्र चतुर्भुज कोरे (वय ५१, रा. शेंद्री, ता. बार्शी) असे मृत व्यक्तीचे नाव असून, ही घटना शनिवार, दि. १० जानेवारी रोजी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत राजेंद्र कोरे हे मूळचे शेंद्री येथील रहिवासी होते, परंतु नोकरीनिमित्त ते बार्शी शहरात वास्तव्यास होते. त्यांचे आई-वडील शेंद्री येथील वस्तीवर राहून शेती करतात. राजेंद्र यांना मागील काही काळापासून पोटदुखीचा तीव्र त्रास होत होता. यावर त्यांनी शस्त्रक्रिया आणि विविध उपचार केले होते, तरीही त्यांना आराम मिळत नव्हता. सततच्या आजारपणामुळे आणि असह्य वेदनांमुळे ते प्रचंड मानसिक तणावात होते.

शनिवार, दि. १० जानेवारी रोजी सकाळीच्या सुमारास फिर्यादी तथा मृताचे मावस भाऊ आप्पासाहेब अंबऋषी माळी (रा. शेंद्री) हे शेतातील कामासाठी जात असताना, त्यांना गावातील आसाराम मडके यांनी फोनवरुन घटनेची माहिती दिली. राजेंद्र यांनी शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेतल्याचे समजताच, आप्पासाहेब माळी यांनी आपला मुलगा हरिश्चंद्र याला घेऊन तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळी पोहोचले असता, राजेंद्र कोरे यांनी नायलॉनच्या दोरीने झाडाला गळफास घेतल्याचे आढळून आले. त्यानंतर मृताचे वडील चतुर्भुज कोरे तसेच गावातील शिवाजी शिंदे, रंगनाथ गोंदिल आणि इतर ग्रामस्थ तिथे जमा झाले. उपस्थितांनी खात्री केली असता राजेंद्र यांचा असल्याचे स्पष्ट झाले.

# वेळापुरात आरपीआय (आठवल गट)ची बैठक



**प्रदेशाध्यक्ष सरवदे यांनी केले मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.११ जानेवारी-**

येथील शिवशंभू मंगल कार्यालयात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची (आठवले) जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वाची बैठक पार पडली. पालखी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या बैठकीस प्रदेशाध्यक्ष सरवदे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले होते. बैठकीमध्ये आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या अनुषंगाने सखोल चर्चा करण्यात आली. जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांची सद्यस्थिती, संघटनात्मक बांधणी, तसेच पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक असलेल्या रणनीतीवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. आगामी निवडणुकांमध्ये पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडण्यासाठी कार्यकर्त्यांनी संघटितपणे काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी राज्य सचिव सुनील सर्वगोड, उपाध्यक्ष नंदकुमार केंगार, जितेंद्र बनसोडे, किरण धाईंजे, आप्पासो जाधव, एन.के. साळवे, बाळासाहेब कसबे, चंद्रकांत वाघमारे, हनुमंत कसबे, नागनाथ ओहोळ, एस एम गायकवाड, कुमार भोसले, दामोदर साठे, शामसुंदर गायकवाड, तात्यासो काळे, अण्णा बनसोडे, विक्रम शेळके, बापूसो बनसोडे, विठ्ठल क्षिरसागर ,शामराव भोसले, तुकाराम बाबर, रमेश धाईंजे, आठवले सिद्धार्थ, बनसोडे भारत आठवले तालुकाध्यक्ष, नगरसेवक अविनाश मडीखांबे आदी उपस्थित होते.




# फुले प्रतिष्ठानतर्फे ७०० विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ११ जानेवारी-**

माढ्यातील महात्मा फुले प्रतिष्ठानच्या वतीने ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीच्या निमित्ताने सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशाला येथे ७०० विद्यार्थीनीना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

प्रारंभी सावित्रीमाई फुले आणि जिजाऊ मॉसाहेब यांच्या प्रतिमाचे पूजन आणि दीपप्रज्वलवन नगराध्यक्षा अँड. मीनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक अजिनाथ माळी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी प्रतिष्ठानचे प्रतिसावित्री तृप्ती पवार, उपाध्यक्ष डॉ. एच.बी. क्षीरसागर, संचालक समाधान राऊत, राजाराम देवकर, नगरसेविका सुनीता राऊत, मुख्याध्यापक नागेश खेडकर, केंद्रप्रमुख सुरेश माळी, शाळा व्यवस्थापनचे धैर्यशील भांगे, शबाना बागवान, रेश्मा लंकेश्वर, भैया खरात, हनुमंत भोसले, नगरसेवक शिवाजी जगदाळे, रमेश थोरात, मुन्ना बागवान, संग्राम राऊत, सर्जेराव राऊत, निरंजन राऊत, अनिल राऊत, अक्षय शिरसागर, सुरज देवकर, सागर राऊत, प्रकाश देवकर, अनिकेत देवकर, सुमित राऊत, पांडुरंग पुजारी उपस्थित होते.

याप्रसंगी नगराध्यक्षा अँड. मीनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, मुख्याध्यापक नागेश खेडकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे, डॉ. एच.बी. क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव लक्ष्मण राऊत, सूत्रसंचालन किरण शेलार यांनी तर आभार भरत डुचाळ यांनी मानले.

# जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीणच्या कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे

**वेतनासाठी मुख्यमंत्री कार्यालयातून हालचाली**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ११ जानेवारी -**





जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यात जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात विविध पदावर कंत्राटी तत्त्वावर कर्मचारी कार्यरत कर्मचारी यांचे चार महिनेचे वेतन शासनाकडे प्रलंबित आहे. या मागणी साठी कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी पुढाकार घेतला आहे. सोलापुरात राज्य पाणी व स्वच्छता कृती समितीचे वतीने कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड व कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी अध्यक्ष मिलिंद भोसले यांची शिष्ट मंडळासह भेट घेतली. भोसले यांनी जलजीवन मिशनचे कर्मचारी यांचा दिपावली तील दोन महिनेचे थकित वेतन देणेसाठी प्रयत्न केला होता. त्यात त्यांना यश आले होते. राज्य स्तरावर निधी उपलब्ध असूनही तांत्रिक कारण पुढे केलेमुळे कर्मचारी यांना चार महिने वेतन नाही. त्यामुळे या कार्यरत कर्मचारी कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. राज्य स्तरावर केंद्र शासनाचा निधी उपलब्ध आहे. तरीही राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा नियोजनाचा अभाव असल्यामुळे कर्मचाऱ्यांना विनाकारण फटका सोसावा लागत आहे. या परिस्थितीमुळे कर्मचारी यांचे दैनदिन खर्च व गरजा भागविणे,कर्जाचे हप्ते वेळेवर भरणा करणे, कुटुंबाची उपजीविका चालू ठेवणे अशक्य होत आहे. वेतन अदा करणेबाबत सहानभूतीपुर्वक विचार व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन देणार आहेत असेही कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी सांगितले. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील १६०० कर्मचारी यांचे वेतन तीन महिने पासून नाही. मुख्यमंत्री कार्यालयातील विशेष कार्यकारी अधिकारी सिध्देश्वर मोकाशी यांचेशी संपर्क साधला असता ही बाब मुख्यमंत्री फडणवीस यांचे निदर्शनास आणून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# ‘सुपर संडे’ ठरला प्रचाराचा ‘महारॅली’चा दिवस













## सोलापुरात सर्वच पक्षांचा जोरदार प्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जानेवारी-**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठीचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. रविवारी शहरात खऱ्या अर्थाने सुपर संडे अनुभवायला मिळाला. सुट्टीचा दिवस साधून सर्वच राजकीय पक्षांनी पदयात्रा, कॉर्नर सभा, होम टू होम प्रचार, वाहनांवरील स्पीकरद्वारे फिरता प्रचार अशा विविध माध्यमांतून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. परिणामी संपूर्ण शहरात राजकीय वातावरण तापलेले दिसून आले.

महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असून मंगळवार, १३ जानेवारी रोजी प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. मागील आठवड्यापासूनच सोलापुरात प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. भाजपच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी सोलापुरात जाहीर सभा घेतली होती. त्याआधी एमआयएम चे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांचीही सोलापुरात जाहीर सभा झाली.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते तथा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही सोलापुरात सभा घेऊन उमेदवारांना बळ दिले. दरम्यान, प्रचारासाठी अवघे तीन दिवस शिल्लक असताना रविवारी सर्वच पक्षांनी प्रचाराचा वेग आणखी वाढवला. शहरातील सर्व २६ प्रभागांमध्ये पदयात्रा, कॉर्नर सभा, घरोघरी भेटी देत मतदारांशी संवाद, महिला व युवक मेळावे, तसेच रिक्षा व वाहनांवर स्पीकर लावून फिरता प्रचार मोठ्या प्रमाणावर सुरू होता.

भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी विविध प्रभागांमध्ये मोठे शक्तीप्रदर्शन करत पदयात्रा काढल्या. प्रभाग क्रमांक ३, ९, १२ आणि १३ मध्ये भाजपच्या उमेदवारांच्या पदयात्रांना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार विजयकुमार देशमुख यांनीही विविध ठिकाणी प्रचारात सक्रिय सहभाग नोंदवला. भाजपसह काँग्रेस, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), एमआयएम, माकप, वंचित बहुजन आघाडी तसेच अपक्ष उमेदवारांचाही प्रचार जोरात सुरू होता. प्रत्येक पक्ष आपापल्या पद्धतीने मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करताना दिसून आला.

### कोण मारणार बाजी?

रस्त्यांवर झेंडे, बॅनर, घोषणा, ढोल-ताशांचा गजर, कार्यकर्त्यांची गर्दी, उमेदवारांचे प्रचार दौरे यामुळे सोलापूर शहरात निवडणुकीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात कोण बाजी मारतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लाडकी बहीण योजना बंद होणार नाही




## भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांचे आश्वासन

### प्रभाग १७ मधील उमेदवारांच्या विजयाचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.११ जानेवारी-**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जोपर्यंत मुख्यमंत्री आहेत. तोपर्यंत ही योजना चालूच राहणार आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींनी काळजी करण्याचे कारण नाही. सोलापूर शहराचा चौफेर विकास होण्यासाठी भाजपच्या अधिकृत उमेदवारांना महापालिकेत पाठवा असे आवाहन देखील यावेळी भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी केले.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १७ मधील भाजपच्या अधिकृत उमेदवार निर्मला हरीश जंगम, भारतसिंग विठ्ठलसिंग बडूरवाले, जुगनबाई शमशेरसिंग आंबेवाले, रवी शंकरसिंग कय्यावाले यांच्या प्रचारार्थ बेडर पूल लष्कर येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून सुमित पाटील माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, जेम्स जंगम आदींसह समाजाचे जेष्ठ नेते व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी देवेंद्र भंडारे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करताना विकासासाठी भाजप उमेदवारांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. दरम्यान भाजपचे अधिकृत उमेदवारांनी देखील सोलापूरच्या विकासासाठी पुन्हा एकदा महापालिकांवर भाजपचा झेंडा फडकवण्याचे आवाहन केले. यांनी दर्शवला पाठिंबा. याप्रसंगी भाजपच्या अधिकृत उमेदवारांना नवदुर्गे प्रतिष्ठान लष्कर सोलापूर यांनी पत्र प्रसिद्ध करत जाहीर पाठिंबा दर्शवला. याप्रसंगी निलेश बंबईवाले, सागर बंबईवाले, विनायक सोनगेवाले, विजय लंगडेवाले, गोविंद मनसावाले

उपस्थित होते. त्याचप्रमाणे श्री राम राज्य प्रतिष्ठान मंडळाने देखील जाहीर पाठींबा दर्शविला. या प्रसंगी अजय मनसावाले, तुषार परदेशी,विवेक लंगडेवाले, किरण बोकेवाले, गणेश बाबावाले, रोहन बंबईवाले, रोहित मनसावाले आदींची उपस्थिती होती. तसेच दिशा सामाजिक संस्थेने देखील उमेदवारांना पाठिंबा दिला. संस्थेचे अध्यक्ष डॉ.योगेश पलोल्लू, नरसिंग पंदिरोलू, नरसिंग मिसालोलू यांची उपस्थिती होती. संपूर्ण पॅनलला लष्कर भागातील विविध मंडळांनी जाहीर पाठिंबा देण्यात आल्याने भाजपचा उमेदवारात आणि प्रभागात उत्सवाचे वातावरण पसरले.

## महापालिका निवडणूक मतदान केंद्रात मोबाईल वापरास सक्त मनाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जानेवारी-**

मतदान प्रक्रियेची गोपनीयता, पारदर्शकता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतदान केंद्रात मोबाईल, कॉर्डलेस व वायरलेस फोन वापरण्यावर सक्त निर्बंध घालण्यात आले आहेत.

भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगाच्या स्पष्ट निर्देशानुसार हे नियम लागू करण्यात आले असून, त्यांचे उल्लंघन झाल्यास मतदान केंद्रांवर वाद, गैरप्रकार तसेच मतदानाचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होण्याची शक्यता वाढू शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या पत्र तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या २६ जून २०२५ च्या निर्देशानुसार मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल फोन नेण्यास पूर्णतः बंदी आहे. तसेच मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात कर्मचारी व पोलीस यांच्याव्यतिरिक्त कोणालाही मोबाईल, कॉर्डलेस किंवा वायरलेस फोन वापरण्यास मनाई करण्यात आली आहे.

वृद्ध, दिव्यांग अथवा विशेष गरज असलेल्या मतदारांनी जर मोबाईल आणला असेल, तर तो पूर्णतः बंद ठेवून मतदान केंद्रात प्रवेश करण्यापूर्वी बाहेर त्यांच्या सोबत असलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द करणे बंधनकारक आहे. स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन संबंधित जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त किंवा निवडणूक निर्णय अधिकारी मतदान केंद्रात किंवा केंद्राबाहेर ‘मोबाईल फोन जमा कक्ष’ स्थापन करू शकतात.

या कक्षात किमान १० कप्प्यांचा पीजन होल बॉक्स, क्रमांकित टोकन, मतदान केंद्राचा शिक्का व प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक असून मोबाईल जमा व परत देतानाचे चित्रीकरण करणे आवश्यक राहणार आहे.मतदानानंतर मतदाराने दिलेले टोकन जमा केल्यानंतर संबंधित मोबाईल फोन परत दिला जाईल. कायदा-सुव्यवस्था, स्वयंसेवकांची उपलब्धता पाहून मोबाईल जमा कक्षाबाबत अंतिम निर्णय प्राधिकृत अधिकारी घेणार आहेत.

दरम्यान, उमेदवार, राजकीय पक्ष, त्यांचे प्रतिनिधी व नागरिकांनी या नियमांची माहिती करून घेऊन ती मतदारांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. मतदान ही लोकशाहीची पवित्र प्रक्रिया असून, तिची शिस्त व गोपनीयता राखण्यासाठी सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, असे प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

# प्रभाग १३ मध्ये सुपर संडे पदयात्रा; लाडक्या बहिणींची रेकॉर्डब्रेक गर्दी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.११ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीची रंगत वाढली आहे. प्रभाग क्रमांक १३ मधील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सुपर संडे पदयात्रेत लाडक्या बहिणींची रेकॉर्डब्रेक गर्दी झाली होती.

आमदार देवेंद्र कोठे, त्यांच्या पत्नी मोनिका कोठे, भगिनी राधिका चिलका यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभाग क्र. १३ मधील भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनिता सुनिल कामाठी, अंबिका हनुमंत चौगुले, सत्यनारायण रामय्या गुर्रम व विजय भुमय्या चिप्पा यांच्या प्रचारार्थ ढोल-ताशांच्या गजरात पदयात्रा काढण्यात आली.

हॉटेल सत्यम, ७० फूट रोड भाजी मंडई, गेंट्याल चौक, संत तुकाराम चौक, बापूजी नगर, विद्यानगर, पाथरूट चौक, खड्डा चौक, अशोक चौक पोलिस चौकी, क्रांती झोपडपट्टी, कमटम नगर, श्रीकृष्ण मंदिर, भावनाऋषी पेठ दवाखाना, पंचमुखी मंदिर या मार्गावरुन ही पदयात्रा काढण्यात आली.

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या रिंगणातील भाजपाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठछी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी सोलापुरात आले होते. त्यांच्या दौऱ्यानंतर शहरात भाजपमय वातावरण झाले आहे. दरम्यान, सोलापूर महापालिकेवर भाजपचा झेंडा फडकेल, असा विश्वास आमदार देवेंद्र कोठे यांनी यावेळी व्यक्त केला.

# राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षामुळे प्रभाग ६कडे दुर्लक्ष; अपक्ष उमेदवार मनोहर सपाटे यांचा आरोप




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या प्रभाग क्रमांक ६ चे ह राज्यकर्त्यांच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे अक्षरशः वाटोळे झाले असून गेल्या पंधरा वर्षांत सत्तेत असूनही विरोधकांनी या प्रभागासाठी काहीही ठोस काम केले नाही, असा घणाघाती आरोप अपक्ष उमेदवार तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केला.

प्रभाग ६ मधील दमाणीनगर परिसरात आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी सपाटे यांनी विरोधकांवर टीकेची झोड उठवत, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे सत्ताधाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचे सांगितले. रस्ते, पाणी, स्वच्छता, ड्रेनेज यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे पाठ फिरवली गेल्याने या प्रभागाची अवस्था दयनीय झाली आहे, असेही ते म्हणाले.तसेच आपण व आपल्या पॅनलमधील सर्व अपक्ष उमेदवार निवडून आल्यास या प्रभागाचा नियोजनबद्ध व सर्वांगीण विकास करण्याची ठाम ग्वाही सपाटे यांनी दिली.आपल्या ‘टोपली’ या निवडणूक चिन्हाच्या माध्यमातून राजकारणातील घाण साफ करून विकासाला प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आपले पॅनल सर्वसमावेशक असून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यामुळे मतदारांनी अपक्ष उमेदवार रेखा गायकवाड यांच्या पांगुळगाडा , कीर्ती शिंदे यांच्या कपाटाला तर अंकुश राठोड यांच्या रोडरोलर चिन्हालादेखील मत देत आपल्या सर्व पॅनलला विजयी करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.या प्रचार सभेस वरील सर्व अपक्ष उमेदवार यांच्यासह अ‍ॅड. बाबासाहेब सपाटे, प्रियांका सपाटे, लहू गायकवाड, बॉबी शिंदे, अतिश म्हेत्रे, दत्ता भोसले, सोनल भोसले, दत्ता खलाटी, नागेश रुपनर, नागनाथ पवार, श्याम गांगर्डे आदी मान्यवर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रभाग २४ मधील उषा काळे यांच्या प्रचाराला २२ सोसायट्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जानेवारी-**

प्रभाग क्रमांक २४ मधील अपक्ष उमेदवार उषा राजेश काळे यांच्या प्रचाराला येथील २२ सोसायट्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

फॉरेस्ट विभागाच्या आरक्षणामुळे या २२ सोसायट्यांमधील घरांची खरेदी-विक्री गेल्या अनेक वर्षांपासून बंद आहे. मात्र, याकडे सत्ताधारी वा विरोधी पक्षाचे लक्ष नाही.

विद्यमान आमदारांनीही फक्त बैठका घेऊन, चर्चा करुन भूलथापा देण्याचे काम केले. निवडणुकीत आश्वासनांचे गाजर दाखविणारी मंडळी नंतर मात्र पाठ फिरवत राहिले. हा परिसर कायम भाजपाच्या मागे असतानाही न्याय मिळालेला नाही. याउलट, माजी उपमहापौर राजेश काळे यांनी मूलभूत प्रश्नांवर प्रत्यक्ष काम करुन दाखवले आहे.

गटार, पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, नागरी सुविधांचे प्रश्नही त्यांनी सोडवले. त्यामुळे २२ सोसायटी परिसरात उषा काळे यांना मताधिक्य मिळणार असल्याचे सांगण्यात येते. उषा राजेश काळे यांच्यासह सतीश म्हस्के, शैलजा राठोड आणि विकास कदम हे स्थानिक, तळागाळातील लोकांशी थेट जोडलेले उमेदवार आहेत. राजेश काळे यांच्याव्यतिरिक्त एकाही नगरसेवकाने या भागात ठोस विकासकामे केलेली नाहीत. नागरिकांनी अनुभवातून हे पाहिले आहे, असेही सांगण्यात आले.

### प्रभाग क्रमांक २४ मध्ये परिवर्तनाची लाट

खोटी आश्वासने, फसवी बैठका आणि केवळ निवडणुकीपुरते राजकारण नाकारुन, लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारे, सातत्याने संपर्कात असणारे नेतृत्व हवे आहे. त्यासाठी प्रभाग क्रमांक २४ मधील शिवसेनेच्या उमेदवारांना मतदान करुन परिवर्तनाची लाट आणू, असे सांगण्यात येते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तुळजापूर येथे जिल्हास्तरीय प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जानेवारी -**

राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर, शिक्षण विभाग जिल्हा परिषद धाराशिव, धाराशिव जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ तसेच श्री तुळजाभवानी सैनिक विद्यालय, तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान, गणित व पर्यावरण प्रदर्शन २०२४-२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

हे भव्य प्रदर्शन दि.१२ व १३ जानेवारी २०२५ रोजी श्री तुळजाभवानी सैनिक विद्यालय, तुळजापूर येथे होत आहे. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन दि.१२ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुवार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. मैनाक घोष (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव हे राहणार आहेत.

या विज्ञान प्रदर्शनास विद्यार्थी, शिक्षक, पालक, शैक्षणिक तज्ज्ञ व विज्ञानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, रवींद्र स्वामी, प्राचार्य वैजनाथ घोडके आदींनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### लोकमंगल मल्टीस्टेटच्या वतीने पत्रकारांचे सत्कार

**लोहारा, दि.११ जानेवारी -**

तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील लोकमंगल मल्टीस्टेट शाखेच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त सत्कार करण्यात आले. धनाजी धोतरकर व बाबासाहेब भोसले यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित शाखेचे सल्लागार अनिल जाधव, सम्राट पारवे मकरंद बामनकर, सोमनाथ पावले, बंडोपंत कोळेकर, वैभव काळदाते व शाखेतील कर्मचारी उपस्थित होते.



### कळंबमध्ये मोफत आरोग्य व उपचार शिबिर संपन्न

**कळंब, दि.११ जानेवारी -**

गुरू महाराज हजरत डॉ. शाह जाकीर हामिद (म.आ.) यांच्या पवित्र वाढदिवसानिमित्त कळंब येथे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. ऑल इंडिया सूफी संत तहेरीके सिराते मुस्तकीम (महाराष्ट्र), एहसास फाउंडेशन कळंब व पवार हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.११) हे शिबिर पार पडले. डॉ. सुशील पवार व डॉ. सायली पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदाब, शुगर, नेत्र तपासणीसह विविध आजारांची तपासणी करण्यात आली. या शिबिराचा १०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. यावेळी नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिरानंतर आयोजकांनी सोजर मतिमंद निवास शाळा येथे विशेष मुलांना मिठाई वाटप केले.



### तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीचा तुळजापूरात सत्कार

**तुळजापूर, दि.११ जानेवारी -**

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्गासाठी गेल्या २५ वर्षांपासून सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेत आनंदीयुनिव्हर्सल फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समिती व आंदोलनातील सदस्यांना १० डिसेंबर रोजी महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. या पुरस्काराबद्दल इच्छापूर्ती गणपती ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने समितीचे अध्यक्ष बबनराव गावडे, सल्लागार अंबादासराव पोपळे व अन्य पदाधिकारी-कार्यकर्त्यांचा शाल, श्रीफळ, हार व फटाक्यांच्या आतषबाजीत सत्कार करण्यात आला. तसेच दर्पण राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार अंबादासराव पोपळे यांचाही ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने गौरव करण्यात आला.

### IJCTOच्या वतीने ५ फेब्रुवारीला संसद भवनावर भव्य मोर्चा

**धाराशिव, दि.११ जानेवारी -**

केंद्र व राज्य सरकारच्या शिक्षक व शिक्षणविरोधी धोरणांविरोधात देशातील सात प्रमुख शिक्षक संघटनांनी एकत्र येत अखिल भारतीय शिक्षक संघटना संयुक्त कृती समिती (खगउढज)ची स्थापना केली असून, शिक्षण क्षेत्रातील ज्वलंत प्रश्नांवर देशव्यापी आंदोलन छेडले जाणार आहे. येत्या ५ फेब्रुवारी रोजी संसद भवनावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिली.

# तेरखेडा गावात रविवारी दिवसभर बत्ती गूल; नागरिकांचा संताप

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तेरखेडा गावात रविवारी चक्क संपूर्ण दिवस विद्युत पुरवठा खंडित राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

लाईटला देखील रविवारची सुट्टी आहे का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

दिवसभर वीज नसल्यामुळे गावातील उद्योग, व्यापार तसेच दैनंदिन व्यवहार पूर्णतः ठप्प झाले. दुकानदार, व्यापारी आणि सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले.




विशेष म्हणजे वीजपुरवठा बंद असल्याने मोबाईल नेटवर्कही दिवसभर गायब होते.

नेटवर्क टॉवर्स पूर्णतः वीजपुरवठ्यावर अवलंबून असून, संबंधित कंपन्यांकडून इन्व्हर्टर किंवा पर्यायी व्यवस्थेचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले आहे.

फोन लागत नसल्यामुळे नागरिकांचा संपर्क तुटला, अत्यावश्यक कामे खोळंबली आणि संपूर्ण गाव जणू डिजिटल अंधारात गेल्याचे चित्र पाहायला मिळाले. मोठे व महत्त्वाचे गाव असूनही वारंवार होणारा वीज लपंडाव आणि नियोजनशून्य कारभारामुळे महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या प्रकाराची महावितरण प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी तेरखेडा ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# शेवटच्या खेट्यादिवशी मैलारपुरात भाविकांची मोठी गर्दी

### 'येळकोट, येळकोट जय मल्हार'च्या गजरात खंडोबा दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जानेवारी -**

'येळकोट, येळकोट जय मल्हार'च्या जयघोषात रविवारी दि. ११ जानेवारी रोजी शेवटच्या खेट्यादिवशी नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुर येथे श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. श्रीक्षेत्र मैलारपुर येथे पावणेदोन महिन्यांच्या वास्तव्यानंतर श्री खंडोबा देव परत अणदुर मुक्कामी जाणार असल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.



रविवारी पहाटेपासूनच नळदुर्ग शहर व परिसरातील तसेच तालुक्यातील भाविक दर्शनासाठी मैलारपुरात दाखल झाले होते. दि.३ जानेवारी रोजी श्री खंडोबा देवाची यात्रा मोठ्या भक्तिभावात संपन्न झाली होती. यात्रेदरम्यान जे भाविक दर्शनास येऊ शकले नव्हते, त्यांनी रविवारी ११ जानेवारी रोजी शेवटच्या खेट्याचा लाभ घेतल्याने दिवसभर मैलारपुर परिसरात मोठी गर्दी उसळली होती.

श्री खंडोबा देव पावणेदोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी मैलारपुरात आले होते. रविवार दि.११ जानेवारी हा त्यांच्या मैलारपुरातील वास्तव्याचा शेवटचा दिवस होता. दि.११ जानेवारीच्या रात्री नळदुर्ग व अणदुर येथील मानकरी यांच्यात मैलारपुर येथील श्री खंडोबा मंदिरात लेखी करार झाल्यानंतर श्री खंडोबा देव सव्वा दहा महिन्यांच्या वास्तव्यासाठी अणदुर मुक्कामी प्रस्थान करणार आहेत.

सोमवार दि.१२ जानेवारी रोजी पहाटे श्री खंडोबा देव अणदुर येथील मंदिरात विधीवत विराजमान होणार असून, या सोहळ्यासाठीही भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# जबर चोरी प्रकरणातील आरोपी जेरबंद; ८ गुन्हे उघडकीस

### स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**

दि.७ जानेवारी रोजी रात्री कविता ज्ञानदेव कसबे (रा. उपळा शिवार) यांच्या शेतवस्तीवरील राहत्या घरात अज्ञात आरोपींनी घुसखोरी करून त्यांना मारहाण करत सोन्याचे दागिने जबरी चोरी केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पोलीस ठाणे धाराशिव ग्रामीण येथे गुन्हा र. नं. ०५/२०२६ अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक रितू खोकर यांनी स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांना तात्काळ तपास करून गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दि.१० जानेवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार व त्यांच्या पथकास गोपनीय बातमीदारामार्फत सदर गुन्ह्यातील आरोपींबाबत माहिती प्राप्त झाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने मोहा, ता. कळंब येथील पारधी पिढीवर छापा टाकून चार संशयित आरोपींना ताब्यात घेतले. विश्वासात घेऊन चौकशी केली असता आरोपींनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच त्यांनी दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी विमानतळ परिसर, धाराशिव येथे दरोडा टाकल्याचे तसेच गोळेगाव (ता. वाशी) व अंतरवली (ता. भूम) येथे चोरी केल्याचेही मान्य केले. पोलिसांनी आरोपींकडून



सदर गुन्ह्यातील १६.२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. याशिवाय चोरीच्या चार मोटरसायकल जप्त करण्यात आल्या असून त्या शिर्डी व जामखेड येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने दरोडा, जबरी चोरी व वाहन चोरी असे एकूण आठ गुन्हे उघडकीस आणत सुमारे २ लाख ०७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अनिल उर्फ लल्लूया बादल शिंदे, छगन श्रीपती काळे, बिभीषण उर्फ बबड्या दिलीप काळे, विजय उर्फ तुंबड्या आप्पा पवार (सर्व रा. मोहा, ता. कळंब, जि. धाराशिव) अशी आहेत. नमूद आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणे धाराशिव ग्रामीण यांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. सदर आरोपी धाराशिव तसेच बाह्य जिल्ह्यातील दरोडा व जबरी चोरीसारख्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याची माहितीही समोर आली आहे.

कामगिरी पोनि. विनोद इज्जपवार, सपोनि. सुदर्शन कासार तसेच पोहवा. शौकत पठाण, जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण, मपोवा. शोभा बांगर, चापोवा. रत्नदीप डोंगरे व नवनाथ गुरव यांनी पार पाडली.

# संपूर्ण काम होऊनही अणदूरचा उड्डाण पूल बंद का?; संतप्त वाहनचालकांचा सवाल

▶▶ दोन्ही बाजूने सर्व्हिस रोडने वाहतूक वळविली... ▶▶ अपघाताच्या प्रमाणात वाढ ... ▶▶ प्रशासन, लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष...





**श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.११ जानेवारी -**

सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग ६५ वरील अणदूर येथील रखडलेल्या व बहुचर्चित उड्डाण पुलाचे संपूर्ण काम होऊनही, तसेच मध्यंतरी बरेच दिवस हा पूल वाहतुकीस खुला करून देण्यात आला होता पण अचानक कोणतेही ठोस कारण नसताना, गेल्या १५ दिवसापासून विनाकारण हा पूल वाहतुकीस बंद करण्यात आल्याने वाहन चालकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले असून, दोन्ही बाजूची वाहतूक सर्व्हिस रोडने सुरू करण्यात आल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असून, अणदूर ग्रामस्थाना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हा उड्डाण पूल त्वरित चालू करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा अणदूर ग्रामस्थानी प्रशासनाला दिला आहे.

बहुचर्चित व अनेक दिवस रखडलेले तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले आहे.

मध्यंतरी काही दिवस या उड्डाणपुलावरून वाहतूक सुरू करण्यात आली होती. त्या काळात वाहतूक कोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला होता आणि नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र पुन्हा एकदा उड्डाणपुलावरील वाहतूक बंद करण्यात आल्याने सध्या संपूर्ण वाहतूक सर्व्हिस रस्त्यावरूनच सुरू आहे. या जड वाहतुकीने पुन्हा एकदा सर्व्हिस रोड ची चाळणी होणार असून,परिणामी परिसरात पुन्हा एकदा वाहतूक कोंडी व गोंधळाचे चित्र निर्माण झाले आहे.

या मार्गाच्या उत्तरेस जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय असून दक्षिणेस विविध शाळा, दवाखाने व मुख्य बाजारपेठ आहे. त्यामुळे दिवसभर विद्यार्थी, शिक्षक, पालक, रुग्ण, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा या सर्व्हिस रस्त्यावरून होत असते. त्यातच सध्या ऊसतोड हंगाम सुरू असल्याने उसाने भरलेल्या अवजड वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अरुंद सर्व्हिस रस्ता, अवजड वाहनांची गर्दी आणि दुचाकी-चारचाकी वाहनांची रेलचेल यामुळे रहदारी अक्षरशः ठप्प होत आहे.

विशेषतः शाळकरी विद्यार्थी व पादचाऱ्यांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत असून, जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडावा लागत आहे. अपघाताची भीती कायम असल्याने पालकवर्गात तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. याआधी उड्डाणपुलावरून वाहतूक सुरू असताना हीच समस्या जवळपास पूर्णतः सुटली होती, हे वास्तव लक्षात घेता सध्या पुन्हा निर्माण झालेल्या कोंडीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

काम पूर्ण झालेल्या उड्डाणपुलावरून वाहतूक पुन्हा का सुरू करण्यात येत नाही? असा थेट प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. उड्डाणपुलावरून नियमित वाहतूक सुरू केल्यास सर्व्हिस रस्त्यावरील ताण कमी होऊन अपघातांचे प्रमाण घटेल, तसेच विद्यार्थी व पादचाऱ्यांची सुरक्षितता अबाधित राहील, अशी ठाम मागणी अणदूर परिसरातील नागरिक, पालकवर्ग व वाहनचालकांकडून होत आहे.

संबंधित विभागाने तातडीने याकडे लक्ष देऊन उड्डाणपुलावरून कायमस्वरूपी वाहतूक सुरू करावी, अन्यथा भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### ▶▶ प्रश्न अनुत्तरितच...

उड्डाण पूल विनाकारण अचानक का बंद केला याचे उत्तर कोणाजवळ ही नसून, पुलाचे काम निकृष्ट करण्यात आले पासून ते गुत्तेदाराचे बिल तटल्यामुळे त्यांनीच हा पूल वाहतुकीस बंद केला असल्याच्या चर्चेना उधाण आले असून, नेमके कारण काय या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही,लोकप्रतिनिधी, हायवे प्रशासन चिडीचूप गप्प का बसले आहे याचे उत्तर मिळत नाही, हा पूल ताबडतोब वाहतुकीस खुला करण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा अणदूर ग्रामस्थानी दिला आहे.

# मातृतीर्थ विश्ववंदनीय स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ



### जयंती विशेष...

मातृतीर्थ विश्ववंदनीय स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ या केवळ एक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व नसून, त्या एका महान विचारप्रवाहाच्या जननी होत्या. कर्तृत्व, दातृत्व, नेतृत्व, दूरदृष्टी, समाजसंगोपन आणि राष्ट्रनिर्मितीचा ध्यास-या सर्व गुणांचा संगम म्हणजे जिजाऊंचे जीवन होय. स्वावलंबन व स्वातंत्र्याचे खरे शिल्पकार म्हणून त्यांनी स्वराज्य उभारणीसाठी आपले सर्वस्व पणाला लावले.

समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा, समतेवर आधारित राज्य उभे राहावे, या उदात्त ध्येयासाठी त्यांनी स्वतःचे सुख, स्वार्थ आणि आयुष्य समर्पित केले. त्याग, समर्पण आणि धैर्य यांच्या बळावर उभारलेले त्यांचे स्वराज्य आजही संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आदर्श ठरते.

स्वयंप्रेरणा, जिद्द, चिकाटी आणि नवनिर्मितीच्या ध्येयाने प्रेरित होऊन राजमाता जिजाऊंनी केवळ एक नव्हे, तर तीन छत्रपती घडवले. त्यांच्या संस्कारक्षम मातृत्वातून दिलेले मूल्याधिष्ठित शिक्षण, राष्ट्रभक्तीची शिकवण आणि कर्तव्यनिष्ठ विचारधारा यामुळेच समाजात समता, समानता आणि बंधुत्वाची बीजे रुजली.

स्त्री सन्मान व स्त्री शक्तीची जाणीव ठेवत त्यांनी बालकांमधील सुप्त गुण ओळखले आणि त्यांच्यात सद्विचारांची पेरणी केली. धर्मसंस्कार, सांस्कृतिक जतन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समन्वय साधत त्यांनी सक्षम, जागरूक आणि मूल्यनिष्ठ समाज घडवण्याचा भक्कम पाया घातला. राजमाता जिजाऊंचे कार्य हे केवळ इतिहासातील एक अध्याय नसून, आजच्या आणि उद्याच्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. त्यांचे जीवनचरित्र म्हणजे मातृत्वातून राष्ट्रनिर्मितीची अद्वितीय गाथा होय.



**उषा अमोल बारकुल**
(सहशिक्षिका) विद्यानिकेतन विद्यालय येरमाळा

राजमाता जिजाऊ यांची जयंती ही केवळ स्मरणाची नव्हे, तर आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण त्यांच्या विचारांप्रमाणे समाज घडवत आहोत का? मूल्याधिष्ठित नेतृत्व निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहोत का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे, हेच जिजाऊंना खरे अभिवादन ठरेल.

राजमाता जिजाऊंचे जीवनचरित्र म्हणजे इतिहासातील सुवर्णपान नव्हे, तर वर्तमान आणि भविष्याला मार्ग दाखवणारा दीपस्तंभ आहे.

त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली आहे.

### कळंब बसस्थानकातून मोटारसायकल चोरी

**धाराशिव, दि.११ जानेवारी -**

कळंब बसस्थानक परिसरातील साई वडापाव हॉटेलसमोरून अंदाजे ४५ हजार रुपये किमतीची हिरो कंपनीची मोटारसायकल चोरीस गेल्याची घटना घडली आहे. पांडुरंग शिवाजी सूर्यवंशी (वय ३८, रा. कोठाळवडी, ता. कळंब, जि. धाराशिव) यांची एमएच ४४ एएफ ७४७८ क्रमांकाची मोटारसायकल दि.१७ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे २ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रामेश्वरचा दीपक कराड ठरला 'किनगाव केसरी'चा मानकरी





**तभा वृत्तसेवा,**

**किनगाव :** येथील हजरत पीर गैबी बाबांच्या उरुस यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जंगी कुस्ती स्पर्धेत लातूर तालुक्यातील रामेश्र्वर येथील मल्ल दिपक मोतीराम कराड हा मल्ल या वर्षीही किनगाव केसरीचा मानकरी ठरला आहे. मागच्या तीन वर्षांपासून हा मान त्यानेच पटकावण्याची नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

या स्पर्धेतील द्वितीय आणि तृतीय कुस्ती सामन्यात बरोबरीची झाली. या विजयी मल्लाचे स्वागत करून त्यांची पीर गैबीबाबांच्या दर्गा पर्यंत मिरवणूक काढण्यात आली. या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रभारी सरपंच विठ्ठलराव बोडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून त्र्यंबक गुट्टे, गद्रे दिलीपराव देशमुख, अशोक केंद्रे, भागवत गुट्टे, अशोक मुंढे, सपोनि. माणिक डोके, गोंविद गुट्टे, संग्राम चामे, दिनकर मुंडे, दशरथ कांबळे, सतीश लड्डा, बाबु गुत्तेदार, सुभाष घुले, ज्ञानोबा बोडके, फेरोज गुत्तेदार, सुभाष चाटे, गोकुळ मुंडे, नवनाथ सोनवणे, रफिक बागवान, धम्मानंद कांबळे, पोलीस पाटील राजकुमार शिंदे, प्रा बालाजी आचार्य, निजाम खुरेशी, सचिव राजेंद्र कांबळे, उपाध्यक्ष चंद्रप्रकाश हंगे, दक्षता कमिटी अध्यक्ष धनराज बोडके, व्यवस्थापन प्रमुख शुभम मुंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कुस्ती स्पर्धेतील बाबूराव नागरगोजे येलदरी या ७० वर्षाच्या आजोबाची कुस्ती पाहून प्रेक्षकांनी त्यांच्यावर अक्षरशः बक्षीसांचा वर्षाव केला.

पोलीस ठाण्याच्या वतीने लावण्यात आलेल्या महाराष्ट्र पैलवान विरुद्ध गुजरात पैलवान कुस्ती सामन्यात महाराष्ट्र (परळी) पैलवानाने विजय मिळविला. मान्यवरांच्या हस्ते लहान मल्लाच्या कुस्त्या लावण्यात आल्या. यावेळी एकूण ५१ कुस्त्या खेळविण्यात आल्या.

शेवटची कुस्ती दिपक कराड व बाळू चामण येल्डा यांच्यात झाली. प्रथम आलेल्या दिपक मोतीराम कराड मल्लास कर्मयोगी कै मधुकरदादा मुंडे यांच्या स्मरणार्थ ७००१ रुपये व चषक, द्वितीय कुस्तीत हरिश्चंद्र देवकते (परळी) व अमर कदम (होळ) यांच्यात बरोबरीची झाल्याने या दोन्ही मल्लास कै रंभाजीराव बोडके यांच्या स्मरणार्थ ५००१ रुपये व चषक तर तृतीय कुस्तीत भैया पाटील (रामतिर्थ) व संतोष गित्ते (तळणी) यांच्यात बरोबरीची झाल्याने या दोन्ही मल्लास कै एकनाथ विठ्ठलराव वाहुळे यांच्या स्मरणार्थ ३००१ रुपये व चषक विभागून देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी पंच म्हणून प्राचार्य जितेंद्र बदने, माजी मुख्याध्यापक दिनकर मुंडे, प्रा चेतन मुंडे, बाबूराव चाटे, प्रभाकर क्षीरसागर, सुरेश चाटे, नब्बी गुत्तेदार, बालाजी स्वामी, सचिव राजेंद्र कांबळे यांनी काम पाहिले.

# कै .जनार्धनराव राजेमाने आश्रमशाळेत टेक्नो फेस्ट साजरा



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ११ जानेवारी :** चाकूर तालुक्यातील जानवळ येथील कै .जनार्धनराव राजेमाने आश्रमशाळेत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम विज्ञान नगरी टेक्नो फेस्ट- २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यस्थस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. बाळासाहेब माने होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र राज्याचे सचिव आप्पासाहेब धुळाज यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक उपसंचालक डॉ. तेजस माळवदकर, सहाय्यक संचालक अभय अटकळ, प्रा. शिवराज मोटेगावकर, द्वारकादास श्यामकुमारचे संचालक तुकाराम पाटील, सचिव मुकेश राजमाने, प्राचार्य निलेश राजमाने, डॉ. शशिकिरण भिकाने, संतोष चव्हाण, सुधीर गोरटे, महेश सरवदे, बळीराम कांडगिरे, पवन सूर्यवंशी, सत्यजित जाधव, जावेद पटेल, इस्माईल शेख, संतोष बिरादार, रमेश बिराजदार आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. पडला. शुभ झाले. अध्यक्षस्थानी संया उपक्रमास राज्यभरातून आलेल्या अनेक आश्रमशाळांचे संस्थाप्रमुख, प्राचार्य तथा मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, आजी माजी गुणवंत विद्यार्थी, पालक उपस्थित होते. टेक्नो फेस्ट २०२६ सर्वांसाठी खुले असलेल्या या प्रकल्प प्रदर्शनाला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी भेट देऊन या बाल वैज्ञानिकांनी स्वतः तयार केलेल्या विज्ञान-तंत्रज्ञान, गणित, खगोलशाख, भूगोल, आधुनिक एआय तंत्रज्ञान, कृषी तंत्रज्ञान, पर्यावरण शाखा, तारांगण आदी विषयावरील अनेक प्रकल्पाची पाहणी करून बाल वैज्ञानिकांचे कौतुक केले.

याच कार्यक्रमात माजी विद्यार्थी संघाच्या लोगोचे आणि आश्रमशाळेचा मागोवा घेणाऱ्या यशोगाथा स्मरणिकेचे आप्पासाहेब धुळाज व अन्य मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच गुणवंत व माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य निलेश राजेमाने यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. योगेश कदम, विद्यार्थिनी सायली जानवळकर व अनुराधा उपले यांनी तर आभार सोनू डगवाले यांनी केले.

# जळकोटचा कचरा नागरिक टाकताहेत पाटोदा हद्दीत

**त.भा. वृत्तसेवा,**

**जळकोट, ११ जानेवारी :** जळकोट शहरालगत असलेल्या ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा (बु.) अंतर्गत असलेल्या हद्दीत जळकोट शहरातील नागरिक कचरा चक्क राष्ट्रीय महामार्ग वर आणून टाकला जात आहे. यामुळे पायी प्रवास करणाऱ्या नागरिकांना उग्र वासाला सामोरे जावे लागत आहे.

जळकोट नगरपंचायत तिची हद्द ही जळकोट पोलीस ठाण्याजवळ संपते, पोलीस ठाण्याच्या पुढे पाटोदा बुद्रुकची हद्द सुरू होते मात्र ही हद जळकोट शहरास लागूनच आहे. विविध शासकीय कार्यालयांना याच ठिकाणाहून जावे लागते. याच ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या वतीने प्रवाशांसाठी पर्यायी बसस्थानक उभा करण्यात आले आहे. यामुळे ही जागा अगदी जळकोट शहराला लागूनच आहे. या ठिकाणी कचऱ्याचा खच या ठिकाणी जमला आहे. यामुळे या ठिकाणी उग्र वास येत आहे तसेच परिसरही अस्वच्छ झाला आहे. जळकोट नगरपंचायतीने जळकोट हद्दीत अशा स्वरूपाचा कचरा टाकण्यास निर्बंध आहेत. यामुळे हा कचरा आता जळकोट शहराच्या अगदी लागून असलेल्या पाटोदा हद्दीत आणून टाकला जात आहे. जळकोट शहरातील अनेक वृद्ध तसेच इतर नागरिक महिला हे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी जळकोट ते पाटोदा इथपर्यंत चालत जात असतात मात्र बरोबर जळकोट शहर ओलांडली की मोठ्या प्रमाणात घाण कचरा रस्त्यावर टाकलेला दिसून येत आहे तसेच या कचऱ्याच्या उग्र वासामुळे सामान्य नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

# बनावट बांधकाम कामगारांवर गुन्हे दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ जानेवारी :** बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी जवळपास विविध प्रकारच्या ३२ योजना शासनाकडून राबविल्या जात आहेत. मात्र, काही बनावट लाभार्थ्यांनी एजंटांच्या माध्यमातून लाभ घेतल्याचे समोर आले. या संदर्भात उदगीर तालुक्यातील काही बनावट लाभार्थ्यांविरोधात पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. राज्य शासनाच्या वतीने बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्याची अंमलबजावणी केली जात आहे. त्या-त्या बांधकाम कामगारांच्या खात्यावर आर्थिक लाभ जमा केला जात आहे.

# उदगीरच्या विकासकामांसाठी ३१ कोटींचा निधी मंजूर

## माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांच्या प्रयत्नाला यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ जानेवारी :** उदगीर शहरातील विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी शासनाकडे केली होती. त्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करुन महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडून केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य या योजनेंतर्गत उदगीर नगरपरिषद हद्दीत असलेल्या विकास कामांना ३१ कोटी रुपयाच्या विविध विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याचे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे.

यामध्ये उदगीर शहरातील नागरिकांच्या मागणीनुसार उदगीर शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते सोमनाथपुर रोड हद्दीपर्यंत सिमेंट रस्ता व नाली करणे, समता नगर सिग्नल नं - २ ते रिंग रोड पर्यंत सिमेंट रस्ता व नाली करणे, जळकोट रोड ते शिवार महादेव मार्गे देगलुर रोड पर्यंतचा (पाणंद



रस्ता) सिमेंट रस्ता व नाली करणे, जळकोट रोड वरील मनियार बिल्डिंग ते धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालय मार्गे देगलूर रोड पर्यंतचा (पाणंद रस्ता) सिमेंट रस्ता व नाली करणे या चार प्रमुख रस्त्यासाठी तब्बल ३१ कोटी १३ लक्ष २३०९९ रुपयाचा निधी आमदार संजय बनसोडे यांच्या अथक प्रयत्नातून मंजूर करुन सदर कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. आता लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

उदगीर शहरातील नागरिकांच्या मागणीनुसार आमदार संजय बनसोडे यांनी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून शहरातील अंतर्गत पाणंद रस्त्यांवर दर्जेदार सिमेंट रस्ते व नाली बांधकाम करून त्या- त्या भागातील नागरिकांची होणारी गैरसोय आमदार संजय बनसोडे यांनी दुर केली आहे.

या चारही रस्त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना होणारा त्रास कमी होऊन सदर रस्ते शहराला जोडल्याने दळणवळणाची सोय होणार आहे. काही भागात रस्ते नसल्यामुळे शहराला फेरफटका मारून दोन - तीन किलोमीटरचा लांबचा पल्ला पार करून उदगीर शहरात त्या भागातील नागरिकांना यावे लागत होते मात्र आमदार संजय बनसोडे यांच्या प्रयत्नातून सदर रस्ते हे नव्याने होऊन सर्वसामान्य नागरिक आणि या भागातील विद्यार्थ्यांना उदगीर शहरात ये - जा करण्यासाठी सोईचे होणार असल्याने नागरिकांनी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत. शहराच्या वैभवात भर टाकण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर केल्याने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आ. बनसोडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# ॲड. गुणवंतराव पाटील यांचे निधन

**उदगीर, दि. ११ जानेवारी :** उदगीर शहरातील ज्येष्ठ विधीज्ञ व भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष ड.गुणवंतराव हरबाजी पाटील हैबतपूरकर यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगी डॉ. मनीषा वडियार, जावई अजय वडियार, नातू गौरव वऐश्वर्या असा परिवार आहे. अंत्यविधी दि.१२ जानेवारी रोजी सोमवारी सकाळी ११:३० वाजता हैबतपूर पाटी येथील त्यांच्या शेतात होणार आहे.



# चिन्मयानंद स्वामी समाधी महोत्सव सोहळ्यानिमित्त आजपासून भागवत कथा

**तभा वृत्तसेवा,**

**रेणापूर, दि. ११ जानेवारी :** रेणापूर तालुक्यातील दर्जी बोरगाव येथे श्री सद्गुरु चिन्मयानंद स्वामी महाराजांच्या १०२ व्या समाधी महोत्सव सोहळ्यानिमित्त १२ ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत भागवत ज्ञानयज्ञ आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी दर्जीबोरगाव येथे सदगुरु चिन्मयानंद स्वामी समाधी सोहळा साजरा होत आहे. दिनांक १२ जानेवारीपासून दु. १ ते ५ या वेळेमध्ये भागवताचार्य ह.भ.प. प्रकाश महाराज साठे (धारूर) यांचे भागवत नित्य होणार आहे. नित्य विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन, रामकथा, हरिपाठ, कीर्तन, जागर व काकडा असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. सप्ताहात १२ जानेवारीपासून अनुक्रमे हभप मधुसूदन महाराज ठाकूर, प्रकाश महाराज साठे, शंकर महाराज शेवाळे, जयेश महाराज भाग्यवंत, ज्ञानेश्वर महाराज कदम, विशाल महाराज खोले, ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांचे दररोज रात्री ९ ते १२ पर्यंत कीर्तन होणार आहे. तर रविवार, १८ जानेवारी सुरमणी बाबूराव बोरगावकर, तालमणी राम बोरगावकर यांचा गायनाचा कार्यक्रम दु. १२ ते ३ यावेळेत होईल. त्यानंतर चिन्मयानंद स्वामी यांची पालखी मिरवणूक व रात्री ८ वाजता कै. जोधाप्रसाद मोदी यांच्या स्मरणार्थ शोभेची दारू उडविण्याचा येणार आहे. सोमवार १९ रोजी कै. लिंबनअप्पा हालकुडे स्मणार्थ श्रीचा अभिषेक होणार आहे. सकाळी १० ते १२ जयवंत महाराज बोधले पंढरपुरकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहची सांगता होईल. मंगळवार,दि. २० जानेवारी दुपारी १ ते ६ वेळेत जंगी कुस्त्या होतील. सर्व भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान समिती, ग्रामस्थांनी केले आहे.

# संत ज्ञानेश्वर विद्यालयात स्वयंशासनदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**

**अहमदपूर, दि. ११ जानेवारी :** अहमदपूर : येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन दिन हा येथील मुख्याध्यापक तोवर मीना यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला.

एक दिवसाच्या स्वयंशासन दिनाचे मुख्याध्यापक म्हणून कुमारी श्रेया गौतम कांबळे ही तर उपमुख्याध्यापक साक्षी शंकर पवार तसेच पर्यवेक्षक म्हणून अक्षरा मुकेश धावारे आणि लिपीक म्हणून संस्कृती सुखदेव दैठणकर यांनी काम पाहिले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी म्हणून एकूण ४४ विद्यार्थ्यांनी एक दिवस अध्यापनात शाळा चालवून शिस्तीत काम केले. या स्वयंशासन दिनानिमित्ताने उत्कृष्ट भूमिका बजावणारे उपमुख्याध्यापक साक्षी पवार प्रथम तर मुख्याध्यापक श्रेया कांबळे द्वितीय, तृतीय ससाने अनघा आली आहे. हाके श्रुती आणि अमर कोरे हे दोघे उत्तेजनार्थ श्रेणीत आले आहेत. याबरोबरच उत्कृष्ट पाठ टाचण मध्ये गणेश कांबळे प्रथम तर गुंडेरे आनंत द्वितीय व उजगरे मानसी तृतीय आली आहे. यासोबतच उत्कृष्ट



अध्यापन पाठाचे निरिक्षण केले असता सृष्टी आगलावे ही प्रथम आली. अक्षरा सूर्यवंशी द्वितीय तर संस्कृती दैठणकर ही तृतीय आली आहे. या विद्यार्थ्यांचे पाठ निरीक्षक म्हणून सय्यद, मंगरुळे व माने यांनी उत्तम काम केले. शिक्षण प्रसारक मंडळ संस्थचे अध्यक्ष गणेश हाके पाटील, सचिव प्राचार्या रेखा हाके पाटील आणि संस्थेच्या उपाध्यक्षा ॲड. मानसीताई हाके पाटील यांनी कौतुक केले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

# माती वाचवा आंदोलनासाठी १५०० कि.मी. सायकल रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ जानेवारी :** उदगीर सायकलिंग क्लबच्या २९ उत्साही सायकलस्वांरानी *मृदा संवर्धनाचा* संदेश घेऊन उदगीरहून सोमनाथ, व्दारका २ राज्यांतून (महाराष्ट्र आणि गुजरात) जाणारा हा १५०० किलोमीटर अंतराचा प्रवास सायकलवर पूर्ण केले आहेत.

या सायकल प्रवासाची सुरुवात उदगीर येथील दुधिया हनुमान, श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून झाली, प्रवास करताना प्रत्येक शहरात रँलीच्या माध्यमातून उदगीर ते परळी वैजनाथ, गेवराई, घृष्णेश्र्वर, शिर्डी, नाशिक, किल्ला पारडी, सुरत(हजिरा) ते घोगा (बोटिंग), राजुळा, सोमनाथ (सोरठी सोमनाथ मंदिर), पोर-बंदर, व्दारका (श्री.व्दारकाधिश मंदिर) असा १५०० कि.मी. किलोमीटर अंतराचा प्रवास ११ दिवसात पूर्ण केलेला आहे.

साईनाथ कोरे, सुनिल ममदापूरे यांच्या नेतृत्वाखाली सायकलस्वार २००२ सालापासून दरवर्षी उदगीर ते तिरुपती



हे अंतर सायकलवर पूर्ण करणारी, ही उदगीर मधील विविध क्षेत्रात कार्यरत असणारी मंडळी, या त्यांच्या भक्तीपूर्ण सायकलस्वारीला दरवेळी सामाजिक आणि पर्यावरण संदेशाची जोड देऊन, समाजाप्रती असलेले त्यांचे उत्तरदायित्व अशा आगळ्या वेगळ्या उपक्रमांतून सातत्यपूर्ण पणे निभावत आहेत.

प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी सायकल टीम कॉन्शियस प्लॅनेट उपक्रमासाठी काम करत आहे, जो ईशा फाऊंडेशनचा एक आउटरीच प्रकल्प आहे आणि मृदा संवर्धन आणि पुनरुज्जीवन याविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी काम करत आहे. २०१७ मध्ये रामेश्वरम- रॅली फॉर रिव्हर्स- नद्यांसाठी रॅली, २०१८ मध्ये महाबलीपुरम् -ईशा विद्या, आणि २०१९-२० मध्ये कोइंम्बतूर-कावेरी कॉलींग २०२१ मध्ये कन्याकुमारी, २०२२ जगन्नाथ-पुरी, २०२३ श्री. पदमनाभस्वामी (त्रिवेंद्रम), २०२४ श्री. राम मंदिर-अयोध्या कॉन्शियस प्लॅनेट (माती वाचवा) या ईशा फाऊंडेशनच्या सोशल आउटरीच प्रकल्पांसाठी त्यांनी असाच सायकलींग द्वारे सहभाग नोंदवून लांबचा पल्ला गाठलेला असून. ईशा फाऊंडेशन च्या उपक्रमात सहभागी व्हायचे हे त्यांचे सलग नववे वर्ष आहे.

सायकलींग चा एक वेगळा मापदंड निर्माण करणाऱ्या आणि उदगीरकरांची शान असणाऱ्या या टीम मध्ये साईनाथ कोरे, सुनील ममदापूरे, गोविंद रंगवाळ, बालाजी इंद्राळे, नागनाथ वारद, अतुल वाघमारे, जगदिश पंडित, मुकेश नेरुणे, ज्ञानेश्वर चंडेगावे, महेश आलमकेरे, कपिल वट्टमवार, अश्विन पांढरे, भास्कर कुंडगीर, मुकिंद चव्हाण, आकाश चव्हाण, रामेश्वर तोंडारे, अजित पाटील, सतीशकुमार चवळे, महेंद्र मादलापूरे, प्रेमनाथ मोदी, ओमकार बिरादार, रमाकांत वडजे, प्रमोद बुटले, सुर्यकांत आंबेसंगे, सचिन शेंद्रे, सतिष बिरादार, सचिन पेंडलवार, हरिप्रसाद दंडिमे, रामेश्वर सोनी, अनिरुद्ध जोशी- हुमनाबादकर तसेच गणेश गुंडरे, कृष्णा मुंडे, विठ्ठल येनकुरेकर, तातेराव गायकवाड, गोपाळ रोकडे, हे सहभागी होते,

# औराद शहाजानीचा पारा घसरला

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ११ जानेवारी :** निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी व परिसरात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही थंडीची लाट कायम राहिली असून सध्या येथील पारा ७-८ अंश सेल्सियसच्या आसपास पोहचल्याने वातावरणात कमालीचा गारठा निर्माण झाला आहे.

मागच्या काही दिवसात या परिसरातील तापमान १० अंशां दरम्यान राहिल्याने त्याचा परिणाम रब्बी पिकांवरही होत आहे. वाढत्या थंडीमुळेजनजीवनही पूर्णतः विस्कळीत झाले आहे. दरम्यान, हवामान खात्याने आणखी काही दिवस थंडीचा हा कडाका कायम राहणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. या भागात मागील आठवड्याच्या सुरुवातीला तापमान ६ अंश पर्यंत खाली आले होते. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने ढगाळ वातावरण होऊन अनेक भागात तापमान वाढले होते. डिसेंबर महिन्यात किमान तापमान ६ अंशांपर्यंत घसरले होते. आता उत्तरेकडून येणाऱ्या थंड गारठ्यामुळे मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढला आहे. या गारठ्याची तीव्रता वाढण्याची व ती कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. वाढत्या थंडीमुळे परिसरात रस्त्यावरील वर्दळ दिवसभर नाममात्र राहत असून अंगातील थंडी कमी होत नसल्याने ग्रामस्थ शेकोटीचा आधार घेताना दिसत आहेत. थंडी कायम असल्याने उबदार कपडे घालून कामे करावी लागत आहेत.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सायबर सिक्युरिटी व आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जानेवारी -**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत तुळजापूर तालुक्यातील बारूळ येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सायबर सिक्युरिटी आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले.

या कार्यक्रमात श्री समर्थ कॉम्प्युटर्सच्या संचालिका व व्याख्याते अनुराधा नाईक यांनी विद्यार्थ्यांसह ग्रामस्थ व महिलांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना, ऑनलाइन फसवणूक कशी टाळावी, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा शिक्षण व दैनंदिन जीवनातील उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, सीनियर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. डॉ. प्रवीण भाले तसेच ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. रमेश नन्नवरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक, सुरक्षित व समाजोपयोगी वापर करण्याचे आवाहन केले.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...



### कळंब उपजिल्हा रुग्णालयाच्या कामास विलंब; नगराध्यक्षा निवेदन

**कळंब, दि.११ जानेवारी -**
गेल्या दोन वर्षांपासून मंजूर असलेल्या कळंब येथील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व कर्मचारी निवासस्थानांचे काम अद्याप सुरू न झाल्याने जनतेत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर कळंब शहर विकास कृती संघर्ष समितीच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा सुनंदा कापसे व सर्व नगरसेवकांना निवेदन देण्यात आले. निवेदनात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकाजवळील जुने शासकीय रुग्णालय व जि.प. शाळेच्या (मुलांची) काही भागाच्या जागेवरच मंजूर उपजिल्हा रुग्णालय व कर्मचारी निवासस्थाने उभारावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी संघर्ष समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यापूर्वी जिल्हाधिकारी, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या संयुक्त पाहणीत सदर जागा निश्चित झाली असून, सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनही सकारात्मक अहवाल देण्यात आला आहे. तरीही काम रखडल्याने प्रशासनाने तातडीने हालचाल करावी, अशी मागणी संघर्ष समितीने केली आहे.

### जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल संपन्न

**कळंब, दि.११ जानेवारी -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आढाळा शाळेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन दिनांक ८ व ९ जानेवारी २०२६ रोजी मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सहलीत छत्रपती संभाजीनगर विमानतळ, सिद्धार्थ प्राणी संग्रहालय, बीबी का मकबरा, खुलताबाद येथील भद्रा मारुती, वेरूळच्या लेण्या, घृष्णेश्वर मंदिर, देवगिरीचा अजिंक्य किल्ला, संत एकनाथ महाराजांची समाधी (श्रीक्षेत्र पैठण), नाथसागर जलाशय व संत ज्ञानेश्वर उद्यान पैठण या ठिकाणी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करण्यात आले. प्रसिद्ध शिवव्याख्याते महादेव खराटे यांनी किल्ले व लेण्यांबाबत अभ्यासपूर्ण माहिती दिली. तुकाराम कराळे यांनी एकनाथ महाराजांच्या कार्याची माहिती दिली, तर विज्ञान शिक्षिका शिवनंदा स्वामी यांनी प्राणी संग्रहालयातील विविध प्राण्यांबाबत मार्गदर्शन केले. या सहलीत मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, सहशिक्षक महादेव खराटे, तुकाराम कराळे, शिवानंद स्वामी, बलभीम राऊत व स्वयंसेवक बापु हगारे यांनी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी विशेष परिश्रम घेतले.

## लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे यांची 'धडक कारवाई'

### आलियाबाद स्मशानभूमी उजळली... शहर स्वच्छतेला वेग...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ जानेवारी -**
लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी पदभार स्वीकारताच धडक कारवाईला सुरुवात केली असून, सर्वप्रथम शहर स्वच्छतेवर भर दिला आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांसह हिंदू धर्मीयांची आलियाबाद स्मशानभूमी स्वच्छ करून तेथे विद्युत प्रकाशाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांनंतर आलियाबाद स्मशानभूमी विजेच्या प्रकाशाने उजळली असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

नगरपालिकेत लोकनियुक्त नगराध्यक्ष व निवडून आलेल्या नगरसेवकांनी कामकाजाची सूत्रे हाती घेतल्यापासून शहराचा चेहरामोहरा बदलू लागला आहे. प्रशासकीय राजवटीच्या काळात शहरात सर्वत्र अस्वच्छता, दुर्लक्ष आणि विकासाचा अभाव दिसून येत होता. मात्र लोकनियुक्त राजवट प्रस्थापित होताच अवघ्या पंधरा दिवसांतच शहरात प्रत्यक्ष कामे दिसू लागल्याने जनतेत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि भाजपचे नेते सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना नगराध्यक्ष बसवराज धरणे व सहकारी नगरसेवकांनी शहर स्वच्छतेपासून कामाला सुरुवात केली आहे. शहरातील गोलाई चौक ते रोकडया हनुमान मंदिरापर्यंत राष्ट्रीय महामार्गालगतचा परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. तसेच आलियाबाद स्मशानभूमीचीही स्वच्छता करून तेथे लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रशासकीय राजवटीत या स्मशानभूमीची मोठी दुर्दशा झाली होती.

सर्वत्र घाणीचे साम्राज्य, काटेरी झुडपे, योग्य रस्त्याचा अभाव आणि रात्री अंत्यसंस्कार करताना अंधारामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. लाईटची व्यवस्था करण्याची अनेक वेळा मागणी करूनही प्रशासकीय काळात याकडे दुर्लक्ष झाले होते. मात्र लोकनियुक्त राजवट आल्यानंतर अवघ्या १२ दिवसांतच स्मशानभूमीत विद्युत व्यवस्था करण्यात आली असून आता रात्रीच्या वेळेसही अंत्यसंस्कार करणे सुलभ झाले आहे.

दरम्यान, प्रशासकीय राजवटीत लाखो रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीच्या कामात ठेकेदाराने अंत्यसंस्कारासाठी आवश्यक असलेले तीन लोखंडी सापळे बसविले नसतानाही पूर्ण बिल उचलल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी व सापळे बसविण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

याशिवाय भवानी चौकातील नगरपालिकेची बोअर अनेक महिन्यांपासून बंद होती. नगरसेवक इमाम शेख यांनी अवघ्या दहा दिवसांत ती सुरू करून दिली आहे. असेच काम सर्व २० नगरसेवकांनी आपल्या प्रभागात केल्यास शहर विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे व सहकारी नगरसेवकांनी सुरू केलेल्या स्वच्छता मोहिमेचे शहरवासीयांकडून कौतुक होत असून, ही कामे सातत्याने सुरू ठेवावीत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## कानेगाव जि.प. मतदारसंघात 'सुप्रिया शेतकरी संवाद दौरा'

### शेतकरी नेते अनिल जगताप यांच्या पाठीमागे ताकतीने उभे रहा : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**
शेतकरी नेते अनिल जगताप यांच्या संकल्पनेतून कानेगाव जिल्हा परिषद मतदारसंघातील १६ गावांमध्ये सुप्रिया शेतकरी संवाद दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून उंडरगाव येथे शेतकरी संवाद कार्यक्रम पार पडला.


यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी अनिल जगताप यांनी धाराशिव जिल्ह्यात सातत्याने प्रयत्न केले आहेत. गावखेड्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या प्रश्नांची तांत्रिक माहिती मिळावी, यासाठी ते करीत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. मतदारसंघातील शेतकऱ्यांनीही त्यांच्या पाठीशी ताकदीने उभे राहून त्यांना साथ द्यावी, अशी भावनिक साद त्यांनी शेतकरी बांधवांना घातली.




या सुप्रिया शेतकरी संवाद दौऱ्यात सन २०२० ते २०२५ या कालावधीतील थकीत पीक विमा, अतिवृष्टी अनुदान, कांदा अनुदान, प्रोत्साहन अनुदान, दूध अनुदान तसेच इतर शासकीय येणे यासंदर्भात शेतकऱ्यांकडून अर्ज भरून घेतले जात आहेत. भरलेले अर्ज जिल्हा प्रशासनाकडे सादर करून संबंधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यात येत आहे. अनिल जगताप यांनी २०२० ते २०२५ या काळात धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी पीक विमा व अतिवृष्टी अनुदान मिळावे, यासाठी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा केला. वेळोवेळी उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय तसेच राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे दाद मागून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्यामुळे शेकडो कोटी रुपयांचा निधी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्राप्त झाला आहे. मात्र, अद्याप काही शेतकरी अनुदान मंजूर होऊनही त्यांच्या हक्काच्या रकमेपासून वंचित आहेत. अशा शेतकऱ्यांसाठी संवाद दौऱ्यातून अर्ज भरून घेऊन प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, तुषार वाघमारे, नरदेव कदम, सोनाली वाघमारे, हिराचंद मोरे, भुमेश पवार, युवराज तोडकरी, पवन सूर्यवंशी यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अधिकारी-कर्मचारी क्रीडा स्पर्धेत लोहारा तालुक्याचे यश



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ जानेवारी -**
सध्या धाराशिव शहरात तुळजाभवानी स्टेडियममध्ये सुरू असलेल्या अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धेत लोहारा तालुक्यातील अधिकारी-कर्मचारी व खेळाडूंनी सहभागी होऊन उल्लेखनीय यश मिळवले आहे. विविध खेळांमध्ये लोहारा तालुक्याचे खेळाडू व पदाधिकारी बक्षीस मिळवून सुवर्ण क्षण साकारत आहेत.

सांस्कृतिक स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी रंगतदार कामगिरी केली. वर्षा चौधरी यांनी जलवा तेरा जलवा या गीतावर नृत्य केले, केवल कांबळे यांनी बेटी बचाव एकांकिका सादर केली. अस्मिता सुरवसे, केवल कांबळे, सुनिता लोकरे, विकास घोडके, गोविंद घारगे, सचिन पाटील, स्वराज पाटील, नागनाथ कुंभार यांनी उदे ग अंबे उदे, ललाटी भंडार या गीतांवर समुहनृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यांच्या यशाबद्दल जे.टी. वग्गे, शिवकुमार बिराजदार, विश्वजीत चंदनशिवे, महादेव जगताप, सुदर्शन जावळे, रसूल शेख, रफीक शेख, सुरेश साळुंके, दाजीबा साबळे, शंकर काळे, पंडीत राठोड, नितीन कदम आदींनी तालुक्यातील शिक्षक व अधिकारी यांच्या उपस्थितीत अभिनंदन केले आहे.

## प्रेप, धाराशिवमध्ये शाळेच्या आवारात पक्षी अभयारण्य

### मुलांना प्रत्यक्ष सहलीसारखा अनुभव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**
प्रेप, धाराशिव शाळेत विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या परिसरातच पक्षी अभयारण्य तयार करून अनोखा प्रत्यक्ष अनुभव दिला गेला. या उपक्रमाद्वारे मुलांना निसर्गप्रेम, निरीक्षण क्षमता आणि प्राणी-पक्ष्यांबद्दल आदर शिकवण्यावर भर दिला गेला.

शाळेच्या आवारात झाडांवर सुंदर पक्ष्यांचे मॉडेल बसवण्यात आले होते. काही पक्षी झाडांवर बसून आपले अन्न खाताना दाखवले गेले, ज्यातून मुलांना पक्ष्यांची जीवनशैली, अन्न आणि सवयी याबद्दल प्रत्यक्ष शिकायला मिळाले.



विद्यार्थ्यांसाठी तिकीट काउंटर देखील तयार केला गेला होता, जिथून त्यांनी तिकीट घेऊन पक्षी अभयारण्यात प्रवेश केला. यामुळे मुलांना सार्वजनिक ठिकाणी वागण्याची शिस्त आणि संयम शिकवण्यास मदत झाली. शाळेचे प्राचार्य वाल्मिक सोमासे यांनी सांगितले की, शाळा फक्त पुस्तकांचे ठिकाण नसून, जीवनाचे प्रत्यक्ष अनुभव देणारे स्थान असावे, हेच आम्ही या उपक्रमातून दाखवले.

मुलांनी आनंदाने या उपक्रमात भाग घेतला आणि 'बर्ड वॉचिंग'चा अनुभव शाळेच्या आवारातच अनुभवला.

## उद्योगासाठी आवश्यक असणारे मुळ कौशल्य आत्मसात करणे गरजेचे : संजय गुरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ जानेवारी -**
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाचे विशेष श्रम संस्कार शिबिर मौजे काजळा येथे सुरू असले. शिबिरात कौशल्य विकास आणि रोजगार निर्मिती या विषयावर मार्गदर्शन करताना संजय गुरव, सहायक आयुक्त कौशल्य विकास केंद्र, धाराशिव यांनी महत्त्वाचे प्रतिपादन केले.



रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील एनएसएस शिबिर संपन्न....

संजय गुरव म्हणाले, देशाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामुळे रोजगाराच्या संधी मर्यादित होत आहेत. मात्र ही समस्या तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात संधी देखील निर्माण करते. व्यवसाय सुरू करणे हे कमीपणाचे काम नाही; लोकांच्या गरजा ओळखून, निश्चय करून योग्य व्यावसायिक कौशल्य आत्मसात करणे आजच्या काळाची गरज आहे.

शिबिराच्या उद्देशाबद्दल बोलताना प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी सांगितले, एनएसएसचे शिबिर विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर होण्याचे धडे देतात. तरुणांना योग्य प्रशिक्षण घेऊन उद्योग उभारण्यासाठी धाडस करण्यास प्रवृत्त करणे आवश्यक आहे. प्रशिक्षित युवक भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा होऊ शकतात.

यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्तात्रय साखरे, डॉ. मोहन राठोड, डॉ. अवधूत नवले, तसेच ग्रामस्थ आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम बंडगर, प्रास्ताविक ब्रम्हा गुरव यांनी केले तर आभार सागर शिंदे यांनी मानले.

## विजेता : बक्षीसांचा महापूर पंचायत समिती तुळजापूर; सलग चौथ्या वर्षीही सर्वसाधारण विजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.११ जानेवारी -**
जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मध्ये तुळजापूर तालुक्याने सलग चौथ्या वर्षी दबदबा कायम ठेवत संपूर्ण जिल्ह्यातून सहभागी आठ तालुके व एक मुख्यालय या सर्वांमधून विविध क्रीडा व सांस्कृतिक प्रकारात अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व कौतुकास्पद कामगिरी करत या संपूर्ण स्पर्धांचे सर्वसाधारण विजेतेपद गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवेंच्या नेतृत्वाखाली सलग चौथ्यावर्षीही तुळजापूर पंचायत समितीने मिळवले.

जिल्हा क्रीडा संकुल धाराशिव येथे कर्मचाऱ्यांच्या विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये पुरुष व महिलांसाठी वेगवेगळ्या स्वरूपात स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तुळजापूर तालुक्यातून मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी होत विविध क्रीडा प्रकारात यश संपादन केले व एकूण गुणांकणात संपूर्ण जिल्ह्यातून क्रमांक एक चे गुण घेऊन यावर्षीच्या सर्वसाधारण विजेतेपदाच्या ट्रॉफीला गवसणी घातली आहे.

सलग चौथ्या वर्षी मिळवलेल्या या यशाबद्दल तुळजापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे, सहाय्यक गट विकास अधिकारी सीमा गवळी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी ऋषिकेश पिंपळे, उमादेवी मगर, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी किशोर गोरे व संपूर्ण तालुका प्रशासनातील अधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त करत कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

तुळजापूर तालुक्याने मिळवलेले यश- १०० मीटर धावणे पुरुष तृतीय क्रमांक किशोर जाधव, १०० मीटर धावणे महिला प्रथम क्रमांक प्रियंका चव्हाण, ४०० मीटर धावणे पुरुष द्वितीय क्रमांक किशोर जाधव, तृतीय क्रमांक हनुमंत घायाळ व महिलांमधून प्रथम क्रमांक उषा पवार, लांब उडी पुरुष बालाजी दंडणाईक प्रथम क्रमांक, महिला अंजली भालेराव प्रथम क्रमांक, गोळा फेक पुरुष किशोर गोरे द्वितीय क्रमांक, भालाफेक पुरुष अजित माळी तृतीय क्रमांक, प्रतिभा कांबळे प्रथम क्रमांक, थाळीफेक जवळगे द्वितीय क्रमांक, महिलांमधून प्रतिभा कांबळे द्वितीय क्रमांक, बुद्धिबळ महिला प्रथम क्रमांक कानडे स्वाती, बॅडमिंटन महिला एकेरी कांता राऊतगोळ, दुहेरी कांता राऊतगोळ व सोनाली काकूस्ते, कॅरम एकेरी कांता राऊतगोळ, दुहेरी कांता राऊतगोळ व प्रांजली आनंदगावकर तसेच ४५ वर्ष वयोगटाच्या पुढील स्पर्धांमध्ये २०० मीटर चालने महिला वैजयंती बोंगरगे द्वितीय क्रमांक व पुरुषांमधून रामकृष्ण खडके तृतीय क्रमांक.



या वैयक्तिक स्पर्धा बरोबरच सांघिक स्पर्धेमध्ये देखील मोठ्या प्रमाणात तुळजापूर तालुक्याने यश मिळवले आहे. यामध्ये कबड्डी पुरुष जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक, कबड्डी महिला जिल्ह्यात प्रथम, खो खो महिला जिल्ह्यात प्रथम, रस्सीखेच महिला जिल्ह्यात प्रथम, रस्सीखेच पुरुष जिल्ह्यात प्रथम, हॉलीबॉल पुरुष जिल्ह्यात द्वितीय.

या क्रीडा स्पर्धांसोबतच झालेल्या सांस्कृतिक स्पर्धेमध्ये देखील तुळजापूर तालुक्यातील कर्मचाऱ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये कराओके गीत गायन प्रकारात वयक्तिक मधून देविदास गायकवाड प्रथम क्रमांक, कराओके युगलमध्ये सचिन ढेपे व रेखा सोनटक्के प्रथम क्रमांक, समूह गीत गायन संकल्पना तांबे व टीम तृतीय क्रमांक, समूह नृत्य जयमाला वटणे व टीम तृतीय क्रमांक.

सर्वसाधारण विजेते पदाची ट्रॉफी घेण्यासाठी तालुक्यातून मोठ्या संख्येने कर्मचारी नगरपरिषद नाट्यगृह धाराशिव येथे उपस्थित होते. सर्वसाधारण विजेते पदाची ट्रॉफी मिळाल्याबद्दल संपूर्ण तुळजापूर तालुक्यातून या कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे. तुळजापूरच्या या सर्व खेळाडूंना किशोर गोरे, रामकृष्ण खडके व विष्णू दळवी यांनी तसेच सांस्कृतिकमध्ये देविदास गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

तुळजापूर तालुक्याचे या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांसाठीचे मुख्य समन्वयक म्हणून रामदास जगताप व बाळासाहेब घेवारे यांनी जबाबदारी पार पाडली.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नर्सिंग महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा शपथविधी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित एसव्हीएसएस लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग लातूर येथे नर्सिंग विद्यार्थ्यांचा शपथविधी व नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी बीड जिल्हा रुग्णालयाच्या अधिसेविका डॉ. रमा गिरी, परिसेविका रंजना दाने यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, संचालिका माधुरी बावगे, प्राचार्या रूपाली गिरी उपस्थित होते. प्राचार्या रूपाली गिरी यांनी प्रास्ताविक केले. नर्सिंग व्यवसायाचे सामाजिक महत्त्व, रुग्णसेवेतील निष्ठा, करुणा व जबाबदारी याबाबत डॉ. गिरी यांनी मार्गदर्शन केले. सचिव वेताळेश्र्वर बावगे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिस्त, नैतिक मूल्ये व व्यावसायिक कौशल्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. शपथविधी दरम्यान विद्यार्थ्यांनी रुग्णसेवा हीच ईश्र्वरसेवा मानून प्रामाणिकपणे कार्य करण्याची शपथ घेतली.

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित उपप्राचार्या क्षितिजा माळी, प्रा. यशवंत भाताने, प्रा. श्रद्धा घोडके, प्रा. वैष्णवी काळे होते.



# पतंग उडवा पण, जरा जपून ! धातूमिश्रित मांजा ठरू शकतो घातक!

## वीजेच्या तारांपासून दूर राहण्याचे महावितरणचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** मकर संक्रात सण आणि पंतगबाजीचे अनोखे नाते आहे. हा सण जसा जवळ येऊ लागतो तसे बालगोपालांना आणि मोठ्यांनाही वेध लागतात ते पतंगाचे. रंगीबेरंगी विविध आकारातील पतंग उडविणे हा एक वेगळाच आनंद असतो. मात्र या आनंदाच्या भरात आपण सुरक्षीततेकडे दुर्लक्ष करतो. पतंगोत्सव साजरा करताना उत्साहाच्या भरात निष्काळजीपणामुळे आपणास प्रसंगी जीव ही गमवावा लागू शकतो याचे भान राहत नाही. त्यामुळेच पतंग उडविताना पतंग, पतंगाचा मांजा वीज वाहिन्या, रोहीत्र यांच्या संपर्कात आल्याने काही दुर्घटना घडण्याची शक्यता



असते. त्यामुळे पतंग उडविताना वीज यंत्रणेपासून सावधगिरी बाळगावी असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

पतंग उडविताना अपघात घडल्याच्या घटना बातम्यांच्या स्वरुपात आपण दरवर्षी वाचतो. शहरी भागात अपुऱ्या जागे अभावी घराच्या छतावर पतंग उडविताना अनेक जण आपल्याला दिसतात.

### धातूमिश्रित मांजा ठरू शकतो घातक

सध्या बाजारात धातूमिश्रित मांजा मिळतो. या मांजावर धातूमिश्रित रसायनाचे कोटिंग केलेले असते. असा मांजा वीजेच्या तारेत अडकल्यास त्यामधून वीज प्रवाह पतंग उडविणाऱ्या व्यक्ती पर्यंत पोहचून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचबरोबर पक्षी त्यामधे अडकून जखमी होतात. त्यामुळे धातूमिश्रित मांजा न वापरता काळजी घेऊन सर्वांनी सुरक्षितपणे पतंगोत्सव साजरा करावा.
– अरविंद बुलबुले, मुख्य अभियंता, लातूर परिमंडल

पतंग उडविण्याच्या नादात आपल्या घराच्या परिसरातील वीजतारांचाही विसर पडतो आणि खबरदारी न घेतल्यामुळे अपघातही होतो. त्याचबरोबर युवकांच्यात वीजतारांमध्ये अडकलेले पतंग काढण्याचीही जणू स्पर्धाच लागलेली असते. अशावेळी शॉक लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वीज तारांमध्ये अडकलेले पतंग काढण्याचा प्रयत्न करू नये.

वीज तारांमध्ये अडकलेल्या पतंगाचा मांजा खाली जमिनीवर लोंबकळत असतो. हा मांजा ओढून पतंग काढण्याच्या प्रयत्नात एका तारेवर दुसऱ्या तारेचे घर्षण होवून शॉटसर्किट होण्याची शक्यता असते. त्यामुळे संबंधित परिसरात वीजपुरवठा खंडीत होण्याबरोबरच, त्या व्यक्तीचा शॉक लागून प्राणांकीत अपघात होण्याचाही धोका संभवतो. त्यामुळे संक्राती सारख्या आनंददायी सणाला गालबोट लागू नये, याकरिता योग्य खबरदारी घेवूनच पतंग उडवण्याचा आनंद घ्यावा. त्यासाठी मोकळ्या जागेतच पतंग उडवावेत, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

## सावकारी जाचाला कंटाळून व्यापाऱ्याची आत्महत्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ जानेवारी :** शहरातील सावकाराच्या जाचाला कंटाळून गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उदगीर शहरात घडली. रमेश सिद्धप्पा अंबेसंगे (वय ६५) असे मयत व्यापाऱ्याचे नाव आहे.याबाबत उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील एकाला पोलिसांनी अटक केली आहे. रमेश अंबेसंगे यांनी राहत्या घरी हॉलमध्ये गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. त्यांच्या खिशात एक सुसाईड नोट सापडली असन, त्यात पोलिस कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

चिठ्ठी सापडूनही पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल का केला नाही? तीन दिवसांनंतर शुक्रवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्या खिशात सुसाईड नोट आढळून आली आहे. यात सावकारांनी पैशासाठी छळ केल्याचे म्हटले आहे. तपास सुरू आहे.

व्याजाच्या पैशांसाठी होणाऱ्या छळाचा सविस्तर उल्लेख केला आहे. मयतचा मुलगा प्रकाश अंबेसंगे (वय ३३) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी राजगोपाल मणियार याला अटक केली असून, साधू कांबळे हा फरार आहे. तपास पोउपनि. देवकर करत आहेत.

## एनसीसी कॅडेट्सची शहरात मतदान जनजागृती रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** लातूर महानगरपालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी ५३ महाराष्ट्र बटालियनचे एनसीसी कॅडेट्स आणि लातूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'मतदान जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला मार्गस्थ केले.

दयानंद महाविद्यालयापासून मार्गस्थ झालेल्या रॅलीचा समारोप टाऊन हॉल येथे झाला. यारॅलीत दयानंद विज्ञानच्या एनसीसीकॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या रॅलीसाठी दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी यांनी उत्तम नियोजन केलेले होते. रॅलीत एनसीसी कैडेटखनी इतर महाविद्यालयांच्या एनसीची कॅडेटसबरोबर मतदानाचा फलक हाती घेऊन 'मतदान करा अशा घोषणा दिल्या.

यावेळी सुभेदार हरिदर सिन, संजय विकणे, हवालदार हिरासिंग, स्वी कुमार व इतर जवानांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दयानंद विज्ञानचे एनसीसी कॅडेटस उपस्थित होते.

## लातुरात दहशत पसरविणाऱ्या तिघांवर गुन्हे दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** सामान्यांमध्ये दहशत निर्माण व्हावी, या उद्देशाने कारमध्ये व हातात कोयता घेऊन फिरणाऱ्या तिघांविरोधात पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

यामध्ये एका व्यक्तीला राजीव गांधी चौकात तर दुसऱ्या गुन्हेगाराला पिंटू हॉटेल चौकाजवळील एका मंगल कार्यालयाजवळ अटक करण्यात आली.

महापालिका निवडणुका सुरू असल्याने घातपात करण्याच्या उद्देशाने सामान्यांमध्ये दहशत पसरविणाऱ्यांवर कारवाईसाठी पोलीस अलर्ट झाल्याचे दिसून येते. सध्या लातूर शहरात महानगरपालिकेच्या निवडणुका सुरू आहेत. त्या शांततेत पार पडाव्यात, काहीही गालबोट लागू नये, यासाठी निवडणूक आयोगासह पोलीस प्रशासन प्रयत्न करीत आहे.

शिवाजी नगर पोलिसांची गस्त सुरू असताना शनिवारी (दि.१०) सायंकाळी सव्वा पाच वाजेच्या सुमारास शहराच्या राजीव गांधी चौकातील एका पिज्जा हॉटेलपुढे स्कोडा कार थांबली होती. त्यातील तरुणांवर पोलिसांना संशय आला. पोलिसांनी कारची तपासणी केली असता मागच्या डिक्कीत एक लाकडी मूठ असलेला धारदार कोयता आढळून आला. पोलिसांनी तत्काळ तो कोयता जप्त करून आरोपी अबरार अजीम शेख (वय १९, रा. कादरी गल्ली, औसा) व फहाद रियाज नांदुर्गे (वय १८, रा. माडजे गल्ली, औसा) या दोघांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपास शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे सहायक फौजदार ए. टी. चौगुले करीत आहेत. दुसऱ्या एका घटनेत शहराच्या गरूड चौकातून नवीन रेणापूर नाक्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर पिंटू हॉटेलजवळील लक्ष्मी ग्रँड मंगल कार्यालयासमोर आरोपी शहानवाज पाशामियाँ सय्यद (वय २०, रा. पिंटू हॉटेलजवळ, बुऱ्हाण नगर, मळवटी रोड, लातूर) हा हातात धारदार कोयता घेऊन शनिवारी (दि.१०) दुपारी सव्वा तीन वाजेच्या सुमारास रस्त्यावर थांबला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे गस्तीवरील पोकॉ. युवराज गिरी यांनी त्याला पाहिले. तात्काळ त्याच्या हातातील धारदा कोयता ताब्यात घेत आरोपी शहानवा पाशामियाँ सय्यद याला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल आहे.

## पथकांमार्फत आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जात असून विविध पथकांमार्फत त्यावर सूक्ष्म लक्ष ठेवण्यात येत आहे. तरीही भरारी पथकाकडून दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीतील महत्वाचा भाग म्हणजे प्रचार यंत्रणा. सर्वच राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणावर सभा, मिरवणूक, विविध वाहनांद्वारे प्रचार तसेच होर्डिंग व बॅनर लावून जोरदारपणे प्रचार केला जात आहे.

आचारसंहिता कक्षांतर्गत कार्यरत एफएसटी व व्हीएसटी पथकांद्वारे सर्व उमेदवारांच्या प्रचारावर काटेकोरपणे लक्ष ठेवण्यात येत आहे. त्यानुसार राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांकडून लावण्यात आलेले विविध होर्डिंग व बॅनर परवानगीची पडताळणी करून विनापरवानगी होर्डिंगवर २ गुन्हे भरारी पथकामार्फत करण्यात आले आहेत. या दरम्यान कालावधीत पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत कोट्यवधी रुपयांचे मद्य जप्त करण्यात आले आहे.

पोलीस विभागामार्फत ४०९ व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी तथा आचरसंहिता कक्ष प्रमुख आम्रपाली कासोदेकर यांनी बैठका घेऊन एफएसटी व व्हीएसटी पथकांनी आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्यावर सक्त कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

याकामी कोणाचीही तमा न बाळगण्याचेनिर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत. प्रमुख राजकीय पक्षाचे असो वा अपेक्षा प्रत्येक उमेदवाराने प्रचार करताना आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी घ्यावी, आचारसंहिता भंगाचे प्रकार निदर्शनास आल्यास आचारसंहिता कक्षास संपर्क करावा, भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पडतील, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन आचारसंहिता विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिऊरच्या वैष्णव तुगावे यांचा आरोग्य सेवेचा निःस्वार्थ यज्ञ



**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ११ जानेवारी :** आपणही समाजाचे कांहीतरी देणे लागतो, ही जाणीव ठेवून वडील स्व. भागवतराव तुगावे व आजोबा स्व. राजाराम तुगावे यांच्या स्मरणार्थ निलंगा तालुक्यातील शिऊर येथील वैष्णव तुगावे हे मागच्या अनेक वर्षांपासून प्रत्येक महिन्याच्या ६ तारखेला गावातील नागरिकांना मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे.

शिऊर येथील उच्चशिक्षित वैष्णव तुगावे यांनी आपल्या गावातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी एक प्रण करुन प्रत्येक महिन्याच्या ६ तारखेला डॉ. एस. आर. सूर्यवंशी फार्मेसिस्ट सलीम शेख व परिचारीका अम्रताली सूर्यवंशी यांना सोबत घेऊन मधुमेह तपासणी, आरोग्य तपासणी, मोफत औषधे, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन व रक्तदान शिबीर आदी उपक्रम राबविण्याचे काम ते मागच्या अनेक वर्षांपासून करत आहेत.

नुकतेच ६ जानेवारी रोजी १२२ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले.

वैष्णव तुगावे आपल्या वडीलांच्या पावलावर पाऊल टाकून जनसेवेचे वृत्त पुढे घेऊन जात आहेत. स्व. प्रा. भागवतराव तुगावे यांनी हजारो विद्यार्थी घडविले. असे कोणतेच क्षेत्र नाही ज्या क्षेत्रात त्यांचे विद्यार्थी भेटत नाहीत, शिक्षणगंगा शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली पाहिजे, या करिता त्यांची विशेष तळमळ होती. शैक्षणिक फिस, पुस्तके देवुन त्यांनी विद्यार्थी घडवले. त्यांच्याच विचारांचा वसा घेवुन वैष्णव तुगावे यांनी आपल्या जन्मभूमीतील लोकांचे आरोग्य विषयक, सामाजिक प्रश्र्न, जिल्हा परिषद शाळेमध्ये विविध उपकम, सर्व सामान्यांचे प्रश्र्न, रोगनिदान शिबीर या सारखे उपक्रम हाती घेऊन प्रत्येक महिन्याला कार्यक्रम आयोजन करत आहेत. त्यांच्या नि:स्वार्थ सेवेबाबत ग्रामस्थांमधून कौतुक केले जात आहे.

## राज्य कर्मचाऱ्यांच्या नजरा आठव्या वेतन आयोगाकडे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** आपल्याकडे मराठी बोलीभाषेत 'गुरवाचे चित्त नैवेद्याकडे अशा आशयाची एक म्हण प्रचलित आहे. म्हणजे महत्वाच्या कामापेक्षा नको त्या गोष्टींकडे ब्राँकायणे लक्ष देणे यासाठी हा शब्दप्रयोग उपयोगात आणला जातो. केंद्राने आठव्या वेतन आयोगाचे काम सुरु केल्यानंतर राज्य सरकारहीआपल्याला हा वेतन आयोग कधी लागू करणार आणि त्याचा लाभ कधी देणार? याकडे राज्यातील तमाम शासकीय अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या नजरा लागल्याचे दृष्टीपथास येत आहे.

केंद्र सरकारने त्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करून उकतेचं त्याचे कामकाजही सुरू केले आहे. केंद्र सरकार प्रमाणे महाराष्ट्र शासन मागे पुढे राज्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू करत असते.

केंद्र सरकारच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांप्रमाणे आपल्यालाही हा वेतन आयोग कधीपासून लागू केला जातो याकडे सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे. शासकीय अधिकारी आणि कर्मचारी किती पोटतिडकीने आपले कर्तव्य बजावतात? हा प्रश्र्न सामान्यांना सातत्याने पडत असला तरीही नियमाप्रमाणे शासन त्यांना नवीन वेतन आयोग लागू करणारचआहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु आपल्याला कधीपासून मिळणार याकडे आत्तापासून राज्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगापासून भरमसाठ पगारी झाल्या. त्यामुळे आठवा वेतन महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाकडे लक्ष करावी, असे आयोग कधी लागू होणार, पगार किती रूपयांनी वाढणार, याकडे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे लक्ष वेधले असून, महाराष्ट्र शासनाने आठव्या वेतन आयोगाच्या पार्श्वभूमीवर, कार्यवाही सुरू करावी असे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

### कर्करोगविषयी जनजागृती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ११ जानेवारी :** राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जनजामृती कार्यक्रमांतर्गत गरजू रुग्णांसाठी असलेल्या 'संजीवनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेविषयी तसेच कर्करोग विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. विशाल वर्मा आदींची उपस्थिती होती.



## टुकारगीरीवर पोलिस प्रशासनाकडून कारवाईला सुरुवात

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ११ जानेवारी :** उदगीर शहर शिक्षणाचे माहेर घर असल्यामुळे तीन राज्याच्या सिमावर्ती ग्रामीण भागातील विद्यार्थी, विद्यार्थीनी शिक्षणासाठी येतात. पण शहरातील कांही धर्मांद टुक्कार शहरातील प्रमुख महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर विनाकारण उभारून भांडणे काढणे, मुलीची छेड काढणे आदी चुकीच्या घटनांना प्रोत्साहन देत होते यामुळे मुलींना शिक्षणासाठी अडचण निर्माण होत होती.

बजरंग दलाच्या वतीने कांही महिन्यापूर्वी पोलिस प्रशासनास पथक नेमण्यासाठी निवेदन दिले होते पण पथक नेमूनही जास्त काळ चालू शकले नाही. रिक्षाचालक व टुकार पुन्हा हौदोस घालण्यास सुरुवात केली यामुळे बजरंग दलच्या वतीने २६ डिसेंबर २०२५ रोजी निवेदन देऊन कार्यवाही नाही झाल्यास बजरंग दल स्वतः रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशारा इशारा दिला होता . यावर सक्त कार्यवाही करण्यासाठी शहर पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांनी चांगल्या कार्यास शुभारंभ म्हणून पथक नेमले व गेल्या कांही दिवसांपासून टुक्कारावर कायदेशीर कारवाई करण्यास सुरू केली. यामध्ये वाहन परवाना पाहणे, विनाकार महविद्याल्याच्या सामोर थांबल्यास कार्यवाही करणे, मुख्य रसयावरील गर्दी कमी करण्यासाठी पथकाच्या वतीने कार्यवाही सुरुवात करण्यात आली. यापुढे अशीच कारवाई होईल असे आश्वासन पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांनी दिली. या चांगल्या कामगीरीबद्दल विश्र्व हिंदू परिषद व बजरंग दलच्या वतीने पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विश्व हिंदु परिषद शहराध्यक्ष महादेव घोणे, बजरंग दल जिल्हा सहसंयोजक रोहित बोईनवाड, किशोर कबाडे, प्रशांत कबाडे, प्रेम गगणबोने, हर्षद साबने, अनिल मदनुरे, आदित्य देवनाळे व बजरंगी उपस्थित होते.